


उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी





■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१३ ■ नाशिक, बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


# पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या नातेवाइकांना 50 लाख

## एका सदस्याला सरकारी नोकरीही; कॅबिनेटचा निर्णय

**मुंबई :** पहलगाम हल्ल्यामध्ये मृत झालेल्या नातेवाइकांना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे अर्थसहाय्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच या मृतांमधील प्रत्येक कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरी देण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. यातील संतोष जगदाळे यांच्या कन्या असावरी जगदाळे यांना सरकारी नोकरी देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.



राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर राज्यातील सहा मृतांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये अर्थसहाय्य देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली. तसेच प्रत्येक कुटुंबातील एकाला शासकीय नोकरी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या आधी असावरी जगदाळेंना पुण्यातील डी. वाय. पाटील संस्थेमध्ये नोकरी देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता त्यांना सरकारी नोकरी देण्याचा निर्णय झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा विशेषाधिकार वापरून मृतांच्या कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी देण्याचा निर्णय घेतला आहे. असावरी जगदाळे यांनी कॉम्प्युटर सायन्समधून बी.एस्सी केली. त्यानंतर एमबीएची पदवी घेतली. नंतर त्यालाच पूरक असा लेबर लॉचा डिप्लोमा केला आहे.

/-...४



### सुधारित पीकविमा योजना लागू करणार

राज्यात सुधारित पीकविमा योजना लागू करण्यात येणार आहे. १ रुपयात विमा योजनेत लाखो बोगस अर्ज आले. लोकांनी निधीचा अपव्यय करणारे षडयंत्र केले. त्यामुळे गरजू व्यक्ती या योजनेपासून वंचित राहू नये म्हणून सुधारित योजना आणणार आहे. शेतकऱ्यांना मल्चिंग पेपर, ट्रॅक्टर, ट्रीप यामध्ये गुंतवणूक करणारी नवी योजना लागू केली आहे. आज ९ साइट्सवर पंप स्टोअरेजचे करार केले आहे. त्या माध्यमातून ८००० ते ८५०० मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. पंप स्टोअरेजच्या क्षेत्रात जास्त निर्मिती करणारे राज्य आहे.

### राज्यात इलेक्ट्रिक वाहनांना टोल सूट

राज्यात यापुढे इलेक्ट्रिक वाहनांच्या खरेदीमध्येही आणि टोलमध्येही सूट देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच राज्यातील जहाज निर्मितीलाही प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारने एक नव्या इलेक्टिक व्हेईकल पॉलिसीचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये चार्जिंग स्टेशन्सची सुविधा वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रिक व्हेईकल्सच्या खरेदीवर सबसिडी आणि काही प्रमाणात टोलवरही सूट देण्यात येणार आहे. शिप ब्रेकिंग, शिप बिल्डिंग वाढवण्यात येणार आहे. त्यातून रोजगार निर्मिती होते. राज्यात तीन मोठे बंदर आहेत. त्यातून व्यवसाय निर्माण होऊ शकते. त्या मुद्द्यावर एक पॉलिसी करण्यात आली आहे.




## महत्त्वाचे ▶▶▶▶



### राम मंदिर शिखरावर ४२ फूट ध्वजस्तंभ

**अयोध्या** अयोध्येत राम मंदिराच्या वरच्या बाजूला ४२ फूट उंच धार्मिक ध्वजस्तंभ स्थापित करण्यात आला आहे. राम मंदिर ट्रस्टच्या मते, मंदिराचे शिखर १६१ फूट उंच आहे. ध्वज बसवल्यानंतर मंदिराची उंची २०३ फूट होईल. या ध्वजस्तंभाचे वजन ५.५ टन आहे आणि ते पितळेपासून बनलेले आहे. त्याचे जीवनमान सुमारे १०० वर्षे आहे. हे ६० कारागिरांनी ७ महिन्यांत तयार केले आहे. मंगळवारी सकाळी २ क्रेनच्या मदतीने ट्रॉलीच्या वरून ध्वजस्तंभ उचलण्यात आला. हा धर्मध्वजदंड गुजरातमधील अहमदाबाद येथील एका कंपनीने तयार केला आहे. जानेवारी २०२४ मध्ये ते ट्रकने अयोध्येत आणण्यात आले, परंतु त्यावेळी ते शिखर तयार नव्हते. म्हणून ध्वजस्तंभ राम मंदिर परिसरात ठेवण्यात आला होता.

### पाचशे सैनिकांनी दिले राजीनामे

**इस्लामाबाद :** पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानचे संबंध ताणले गेले आहेत. त्यातच पाकिस्तानी सैन्यातील ५०० सैनिक आणि १०० अधिकाऱ्यांनी वैयक्तिक कारणांचा संदर्भ देत राजीनामे दिले आहेत. अवघ्या २ दिवसांत राजीनाम्यांचा पाऊस पडला आहे. त्यामुळे सैन्याची युद्ध लढण्याची मानसिकता नसल्याचं स्पष्ट झाले आहे. पाकिस्तानी सैन्यात बंडाळी होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सैन्याच्या कमांडर्सकडून सातत्याने बदलले जाणारे आदेश, मानसिक थकवा यामुळे सैनिक आणि अधिकारी वर्गाने राजीनामा देऊन कार्यमुक्त होण्याचा मार्ग निवडला आहे.

### कॉमनवेल्थ घोटाळा; कलमाडी निर्दोष

**पुणे :** काँग्रेसचे माजी मंत्री सुरेश कलमाडी यांना कॉमनवेल्थ भ्रष्टाचार प्रकरणात ईडीकडून क्लीन चिट मिळाली आहे. २०१० साली कॉमनवेल्थ घोटाळा झाल्याचे सुरेश कलमाडी यांच्यावर राजकीय आरोप झाले होते. त्यानंतर सुरेश कलमाडी यांचे राजकीय अस्तित्व संपले. मात्र, तब्बल १५ वर्षांनी ईडीकडून न्यायालयामध्ये या प्रकरणातला क्लोजर रिपोर्ट सादर केल्यानंतर दिल्ली न्यायालयाने कलमाडींसह तत्कालीन सरचिटणीस ललित भानोत व इतरांविरुद्ध मनी लॉड्रिंग प्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाचा क्लोजर रिपोर्ट स्वीकारला आहे.

### दानवेंच्या गाडीला लोणावळ्यात अपघात

**पुणे :** माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या कारचा लोणावळ्यातील जयचंद चौकात अपघात झाल्याचे वृत्त समोर आले आहे. कामानिमित्त रावसाहेब दानवे हे लोणावळ्यातील बाजारपेठेत आले असता, एक मोटारसायकलने जोराची धडक दानवे यांच्या अर्टिका गाडीला धडक मारली. अपघाताता कोणतीही दुखापात झाली नसून, दानवे यांची प्रकृती उत्तम आहे.



# लक्ष्य अन् वेळ ठरविण्याचे लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य?

## पंतप्रधान : बदला घ्या... सडेतोड उत्तर द्या!

**नवी दिल्ली :** सैन्यदलाच्या क्षमतेवर आपल्याला पूर्ण विश्वास आहे, त्यामुळे त्यांनी टार्गेट निवडावे आणि कारवाई करावी, अशा सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्याचे समजते. पहलगाम हल्ल्याचा आपल्याला बदला घ्यायचा आहे, दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर द्या, असेही पंतप्रधानांनी सैन्याच्या तीनही दलांना सांगितले आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर शत्रूला धडा शिकवण्यासाठी भारताने रणनीती आखायला सुरुवात केली असून, त्याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, सीडीएस अनिल चौहान, आणि तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख उपस्थित होते. तासभर चाललेल्या या बैठकीमुळे भारताकडून काहीतरी मोठे पाऊल उचलले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हल्ला झालेल्या पहलगामसोबतच काश्मीरच्या विविध भागात दहशतवाद्यांविरोधात भारतीय सैन्याने मोठी मोहीम उघडली आहे. मात्र, या लष्करी कारवाईबाबत अजून अधिकृत वृत्त समोर आलेलं नाही. पण काश्मीर खोऱ्यात मोठ्या प्रमाणात लष्करी कारवाई सुरू असल्याचे समजते. आपल्याकडे वेळ कमी आहे आणि लक्ष्य मोठं आहे, असं वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एका कार्यक्रमात केले. मोदींनी या वक्तव्यातून काही मोठ्या घडामोडींचे संकेत दिलेत का, अशी चर्चा सुरू आहे. कोणतीही कारवाई करण्यास लष्कर सज्ज आहे, अशी माहिती संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोमवारी (दि. २८) दिली. काश्मीरमधील स्थितीबाबत त्यांनी पंतप्रधानांना माहिती दिली. या हल्ल्यामागील सूत्रधारांना शिक्षा करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व पर्यायांचा या बैठकीमध्ये विचार करण्यात आल्याची चर्चा आहे. पूंछ आणि काश्मीरच्या इतरही काही भागांमध्ये पाकिस्तानकडून गोळीबार अद्याप सुरूच आहे. पाकिस्तानने आपल्या सीमावर्ती गावांमधील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी सांगितले आहे. गेल्या ४ दिवसांपासून पाककडून सतत शस्त्रसंधी कराराचे उल्लंघन होत आहे. काश्मीरमध्ये दहशतवादी घुसवण्यासाठी या सर्व हालचाली सुरू असल्याच्या चर्चा आहे.

### हवाईदलाला सज्ज होण्याचे आदेश

पाकिस्तानी लष्कराने सीमेवर हालचाली वाढवल्यामुळे भारतीय हवाईदलाला आदेश येताच दोन मिनिटांच्या आत कारवाईसाठी सज्ज होण्याचे आदेश देण्यात आले आहे. भारत व पाकिस्तानमध्ये सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर लष्करी सज्जतेच्या दृष्टीने हे पाऊल उचलण्यात आल्याचे समजते. पाकिस्तानकडून नियंत्रण रेषा आणि आंतरराष्ट्रीय सीमेवर अधिक संख्येने तोफा आणण्यात आल्या आहेत.

### सरसंघचालक पंतप्रधानांच्या भेटीला

पंतप्रधान मोदींनी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, एनएसए अजित डोवाल आणि तिन्ही लष्करप्रमुखांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीनंतर आरएसएसप्रमुख मोहन भागवत पंतप्रधान मोदींना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी पोहोचले. सध्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर या भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण २०१४ मध्ये भाजप सरकार स्थापन झाल्यानंतर संघप्रमुखांनी पंतप्रधानांच्या सरकारी निवासस्थानी भेट देण्याची ही पहिलीच वेळ होती. या बैठकींवरून असे दिसून येते की, या हल्ल्यानंतर सरकार सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी गांभीर्याने काम करत आहे.

### बी. आर. गवईंची सरन्यायाधीश पदावर नियुक्ती

**नवी दिल्ली :** न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांची ५२ वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आहे. ते १४ मे रोजी मुख्य न्यायाधीशपदाची शपथ घेणार आहेत. निवृत्त सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचे उत्तराधिकारी पदावर ते असतील.
भूषण गवई यांचा २४ नोव्हेंबर १९६० ला महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यात जन्म झाला. त्यांनी १६ मार्च १९८५ ला त्यांनी वकिली क्षेत्रात पदार्पण केले. पुढे ते १२ नोव्हेंबर २००५ ला उच्च न्यायालयात कायमस्वरूपी न्यायाधीशपदावर विराजमान झाले. तेव्हापासून ते सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक घटनापीठांचे सदस्य राहिले आहेत, त्यांनी आतापर्यंत अनेक ऐतिहासिक निकाल दिले आहेत.
जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या मोठ्या निर्णयाला मान्यता देणाऱ्या पाच सदस्यीय खंडपीठाचे ते सदस्य होते. ज्यामुळे ३७० कलम रद्द करण्याचा ऐतिहासिक त्यांच्या उपस्थितीत झाला. त्यासोबतच राजकीय निधीसाठी वापरले जाणारे निवडणूक रोखे /-...४

# सिंहस्थासाठी दोनशे एकर जागा भाडेतत्त्वावर घेण्याची तयारी

## मनपा व जिल्हा प्रशासनाचा बैठकीत निर्णय

**नाशिक : प्रतिनिधी**

आगामी सिंहस्थ कुंभमेळा भूसंपादनासाठी निधी नसल्याने यावर उपाय म्हणून साधुग्रामसाठी अतिरिक्त दोनशे एकर जागा भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय जिल्हा व मनपा प्रशासनाने घेण्यात आला आहे. मात्र, या निर्णयास शेतकऱ्यांकडून कितपत यश मिळेल हे पहावे लागणार आहे. यामुळे थेट मोबदला देऊन जागेचे कायमस्वरूपी भूसंपादन करणे शक्य नसल्याचे दिसत आहे.

सिंहस्थ कुंभमेळा साधुग्राम भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. तपोवन येथील शेतकऱ्यांच्या जमिनीवर सिंहस्थासाठी आरक्षण टाकण्यात आले. मात्र, त्यांचे भूसंपादन होऊ शकले नाही. त्यासाठी पाच हजार कोटींची गरज असून, शासनाने हात झटकले आहे. मनपाची क्षमता नसल्याने भूसंपादन मार्गी लागू शकले नाही. तसेच या जमिनींवर तात्पुरत्या स्वरूपात पायाभूत सुविधा उभारल्या जातात. त्यामुळे जमीन नापीक बनते. ते पाहता जे दोनशे एकर अतिरिक्त हवे आहे. त्यासाठी भाडेततत्त्वार जमिनी देण्यास प्रतिसाद मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी साडेतीनशे एकर आरक्षित जागा वगळून आणखी दोनशे एकर जागा हवी असून, ती भाडेतत्त्वावर घेण्याचा निर्णय घेतला आहे.

नाशिकला साधू-महंतांसह पंधरा कोटी भाविक येण्याचा अंदाज आहे. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी पाचशे एकर जागा साधुग्रामसाठी अधिग्रहीत करा, अशा सूचना दिल्या आहेत. सद्यस्थितीत तपोवनात ३५० एकर जमिनीवर सिंहस्थासाठी कायमस्वरूपी आरक्षण आहे. मनपाला मोबदला देणे शक्य नसल्याने प्रशासन ही जागा कुंभमेळ्याअगोदर दोन वर्षे भाडेतत्त्वावर घेते. यंदा साधुग्रामसाठी आणखी दोनशे एकर अतिरिक्त जागा हवी आहे.

### येथील जागांचा पर्याय

तपोवनच्या आजूबाजूच्या परिसरात मोकळ्या जागांचा पर्याय मनपासमोर आहे. त्यामध्ये आडगाव, मखमलाबाद, मेरी याचा समावेश आहे. तेथील शेतकरी व जागामालकांनी तयारी दर्शवल्यास त्यांना जागा वापरापोटी भाडे अदा केले जाईल.




# राधाकृष्ण विखे, म्हस्के यांच्यासह ५४ जणांवर गुन्हे

## ९ कोटींच्या अपहारप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**अहिल्यानगर :** राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांच्यासह ५४ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साखर कारखाना कर्जमाफी प्रकरणात ९ कोटींच्या अपहारप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर लोणी पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे.

शेतकऱ्यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकांकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना वितरित न केल्याचा आरोप या सर्वांवर ठेवण्यात आला आहे. सन २००४-२००५ आणि २००७ साली अपहार केल्याचे दाखल फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. कारखान्याच्या तत्कालीन संचालक मंडळावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी प्रवरा कारखान्याचे सभासद बाळासाहेब विखे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अखेर, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला. राधाकृष्ण विखे हे कबिनेट मंत्री असल्याने



पोलीस स्टेशनने त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल करून न घेतल्यामुळे तक्रारदार बाळासाहेब विखे यांनी राहाता येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात फिर्याद दाखल केली. न्यायालयाने सर्व संचालकांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास करण्याचे आदेश दिले होते. मात्र, या आदेशाविरुद्ध विखे व सहकारी साखर कारखान्याच्या संचालकांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाद मागितली. या ठिकाणी न्यायालयाने राहता येथील न्यायालयाचा आदेश अमान्य केला. त्यानंतर बाळासाहेब विखे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. अखेर सर्वोच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा निकाल ग्राह्य धरत विखे पाटील यांच्यसह ५४ जणांवर गुन्हा दाखल करून चौकशीचे आदेश दिले आहेत.

# रघुजी भोसलेंची तलवार लंडनमधील लिलावात जिंकली

## मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार मध्यस्थामार्फत ४७ लाखांत 'मोहीम फत्ते'

**मुंबई :** नागपूरकरच्या भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील महत्त्वाचे सरदार रघुजी भोसले यांची लंडन येथे लिलावात निघालेली तलवार परत मिळवण्यात सरकारला मोठे यश आले आहे. लिलाव जिंकून आपली ऐतिहासिक वस्तू परदेशातून परत मिळवण्याची ही पहिलीच वेळ असून, याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आशिष शेलार यांनी आभार मानले आहेत.

ऐतिहासिक दस्तऐवज असलेली ही तलवार लिलावात निघाली होती. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना ही माहिती कळताच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी



चर्चा करून सदर तलवार शासनाला मिळावी, या दृष्टीने नियोजन केले. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे शेलार यांनी तातडीने मध्यस्थ उभा करून या लिलावात शासनाने सहभाग घेतला व लिलाव जिंकला. यासाठी हातळणी, वाहतूक व विमा खर्चासह सुमारे ४७.१५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. याबद्दल काल पत्रकार परिषद घेऊन आशिष शेलार यांनी मुख्यमंत्र्यांचे विशेष आभार मानले आहे.

रघुजी भोसले यांचे शौर्य /-...४

### मराठा शैलीची फिरंग पद्धतीची तलवार

काही तांत्रिक अडचणीमुळे एका मध्यस्थामार्फत ४७.१५ लाख रुपयांना ही तलवार लंडन येथे लिलावात जिंकण्यात आली. रघुजी भोसले यांची तलवार ही मराठा शैलीच्या फिरंग पद्धतीच्या तलवारीचा उत्कृष्ट नमुना आहे. सरळ, एकधारी पाते आणि सोन्याचे नक्षीकाम केलेली मुल्हेरी घाटाची मूठ ही तलवारीची वैशिष्ट्ये आहेत. तलवारीचे पाते हे युरोपीय बनावटीचे असून, पात्याच्या खजान्याजवळ पाते बनवणाऱ्या कंपनीचे नाव आहे. पात्याच्या पाठीवर तळाशी श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा फिरंग हा देवनागरी लेख सोन्याच्या पाण्याने लिहिलेला आहे. तलवारीच्या मुल्हेरी मुठीवर सोन्याच्या पाण्याने कोफ्तगरी नक्षी काढलेली आहे. तलवारीच्या उभट मुसुमेला हिरव्या रंगाचे कापड गुंडाळलेले आहे.

# पत्नी माहेरी गेल्याने गतिमंद मुलाचा खून

## मृतदेह सासरी ठेवून पळ काढण्याचा प्रयत्न

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

पत्नी माहेरी गेल्याच्या रागातून आणि दारूच्या नशेत आपल्या आठ वर्षांच्या मतिमंद मुलाचा गळा दाबून खून केला. त्यानंतर मुलाचा मृतदेह गोणीत टाकून पत्नी व सासू राहत असलेल्या घरी नेऊन ठेवत पळ काढला.



मंगलमूर्तीनगर, जेलरोड येथे राहणारा सुमित पुजारी हा पत्नी सारिका व तीन मुलांसह वास्तव्यास होता. सततच्या कौटुंबिक वादामुळे त्याची पत्नी माहेरी गेली होती. मंगळवारी (दि. २९) दुपारी सुमित पुजारी याने दारूच्या नशेत आपला आठ वर्षांचा मुलगा गणेश याचा गळा दाबून खून केला. गणेश हा जन्मापासून अपंग होता व सध्या नवीन मराठी शाळेत इयत्ता तिसरीमध्ये शिक्षण घेत होता. मुलाचा खून केल्यानंतर सुमितने मृतदेह एका गोणीत टाकून तो गोणीसह पत्नी व सासू राहत असलेल्या आम्रपाली झोपडपट्टीतील घरात नेऊन ठेवला.

मृतदेह ठेवून सुमित तिथून पळून जात असतानाच पत्नी व सासूने आरडाओरडा /-...४

## महत्त्वाचे



### सर्वाधिक ऑनलाइन सेवा पुरविल्याबद्दल लासलगाव ग्रामपंचायतीचा सन्मान

**लासलगाव :** नाशिक जिल्हा परिषदेच्या रावसाहेब थोरात सभागृहामध्ये नाशिक जिल्ह्यातून आरडीडीमार्फत ऑनलाइन उत्कृष्ट सेवा देणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा सन्मान सोहळा झाला. यावेळी लासलगाव ग्रामपंचायतीने जिल्ह्यात सर्वाधिक ऑनलाइन दाखले वितरित केले. त्याबद्दल ग्रामपंचायत अधिकारी लिंगराज जंगम यांना प्रकल्पाधिकारी डॉ. प्रतिभा संगमनेरे आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी निफाड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुकाराम जाधव आणि सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील यांचाही गौरव करण्यात आला. यावेळी सेवा हमी कायद्याची शपथ घेण्यात आली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, आज ज्या ग्रामपंचायत अधिकारी यांचे सेवा हमी कायदा २०१५ अंतर्गत सर्वाधिक दाखले वितरित केले आहेत, त्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येत आहे. त्यांच्या या कार्याची दखल म्हणून वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन सेवा पुस्तकामध्ये नोंद घेण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.



### ना. झिरवाळांकडून चव्हाण कुटुंबाचे सांत्वन

**दिंडोरी :** वनारवाडी येथे बिबट्याने युवतीचा बळी घेतल्याच्या घटनेनंतर अन्न व नागरी पुरवठामंत्री नरहरी झिरवाळ यांनी घटनास्थळी भेट दिली. अधिकाऱ्यांना बिबट्या शोधासाठी सर्च ऑपरेशन राबविण्याच्या सूचना दिल्या असून, पीडित चव्हाण कुटुंबीयांचे सांत्वन केले. घटनेनंतर ग्रामीण रुग्णालयात खासदार भास्कर भगरे यांनी भेट घेत कुटुंबीयांचे सांत्वन केले, तर मंत्री झिरवाळ यांनी चव्हाण यांचे वस्तीवर जाऊन कुटुंबीय, नातेवाइकांची भेट घेत सांत्वन केले. झिरवाळ यांनी वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थांची संयुक्त बैठक घेत उपाययोजनांबाबत चर्चा केली. झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना बिबट्या शोधमोहीम राबविण्यास सांगितले. बिबट्या रेस्क्यू टीम दाखल झाली असून, रात्रीपासून शोधमोहीम राबविण्यात येणार आहे. यावेळी बाळासाहेब जाधव, प्रकाश शिंदे, विश्वासराव देशमुख, दत्तू भेरे, गंगाधर निखाडे, रवी जाधव, गुलाब तात्या जाधव, जयवंत जाधव, प्रतीक जाधव, कृष्णा मातेरे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांनी वनविभागच्या अधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करीत पिंजरा लावण्याची मागणी केली.

### मोहाडी येथे श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी

**दिंडोरी :** दिंडोरी प्रणीत श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक बालसंस्कार केंद्राच्या मार्गदर्शनाने मोहाडी येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात श्री स्वामी समर्थ यांच्या १४७ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम पार पडला. श्री लक्ष्मीनारायण मंदिरात श्री स्वामी चरित्रसारामृत ग्रंथाचे सामुदायिक पारायण केले. नंतर साडेदहाला नंदकुमार डिंगोरे यांच्या हस्ते पूजन करण्यात करून प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी संगीता डिंगोरे, भारती डिंगोरे, सुनीता गाडगीळ, सानिका गाडगीळ, गायत्री गाडगीळ, मधुरा डिंगोरे, गायत्री डिंगोरे, भाग्यश्री हिरवे, अपर्णा डिंगोरे, राजेश्वरी काठे, दीपाली डिंगोरे, कुणाल डिंगोरे आदी समर्थ सेवेकरी उपस्थित होते.






### मराठी पत्रकार संघाचे तहसीलदारांना निवेदन

**दिंडोरी :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेला भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ तहसीलदार मुकेश कांबळे यांना तालुका मराठी पत्रकार संघातर्फे तसेच भारतीय माजी सैनिक संघातर्फे निवेदन देण्यात आले. यावेळी दिंडोरी तालुका पत्रकार संघाचे विलास ठाकणे, नितीन गांगुर्डे, भगवान गायकवाड, संतोष कथार, मनोज पाटील, प्रमोद ठेपणे, श्रीराम देवकर यांच्यासह माजी भारतीय सैनिक संघाचे संदीप गोसावी, भारत खांदवे, गणपत जाधव, चंद्रभान कळमकर, खंडेराव आहेर, राजाराम देशमुख, कारभारी भवर आदी उपस्थित होते.




### कळवण येथे दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**कळवण :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या बेछूट गोळीबाराचा कळवण येथे त्रिदल आजी-माजी सैनिक संघाने तीव्र निषेध करत कळवण पोलीस निरीक्षक खगेंद्र टेंभे यांना निवेदन दिले. यावेळी दहशतवाद्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. कळवण बसस्थानक येथून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत पायी मोर्चा काढत हल्ल्यात मृत पावलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मोर्चात कळवण तालुका त्रिदल आजी-माजी सैनिक संघाचे भास्कर पवार, धर्मा आहेर, गोविंद पगार, शिवाजी आहेर, भिला बच्छाव, हिरामण देवरे, उमेश जाधव, रघुनाथ पगार, अर्जुन पाटील, बाळासाहेब गांगुर्डे, सुकदेव पगार, दगाजी राजगिरे, सावळीराम बागुल, जगन्नाथ शिंदे, कडू पगार, अनिता कदम, सुमती आठवले आदी उपस्थित होते.

### लासलगाव येथे उद्या व्यसनमुक्ती शिबिर

**लासलगाव :** महाराष्ट्र दिन तथा कामगार दिनी (दि. १) सकाळी १० ते १ वाजेपर्यंत लासलगाव येथील शीलामोती बहुद्देशीय संस्थेतर्फे व्यसनमुक्ती शिबिर आयोजित करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. चारुदत्त मोतीराम आहिरे यांनी दिली आहे. शिबिरात ज्यांना दारूचे व्यसन जडले आहे, त्यांच्यासाठी पाच दिवसांची मोफत औषधे देण्यात येणार आहे. तसेच व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याप्रसंगी शीलामोती संस्थेच्या व्यसनमुक्ती केंद्राचे देखील उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. शिबिर शीलामोती, स्वस्थ जलमिशन, डॉ. आहिरे हॉस्पिटल, विद्यानगर येथे होणार आहे.

# नांदगाव तालुक्याचा घसा कोरडा

## धरणांतील जलसाठा ४० टक्क्यांच्या आत; ९ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**पळाशी : यशवंत ताडगे**

उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याने सूर्य आग ओकत आहे. नांदगाव तालुक्याचा तापमानाचा पारा ४० ते ४२ अंशांवर गेला आहे. लहान-मोठ्या धरणांतील जलसाठा ४० टक्क्यांच्या आत आला आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या योजना मृगजळ ठरत आहेत.



तालुक्यात सद्यस्थितीत ३८ वाडे-पाडे व गावांना ९ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. गिरणा धरणातील जलसाठा अवघ्या ३० टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. तर नांदगाव तालुक्यातील पळाशी, सावरगाव, मंगळणे, वेहेळगाव व चाळीसगाव तालुक्यांतील २८ गावांना वरदान ठरणाऱ्या मन्याड धरणाचा जलसाठा अवघा २८ टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. तालुक्यातील मध्यम प्रकल्प माणिकपुंज, नाग्यासाक्या बंधारे, लोहशिंगवे, कासारी, भालूर, रणखेडा यातील जलसाठा २५ टक्क्यांच्या आत आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या योजनांचे उद्भव स्रोत कोरडे पडले आहेत. काही पाणीपुरवठा योजना मृगजळ ठरत आहेत. नांदगाव व मनमाड शहराला आठ दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे. आमदार सुहास कांदे यांनी नांदगाव शहरासाठी नवीन गिरणा धरणाचा जलसाठ्यातून तर मनमाडसाठी करंजवण धरणातून मंजूर करून आणलेली पाणीपुरवठा योजना प्रगतीपथावर आहे. नांदगाव तालुक्यातील गिरणा धरणाच्या जलसाठ्यातून नांदगाव तालुक्यातील नांदगाव शहरासह न्यायडोंगरी, मालेगाव शहर, ५६ खेडी पाणीपुरवठा योजना व जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव शहर, चाळीसगाव, भडगाव, पाचोरा तालुक्यांतील गावांना पाणीपुरवठा केला जातो. जळगाव एमआयडीसी, नांदगाव तालुक्यातील ५६ खेडी पाणीपुरवठा योजना आधारित आहे. गिरणा धरणाच्या जलसाठ्यातून जळगाव जिल्ह्यासाठी तीन आवर्तन सोडल्याने व वाढत्या तापमानामुळे पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे गिरणा धरणाचा जलसाठा अवघ्या ३० टक्के आहे. अजून जळगाव जिल्ह्यासाठी दोन आवर्तने सोडण्यात येतील. पाणी सोडल्याने जलसाठ्यावर परिणाम होणार आहे. एका आवर्तनातून ५ टक्के जलसाठा कमी होत असतो. गेल्या काही महिन्यांत सिंचनासाठी गिरणा धरणातून तीन आवर्तने सोडण्यात आली आहेत. त्यामुळे धरणाचा जलसाठा १०० टक्क्यांवरून थेट ४७.६४ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. पुढील तीन महिने उन्हाचा प्रभाव कायम राहणार असल्याने धरणातील पाणी टिकवणे मोठे आव्हान ठरणार आहे. मागील वर्षी चांगल्या पावसामुळे जिल्ह्यातील बहुतेक धरणांमध्ये समाधानकारक जलसाठा होता. गिरणा धरण १०० टक्के भरले होते, मात्र पावसाळ्यापूर्वी ते फक्त ११ टक्के शिल्लक राहिले होते. गिरणा धरण १९६९ मध्ये पूर्ण झाल्यापासून गेल्या ५३ वर्षांत १४ वेळा पूर्ण क्षमतेने भरले आहे. यंदा गिरणा धरणातून सिंचनासाठी ३ आणि बिगर सिंचनासाठी ४ असे एकूण ७ आवर्तने सोडण्याचे नियोजन आहे. त्यातील ३ आवर्तने आतापर्यंत सोडण्यात आल्याने धरणाचा जलसाठा मोठ्या प्रमाणात घटला आहे. गिरणा धरणातून ५०,००० हेक्टर सिंचन क्षेत्र, मालेगाव महानगरपालिका, नांदगाव, चाळीसगाव आणि इतर शहरे तसेच १५४ गावांच्या पाणीपुरवठा योजनांचा समावेश आहे. धरणाची एकूण २१,५०० दलघफू क्षमतेपैकी सध्या ८,८१३ दलघफू पाणी शिल्लक आहे.

नांदगाव पाणीटंचाई कृती आराखडा तयार करण्यात आला असून, एप्रिल ते जूनदरम्यान ७४ वाड्यांना ३६ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. परंतु या शासकीय आकडेवारीपेक्षा वास्तविकता अनेक वाडे-पाडे येथे पाणीटंचाई जाणवत आहे. ग्राउंड लेव्हलवर जाऊन पाणीटंचाई असलेल्या गावांचा समावेश केला नाही असे दिसते. काही गावांचा टँकर प्रस्ताव तयार करण्याच्या तयारीत आहे. काही ठिकाणी विहीर अधिग्रहण करण्यात आले आहे. त्या विहिरींचे पाणी पिण्यालायक आहे की नाही, याबद्दल तालुक्यातील यंत्रणा अनभिज्ञ आहे.

नांदगाव तालुक्यातील गावांमध्ये जिल्ह्यात सर्वांत जास्त टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो. मागील वर्षी नांदगाव तालुक्यात ६० गावांना ७७ टँकरद्वारे ३३८ वाड्यावस्त्यांना १७० फेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा केला जात होता. यंदा पंचायत समितीच्या वतीने पाणीटंचाईवर मात करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला असून, एप्रिल ते जूनदरम्यान ३३ गावे ७४ वाड्यांना ३६ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

**टँकर प्रस्ताव प्राप्त गावे**

बाणगाव बुद्रुक, बाणगाव खुर्द, बोलठाण, गोंदेगाव, जवळकी, खर्डी, धोटाणे खुर्द, खिर्डी, मल्हारवाडी. संभाव्य टंचाईग्रस्त गावे : दहेल, कोंढार जवळकी, जळगाव खुर्द, अनकवाडे, वंजारवाडी, बोराळे, गोंडेगाव, हिसवळ बुद्रुक, क्रांतीनगर, भालूर, खिर्डी, टाकळी बु., हिंगणवाडी, भौरी, बोयेगाव, वडाळी बुद्रुक, वडाळी खुर्द, थोटाणे, पानेवाडी, माळेगाव क., सटाणे, नागापूर, बाबूळवाडी, खादगाव, वाखारी, नावेपांझण, अस्तगाव, बोलठाण, मूळडोंगरी, पांझणदेव, कन्ही, एकवई, जळगाव खुर्द, शास्त्रीनगर, हिसवळ खुर्द, ढेकू खुर्द, कुसुमतेल, पळाशी येथील वाड्यावस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागणार आहे.

## जानोरीत ऐतिहासिक बोहडा उत्सव सुरू

### युवकांचा यात्रेसाठी मोठ्या प्रमाणात पुढाकार

**जानोरी : वार्ताहर**

दिंडोरी तालुक्यातील जानोरी येथे ऐतिहासिक व पारंपरिक बोहडा उत्सवाला मंगळवारी (दि. २९) सुरुवात झाली.



शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या या उत्सवाची दंतकथा अशी आहे की, गावात शिंपी समाजाचे एकनाथ व सोमनाथ हे गृहस्थ होते. एकदा हे दोघे वणी गावाच्या दिशेने जात असताना पायवाटेच्या कडेला झाडाझुडपांमध्ये लहान मुलाचा रडण्याचा आवाज आला. त्यांनी शोध घेतल्यावर त्यांना एका लहानशा पेटीत मुलगी दिसली. तिला ते स्वतः घरी घेऊन आले. तिचे पालनपोषण करण्यास सुरुवात केली. काही वर्षांनी जेव्हा ती उपवर झाली तेव्हा एकनाथ व सोमनाथ यांना तिच्या विवाहाची चिंता वाटू लागली. त्यांनी विवाहाचा विषय तिच्यापुढे मांडला, तेव्हा तिने माझा विवाह करणारे तुम्ही कोण आहात? असा उलट प्रश्न केला व तिथेच अंतर्धान पावली. काही दिवसांनी तिने एकनाथ व सोमनाथ यांना दृष्टांतात या उत्सवाची आज्ञा दिली व आज्ञेप्रमाणे या उत्सवास सुरुवात झाली. या उत्सवाची सुरुवात गोंधळी-भराडीने होते. पहिल्या रात्री गणपती व विचारी सोंगे नाचवली जातात. दुसऱ्या दिवशी रात्री गणपती व नाच्या यांची मिरवणूक काढली जाते. प्रत्येक दिवशीची सुरुवात गणपती व नाच्या यांच्या लढाईने सुरू केली जाते. नंतर मत्स्य व शंकासुर यांची लढाई असते. तसेच खंडेराव व मलमल्य यांचे युद्ध व भैरवनाथाची मिरवणूक काढली जाते. तसेच सारजा-वेताळ, वाघ-एकादशी, दक्षराजा-वीरभद्र, नरसिंह-हिरण्यकश्यपू इत्यादी जोडप्यांचे युद्ध खेळवले जातात.

शेवटच्या दिवशी सारजा-वेताळ, रावण- बकासुर, वराह-हिरण्यकश्यपू, कच्छ-राणा अशा विविध जोडप्यांचे एकामागोमाग एक युद्ध खेळवली जातात. उत्सवाचा शेवट जगदंबामाता-म्हैशासुर, जगदंबा माता लढाईने होतो. लढाई संपल्यावर गावात जगदंबा मातेची मिरवणूक काढण्यात येते. सायंकाळी कुस्त्यांची दंगल आयोजित केली जाते.

## निफाडला घरफोडीत २ लाखांचा मुद्देमाल लंपास

**निफाड : तालुका प्रतिनिधी**

येथील अकोलखास गल्लीतील सुरेखा टाटिया यांच्या घरी धाडसी चोरी झाली असून, रोख रकमेसह २ लाख ४७ हजारांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. याबाबत टाटिया यांनी निफाड पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे. टाटिया कुटुंब गावाला गेले असताना दिनांक २८ रोजी रात्री अकोलखास गल्लीतील घरात अज्ञात चोरट्यांनी कडी-कोयंडा तोडून प्रवेश केला. घरातील किचनमध्ये असलेल्या कपाटाचे लॉक तोडून कपाटात असलेले २५ हजार रुपये रोख व सोन्या-चांदीचे दागिने असे एकूण २ लाख ४७ हजारांचा मुद्देमाल चोरी केल्याची फिर्याद दिली आहे. घटनास्थळी पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास सुरू आहे.



## जव्हार येथे कोकणा सांस्कृतिक समाजाचे महासंमेलन

**दिंडोरी : प्रतिनिधी**

आदिवासी कोकणा, कोकणी व कुकणा समाजाचे दुसरे वैचारिक एकता व सांस्कृतिक महासंमेलन जव्हार येथील राजीव गांधी स्टेडियमवर पार पडले. यावेळी महाराष्ट्र, सिल्वासा, दादरानगर हवेली, गुजरात येथून हजारो कोकणा, कोकणी, व कुकणा समाज उपस्थितीत होते.

यावेळी हनुमान पॉइंट येथील खंडेराव मंदिरापासून सांस्कृतिक महारॅली काढण्यात आली. त्यानंतर राजीव गांधी स्टेडियम येथे भव्य वैचारिक व सांस्कृतिक महासंमेलनाचे उद्घाटन हिरवा देव व आदिवासी क्रांतिकारक यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले, तसेच देवधून त्रैमासिकचे प्रकाशन व वधू-वर सूचक ऑनलाइन ॲपचे अनावरण करण्यात आले. यावेळी कोकणा सामाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व उच्च शिक्षण घेऊन पुढे आलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.



## दिंडोरीत हल्ल्याच्या निषेधार्थ रास्ता रोको

**दिंडोरी : वार्ताहर**

पहलगाम येथील भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ येथे सर्वपक्षीय व नागरिकांनी दिंडोरी चौफुलीवर रास्ता रोको करत तीव्र निषेध व्यक्त केला. 'पाकिस्तान मुर्दाबाद' आदी घोषणा यावेळी देण्यात आल्या.

याप्रसंगी सतीश देशमुख, नगरसेवक नितीन गांगुर्डे, हेमंत पगारे, रणजित देशमुख, श्याम मुरकुटे, उज्ज्वला उगले, संतोष मुरकुटे, अमर राजे, मनोज ढिकले, अमोल उगले, प्रशांत मोगल, नीलेश शिंदे, मित्रानंद जाधव, आप्पा वटाणे, छबू मटाले, सागर पगारे, पंकज देशमुख, प्रवीण देशमुख, सलीम मिर्झा, सागर पवार, विकी मवाळ, शांताराम जाधव आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## म्हाळसाकोरे येथील जलकुंभ जमीनदोस्त



**म्हाळसाकोरे : वार्ताहर**

म्हाळसाकोरे गावाला ३२ वर्षांपासून पाणीपुरवठा करणारा जलकुंभ जीर्ण झाल्याने मोडकळीस आला होता. कोणत्याही क्षणी कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता होती म्हणून ग्रामपंचायतीने तो निर्लिखित करून पाडण्यात आला.

ग्रामपंचायतीने गावाला पाणीपुरवठा व्हावा म्हणून १९८० ला ६० हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाचे काम केले. त्या काळात म्हाळसाकोरे गावात बहुजन युवा संघटना पै. डॉ. अब्बास पठाण यांच्या नेतृत्वाखाली तरुणांचे संघटन झाले होते. या टाकीचा स्लॅब याच तरुणांनी १३०० रु. ला टाकण्याचे काम केले होते. या जलकुंभाच्या नळयोजनेची देखभाल व दुरुस्ती डॉ. पठाण यांनी प्रथम केली होती. सिमेंट पाइपलाइन लिकेज काढणे म्हणजे महाजिकिरीचे काम असे तत्कालीन ग्रा. पं. शिपाई भानुशेठ बाजारे व सुभाष जाधव यांनी मोटार चालू करणे ते पाणी चालू-बंद करणे ही सेवेची कामे केली. सन १५-१६ मध्ये नवीन नळयोजना मंजूर झाली. त्यामुळे या जलकुंभाचे अस्तित्व संपुष्टात आले. मागील तीन दशके या जलकुंभातून गावाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला.

४५ वर्षांनंतर हा जलकुंभ जमीनदोस्त करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवण्यात आला.२६ एप्रिल रोजी तो जमीनदोस्त करण्यात आला. या ठिकाणी ग्रामपंचायतीची विस्तीर्ण जागा आहे. पडीक जागेवर अतिक्रमण होऊ शकते त्यासाठी ग्रामपंचायतीने जागेला तार कंपाउंडने बंदिस्त करावे किंवा येथे ग्रीन जिम व गार्डन व्हावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

## बाजारात टरबुजाची 'लाली' कायम

**मालेगाव : वार्ताहर**

तालुक्यासह कसमादेतील शेतकरी शेतीत नवनवीन प्रयोग करीत असून, त्यांचा फळपिकांकडे कल वाढला आहे. उन्हाळ्यात मागणी असलेल्या टरबुजाची कसमादेत ८८० हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे. बाजारात टरबुजाचे भाव टिकून असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतात पालेभाज्या, मिरची, वांगे, शेवगा, टोमॅटो, ड्रॅगन फूड आदी पिकांची लागवड करून भरघोस उत्पन्न काढत आहे. त्यातच उन्हाळ्याच्या दिवसांत टरबुजाला मोठ्या प्रमाणात मागणी असते. त्यामुळे कसमादे पट्ट्यात ८८० हेक्टर क्षेत्रावर यंदा टरबूज पिकाची लागवड करण्यात आली आहे. शहरासह तालुक्यातील उन्हाचा पारा ४३ अंशांपर्यंत पोहचला आहे. या दिवसांत थंड शीतपेयांची मागणी वाढली आहे.

नागरिक उन्हापासून बचावासाठी फळे खाणे पसंत करतात. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये टरबुजाला बाजारात वाढती मागणी आहे. शहरातील सोमवार बाजार, एकात्मता चौक, टेहरे चौफुली, सटाणा नाका, रावळगाव नाका, सरदार चौक आदींसह रस्त्यावर शेतकरी बांधव किरकोळ टरबूज विक्री करताना दिसून येतात.

२० रुपये किलो व ३०-४० रुपये नगाने मोठे टरबूज विक्री होत आहेत. त्याचप्रमाणे व्यापारी थेट बांधावरून माल खरेदी करत असल्याने बाजारात टरबुजाची लाली कायम असल्याने शेतकऱ्याला आर्थिक फायदा होत आहे.

बाहुबली टरबुजाची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. कमी क्षेत्रात जास्तीचे उत्पादन शेतकऱ्यांना मिळत असल्याने बळीराजाची आर्थिक परिस्थिती काही अंशी सुधारली आहे.

## पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**चांदवड :** तालुक्यातील दुगाव स्मशानभूमीजवळ उसवड-दुगाव रस्त्यावर दिनांक २१ एप्रिल रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास एका अज्ञात पिकअपचालकाने निष्काळजीपणे वाहन चालवत दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले आहेत. फिर्यादी कृष्णा योगेश सोनवणे, रा. दुगाव यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे वडील त्यांच्या हिरो कंपनीच्या स्प्लेंडर दुचाकी क्रमांक एम.एच. १५/ ई. यू. ०३८७ ने प्रवास करत असताना समोरून आलेल्या पिकअप गाडी क्रमांक एम.एच. ४६/ ई. ४००८ ने त्यांना धडक दिली. या धडकेत त्यांचे वडील रस्त्यावर पडल्याने त्यांच्या डोक्याला, मानेला आणि हातपायांना गंभीर जखमा झाल्या आहेत. कृष्णा सोनवणे यांनी त्वरित आपल्या वडिलांना उपचारासाठी वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये दाखल केले.



## प्रवाशांचे शिक्षणमंत्री भुसेंना निवेदन

**मालेगाव : प्रतिनिधी**

पहाटे ५ च्या मालेगाव-सुरत बसमध्ये मालेगाव येथून दाभाडी गावाकडे जाणाऱ्या प्रवाशांना बसू दिले जात नसल्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाचे वातावरण आहे. यासंदर्भात प्रवाशांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांची भेट घेत आपली कैफियत मांडली.

मुंबई, पुण्याहून आलेले अनेक प्रवासी पहाटे येथील मोसम पुलावर उतरतात. तेथून ते दाभाडी, आघार गावाकडे जाण्यासाठी पहाटे ५ च्या सुरत बसची वाट पाहत असतात. परंतु, सुरत बसचे चालक व वाहक हे दाभाडी, आघार गावात जाणाऱ्या प्रवाशांना बसमध्ये बसू देत नाहीत. अनेक वेळा प्रवासी, आम्ही सटाण्याचे तिकीट काढतो असे सांगतात. तरीही त्यांना बसमध्ये प्रवेश नाकारण्यात येतो. अनेकदा सुरत बस दाभाडी येथे प्रवाशांसाठी थांबते. तर मग मालेगाव येथून दाभाडी गावासाठी बसमध्ये चढणाऱ्या प्रवाशांना का नाकारले जाते, असा प्रश्न प्रवाशांनी उपस्थित केला आहे. यासंदर्भात कुणाल आहिरे, मयूर शिंपी, गणेश शिंपी, स्वप्निल निकम, प्रमोद निकम, हर्षल शिरोडे, अजय निकम यांच्यासह प्रवाशांनी शिक्षणमंत्री भुसे यांची भेट घेत निवेदन दिले.



# कामटवाडे खूनप्रकरणी तीन तरुण व दोन अल्पवयीन संशयित ताब्यात

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

कामटवाडे परिसरात करण उमेश चौरे या अल्पवयीन मुलाचा दगडाने ठेचून खून करण्यात आला होता. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या ४ तासांच्या आत नाशिक शहर गुन्हे शाखा युनिट -१ ने तत्काळ कारवाई करत तीन तरुणांसह दोन विधिसंघर्षित बालकांना अटक केली आहे. मुख्य सूत्रधार हर्षद पाटणकर फरार आहे.

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कामटवाडे परिसरात करण उमेश चौरे (वय १७) या युवकाची सोमवारी (दि. २८) दुपारी पाच ते सहा जणांच्या टोळक्याने डोक्यात दगड व फरशी घालून निर्घृण हत्या केली. जुन्या वादातूनच ही हत्या झाली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार सतर्क झाले. पोलीस हवालदार विशाल काठे व प्रशांत मरकड यांना गुप्त माहितीच्या आधारे संशयित आरोपी गंगापूर येथील आसाराम बापू पुलाजवळ थांबले असल्याचे समजले. पोलीस पथकाने त्वरित त्या ठिकाणी धाव घेतली असता पाच जण पळून जात असताना त्यांना ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्यांनी खून केल्याची कबुली दिली.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये मोहन वायचळे (वय १८), राहुल गडदे (वय २०), साहिल जाधव (वय २१) व दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. त्यांनी सराईत गुन्हेगार हर्षद पाटणकरच्या सांगण्यावरून खून केल्याचे उघड झाले आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, सुदाम सांगळे, सपोनि हिरेमण भोये, पोहवा प्रवीण वाघमारे, प्रशांत मरकड, विशाल काठे, योगीराज गायकवाड, नाझीमखान पठाण यांच्यासह पथकाने केली. अटक केलेल्या आरोपींना अंबड पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# गौरव रथ कलश यात्रेचे चांदवडला स्वागत

**चांदवड : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आयोजित केलेल्या महाराष्ट्र गौरव रथ मंगल कलश यात्रेचे चांदवड शहरात तालुकाध्यक्ष रघुनाथ आहेर, सुनील कबाडे, दशरथ ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली भव्य स्वागत केले.



यावेळी मंत्री नरहरी झिरवाळ, आ. पंकज भुजबळ, आ. दिलीप बनकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पगार, विद्यार्थी सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, उत्तर महाराष्ट्र विद्यार्थी सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रसाद सोनवणे, महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा बलकवडे, डॉ. योगेश गोसावी, सुजित सोनवणे, रघुनाथ आहेर, आर. डी. थोरात, यू. के. आहेर, सुनील कबाडे, गोकुळ देवरे, दशरथ ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे इतर प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यात्रेची सुरुवात चांदवडच्या श्री रेणुका माता मंदिरापासून झाली. मान्यवरांनी देवीचे दर्शन घेतले आणि अहिल्यादेवी होळकर व श्री रेणुका माता यांचे कलश स्वीकारले. रेणुका देवी ट्रस्टचे व्यवस्थापक सुभाष पवार यांनी मान्यवरांचा सत्कार केला. रेणुका माता मंदिरासमोर सनईच्या सुरात कार्यकर्त्यांनी नृत्य करत जल्लोष केला. मंत्री नरहरी झिरवाळ, आ. दिलीप बनकर, जिल्हाध्यक्ष ॲड. रवींद्र पगार आणि कार्यकर्त्यांनी ठेका धरला.

# गुणवंत विद्यार्थी देशाचे वैभव : विश्वासराव मोरे

**पिंपळगाव बसवंत : वार्ताहर**

प्रत्येक क्षेत्रातले गुणवंत विद्यार्थी हे देशाचे वैभव आहे. मुलांनी प्रचंड कष्ट घेऊन यश मिळवले पाहिजे, असे प्रतिपादन मविप्र समाजाचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे यांनी केले.

कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालयात ११ वी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र मोरे, प्राचार्य डॉ. सुरेश जाधव, उपप्राचार्य दिलीप माळोदे, विभागप्रमुख प्रा. संपतराव कदम, प्रा. शशिकांत घुटे, प्रा. यशवंत शिरसाठ, प्रा. विजय जाधव आदी उपस्थित होते. यावेळी ११ वी विज्ञान, वाणिज्य, कला व एचएसव्हीसी विभागात प्रथम आलेल्या श्रुती वाघ (विज्ञान ८५.५०%), ऋतुजा जाधव (कला ७८.३३%), खान मेहनूर अब्दुल मोबीन, (वाणिज्य ८७.१७), अश्विनी शिंदे (८८.३३%) या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन अजित देशमुख यांनी तर आभार प्रा. राजेंद्र खांडगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. योगेश कातकाडे, प्रा. संदीप आहेर, प्रा. मीनाथ कासार, प्रा. कैलास घुमरे, प्रा. सुवर्णा सूर्यवंशी यांच्यासह अनेकांनी मेहनत घेतली.

## तीन लाख रुपयांसाठी पत्नीचा छळ

**पंचवटी : वार्ताहर**

घराची गॅलरी बांधण्यासाठी माहेरून तीन लाख रुपये आणावे यासाठी पतीने आपल्या पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महिलेने म्हसरूळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. फिर्यादी महिलेच्याआई वडीलांकडुन पतीचे घराची गॅलरी बांधण्यासाठी तीन लाख माहेरून आणावे, या कारणावरून शिवीगाळ करून रात्री-बेरात्री मारहाण करत आई -वडिलांनी लग्नात दिलेले सोने -चांदीचे दागिने पतीने बळजबरी काढून घेत शारीरिक व मानसिक छळ करून घरातून काढून दिले. याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## जिल्हाधिकारी करणार रस्त्यांची पाहणी

**नाशिक : प्रतिनिधी**

त्र्यंबकेश्वरसाठी मुंबई-आग्रा महामार्गावरून थेट सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी घोटी मार्गे पहिने-त्र्यंबकेश्वर या मार्गाची पाहणी जिल्हाधिकारी करणार आहेत. जिल्हाधिकारी जलज शर्मा हे नॅशनल हायवे अॅथोरिटी यांची पाहणी करणार आहेत. त्यात प्रामुख्याने त्र्यंबकेश्वर-नाशिक, घोटी-पहिने-त्र्यंबकेश्वर, त्र्यंबकेश्वर ते जिल्हा हद्दीपर्यंत जव्हार या मार्गाच्या विकासाच्या दृष्टीने पाहणी व उपाययोजनांवर चर्चा करणार आहेत. तसेच शहराभोवतीच्या रिंगरोडची पाहणीदेखील करण्याचा मानस असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

**महावितरण** — **ई-निविदा सुचना-०१ (२०२५-२६)**

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय नाशिक अंतर्गत महावितरण मधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन T - १२६ III rd call २०२४-२५ व T- ०१/२०२५-२६ ते T- ०९ / २०२५-२६ ही निविदा नाशिक तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध ठिकाणी स्थापत्य देखभालीची कामे, विविध विभागीय कार्यालय आणि सबस्टेशन परिसरातील स्थापत्य कामे करण्या करीता ई-निविद मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (http://etender.mahadiscom.in/eatApp) दि. ३०.०४.२०२५ ते ०६.०५.२०२५ दुपारी १३:०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. ही निविदा दि. ०६.०५.२०२५ रोजी १४.०० वाजे पर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. ०६.०५.२०२५ रोजी १५.०० वाजता (शक्य असल्यास) उघडण्यात येतील. निविदा संदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य विभाग नाशिक भ्रमणध्वनी ९२०९००१८४५ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते कि महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करुन घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुध्दी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Annoucements" मध्येच कळविण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

पी.आर.ओ.नं. १२६ दि. २८.०४.२०२५ — सही/-

कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, मराविविकंम, नाशिक

**The Nasik Road Deolali Vyapari Sahakari Bank Ltd.**

"Kalpavruksha", Asha Nagar, NashikRoad-422101 www.ndvsbank.com,Email:info@ndvsbank.com Phone No: 0253-2462569, 2450002

**TENDER NOTICE**

The Nasik Road Deolali Vyapari Sahakari Bank Ltd., Nashik Road inviting sealed Tender for 1) Information Security Audit (IS) 2) Vulnerability Assessment and Penetration Testing (VAPT) from reputed Vendors. Vendors may contact at the Bank above Email to obtain the Softcopy of "Request for Proposal" at Cost of Rs.500/- (Rs. Five Hundred only). Submit the desired information in the prescribed form along with D.D. of Rs.20000/- (Rs Twenty Thousands only) in favor of bank towards EMD at the address mention above on or before 09/05/2025 by 5PM Latest. No Tenders will be entertained after stipulated time. The Bank reserves the rights to accept or reject any or all Tender applicants without assigning any clarification.

**Mr. Datta Gaikwad**
**Chairman**

# गंगापूर धरणातून हजार क्यूसेक विसर्ग

**नाशिक : प्रतिनिधी**



गंगापूर धरण समूहातून मंगळवारी (दि.२९) एक हजार क्यूसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला. जलसंपदा विभागाने एकलहरे औष्णिक वीज केंद्र व इतर कामांसाठीचे नियोजित आवर्तन सोडले. गेल्या काही दिवसांपासून गोदावरी पात्रातून पाण्याचा प्रवाह होत नसल्याने नदीतील पाणी दूषित झाल्याचे चित्र होते. मात्र, मंगळवारी पाणी सोडताच गोदावरी खळाळून वाहत होती.

पंचवटीत देशभरातून भाविक स्नानासाठी व धार्मिक कार्य करण्यासाठी येत असतात. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून गोदावरी प्रदूषित झाल्याने गोदाप्रेमींसह नागरिकांकडून प्रशासनावर तीव्र संताप व्यक्त केला जातो आहे. काही दिवसांपासून एकाच ठिकाणी पाणी साचल्याने पाण्याचा रंग काळसर झाल्याचे चित्र होते. सोमवारी पाण्याचा विसर्ग करताच गोदावरी पुन्हा दुथडी भरून वाहू लागली. यावेळी पंचवटीतील छोट्या मंदिरांसह रामकुंड, लक्ष्मीकुंड पाण्याखाली गेली. शहरात गेल्या काही दिवसांपासून कडाक्याचे ऊन पडत असल्याने नागरिक उकाड्यामुळे हैराण झाले आहेत. परंतु गोदेला सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे नागरिकांना सुखद अनुभव मिळाला.

गोदावरीतील पाणवेलींचा प्रश्न मागील काही वर्षांपासून जटिल बनला आहे. मुख्यत: उन्हाळ्यात गोदापात्र पाणवेलींनी व्यापल्याचे जागोजागी दिसते. परिणामी, गोदा प्रदूषित होत आहे. सोमवारी पाण्याच्या प्रवाहात मोठ्या संख्येने पाणवेली पंचवटी परिसरात वाहून आल्या. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून सदर पाणवेली काढण्याचे काम सुरू होते. गोदावरी पात्रात पाणी आल्याने नागरिकांची पंचवटीतील गोदातीरी गर्दी झाली होती. गोदावरी पात्रात कोणीही थांबू नये, याबाबतची खबरदारी प्रशासनाने घेतली होती. ऐन उन्हाळ्यात गोदावरीला पूर आल्याचे चित्र मंगळवारी दिसून आले.

**मॅग फिनसर्व्ह कंपनी लि.**

"मॅग हाऊस", ललित मोहन बझार मागे लक्ष्मीनगर, फलटण.

**लिलाव नोटिस**

खाली नमूद केलेल्या कर्ज खाते क्रमांक असलेल्या कर्जदारांनी खाली नमूद केल्याप्रमाणे सोन्याच्या दागिन्यांच्या तारणावर सुवर्ण कर्ज सुविधा घेतली होती. या सर्व कर्जदारांनी थकबाकीची परतफेड केलेली नसल्याने कंपनीला कर्जदाराला थकबाकीची परतफेड करण्यास सांगणाऱ्या नोटिसा जारी कराव्या लागल्या. तथापि, कर्जदारांनी त्यांची थकबाकी परतफेड करण्यात/फेडण्यात अयशस्वी ठरल्याने मॅग फिनसर्व्ह कंपनी लिमिटेड कंपनीला त्यांच्या कडे तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करण्यात येत आहे

**नाशिक** प्रिया अशोक दराडे (01062610818001), पारसमल मणिकचंद साखला (01062608330002), (01062608336603), (01062613275601), हर्षद संतोष गवळी (01062609644801), वासंती पारसमल साखला (01062606870604), (01062605159703) विवेक सुधाकर केदारे (01062605595803) सुरेखा सतीश कोचे (01062611586101) संजय भीमा गरड (01062612738303), स्वप्नील नामदेव राठोड (01062609765003), संदीप वाल्मिक बर्वे (01062609145501), सुनीता कमल राठी (01062609189503), हिरेन मनसुखभाई देवलूक (01062613560201), अमित शांताराम बोडके (01062609946801), अमित शांताराम बोडके (01062613463001), निशांत बाळकृष्ण कालन (01062615079601), सुरेश बाबुराव कलाळ (01062613543001), नितिन कैलास पाटील (01062610599801), सागर सोमनाथ कहाणे (01062611384801), गणेश दिपक दराडे (01062611628201), मनोज चुनीलाल वर्मा (01062612615801), राकेशकुमार सुरेशभाई दळवी (01062612764801), सिद्धेश कमल राठी (01062613156201), भौतिक मुकेशभाई पटेल (01062613203901), (01062613428001), आयुब शहाबुद्दीन देशमुख (01062613252301), साहिल बिलाल पठाण (01062613291401), साहिल बिलाल पठाण (01062613363101), संदीप पोपट थोरात (01062613467701).

थकबाकीदार कर्जदारांना ही सूचना प्रकाशित झाल्यानंतरही सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकी परतफेड करण्याचा आणि त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा पर्याय दि **२९ एप्रिल २०२५** पर्यंतच असेल. थकबाकीदार ग्राहकाकडून **२९ एप्रिल २०२५** नंतर मिळालेली कोणतीही रक्कम ही थकबाकीची परतफेड म्हणून मानली जाणार नाही. लिलाव प्रक्रियेनंतर ही रक्कम समायोजित केली जाईल. तथापि **३१ मार्च २०२५** रोजी किंवा त्या नंतर बंद झालेल्या / होणाऱ्या थकबाकीदार कर्जदारांना प्रमाणित प्रकाशन शुल्क अदा करावे लागेल.

वर नमूद केलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव **मॅग फिनसर्व्ह कंपनी लिमिटेड, "मॅग हाऊस", ललित मोहन बाजारमागे, लक्ष्मीनगर फलटण येथे दिनांक: ३० एप्रिल २०२५ वेळ:०२.०० दुपारी होईल.** इच्छुक बोलीदारांना **३० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी १२.००** वाजेपर्यंत सोन्याच्या दागिन्यांची तपासणी करण्यासाठी आणि त्यांची बोली सादर करण्यासाठी आमंत्रित केले जात आहे. सोन्याचा लिलाव "जसा आहे तसा" आधारावर केला जाणार आहे. लिलाव कंपनीने घालून दिलेल्या प्रक्रियेनुसार आणि अटी आणि शर्तींनुसार केला जाईल. थकबाकी असलेल्या खात्यांचा लिलाव जर लिलावाच्या दिवशी पूर्ण झाला नाही, तर त्यांचा लिलाव पुढील सूचना न देता त्यानंतरच्या दिवशी केला जाईल. लिलावाच्या संबंधित कंपनीच्या अटी आणि शर्ती बदलण्याचा कंपनीला पूर्ण अधिकार आहे. लिलावात सहभागी होणे आणि बोली स्वीकारणे याबाबतचे सर्वाधिकार कंपनीला असतील. मॅग फिनसर्व्ह कंपनी लिमिटेडला पूर्व माहितीशिवाय लिलाव यादीतून कोणतेही थकबाकीदार खाते काढून टाकण्याचा अधिकार आहे आणि पूर्व सूचना न देता लिलावाची तारीख रद्द करण्याचा/बदलण्याचा अधिकार देखील आहे. बोलीदारांना लिलावाच्या कारवाईच्या दिवशी मूळ कागदपत्रासह त्यांच्या फोटो-ओळख, स्वाक्षरी आणि पत्त्याच्या पुराव्याची प्रत सादर करण्याची विनंती केली जाते. बोलीदारांना त्यांच्या ऑफरसोबत १,००,०००/- रुपयांचा ईएमडी म्हणून पे ऑर्डर जोडणे आवश्यक आहे.

**तारीख : २६/०४/२०२५** — **अधिकृत अधिकारी**

**स्थळ : फलटण** — **मॅग फिनसर्व्ह कंपनी लि.**

**कालच्या वर्तमानपत्रातील अस्पष्ट छपाईमुळे ही नोटीस आज पुन्हा छापण्यात येत आहे.**

**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tender Notice**

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | Coal Cell / Rfx No. 3000056827 (Refloated) / Supply of spares for Pulveriser such as Fixed & Rotatory Beater Plate & MS Screen Drum at coal sampling site at CSTPS, Chandrapur / Rs.585084/- |
| 2 | BM-I / Rfx No. 3000056280 (Refloated) / Procurement of white metal bearing liners for ID fan in AHP-210MW at CSTPS, Chandrapur / Rs.604610/- |
| 3 | WTP-III / Rfx No. 3000056812 / Supply of 900 Kg Liquid Chlorine gas tonner for NDCT & 100 Kg Chlorine Gas Cylinder for Drinking water system dosing at WTP-III, Unit-8 & 9 (2X500MW), CSTPS, Chandrapur / Rs.3778250/- |
| 4 | BM-II / Rfx No. 3000056671 / Supply of Non-Lubricated eccentric plug valves for Ash Evacuation System of Unit-5, 6 & 7 at CSTPS, Chandrapur / Rs.4913050/- |
| 5 | OS-II / Rfx No. 3000056849 / Work Contract for engaging agency for various seasonal activities on as & when required basis at stage-III, CSTPS, Chandrapur / Rs.3443646/- |
| 6 | EM-I / Rfx No. 3000056839 (Refloated) / Work of rewinding and repairing of various makes Rectiformers at 210MW, CSTPS, Chandrapur / Rs.1520336/- |
| 7 | EM-I / Rfx No. 3000056847 / Supply and work of installation, testing, commissioning of 400V 175AH battery set for DCS system at Unit-4 CSTPS, Chandrapur / Rs.5409999.40/- |
| 8 | EM-III / Rfx No. 3000056825 / AMC for rewinding / repairing of LT motors installed at U-8&9, CSTPS, Chandrapur / Rs.649521.54/- |
| 9 | TM-I / Rfx No. 3000056836 / Work of repairing and internal inspection of Deaerator tray, FST & replacement of LP heater-1 during Unit-4 AOH, CSTPS, Chandrapur / Rs.1176264.12/- |
| 10 | TM-I / Rfx No. 3000056834 / Work of PRDS header replacement & MS flow nozzle rectification during Annual Overhaul of Unit-4, CSTPS, Chandrapur / Rs.1729525/- |
| 11 | TM-I / Rfx No. 3000056833 / Annual Maintenance contract for All risk operation & maintenance of A C Plant of Stg-II, 210MW, CSTPS for 2 years / Rs.6162656.08/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 11)** For any query Contact No. 8554991818.

Sd/-
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

**टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस सदरचे नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :- नाशिक** म.न.पा.हद्दीतील **मौजे नाशिक** येथील चौक मंडई भागातील **सिटी सर्व्हे नं.४१७८** यांसी क्षेत्र १५०-५० चौ.मी. त्यावर बाधकाम केलेल्या **गोदावरी कॉम्प्लेक्स अपार्टमेंट** या इमारतीमधील तळ मजल्या वरील **दुकान नं.४** यांसी **बांधीव क्षेत्र ११-४३ चौ.मी.** ही मिळकत **श्री.विलास रामदास गुंजाळ** यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीतील असून त्यांनी सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असल्याचे सांगितले आहे. सबब, सदर मिळकतीवर उपरोक्त मालक हे **श्री गजानन महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्या.** या संस्थेकडून कर्ज घेणार असून सदर मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा कब्जा, लिन, लिज, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, साठेखत, विसार पावती, करार, मदार, कोर्ट वाद, तारण अगर कोणत्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून **०३ (तीन) दिवसांत** आमचे कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. परस्पर वृत्तपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, मुदतीत हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजण्यात येईल व मिळकत निर्वेध असल्याबाबत कर्ज प्रकरण पास करण्यात येईल. कळावे, ही टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस. नाशिक. दि.२९/४/२०२५.

**ॲड.सारिका रणजित मोरे**

लेडीज बार रुम नं.१९,नाशिक जिल्हा न्यायालय आवार,नाशिक.मो.९२०९२०५२२९

**टायटल व्हेरीफिकेशनकामी नोटीस**

तमाम लोकांना, संस्थेच्या सभासद व त्यांच्या ज्ञात-अज्ञात वारसांना कळविण्यात येते की,

तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** शहरातील व **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक शहर - ४** या गांवचे शिवारातील **सर्व्हे नं.८७१/१-२/१अ/१ब/२१/प्लॉट/२१** यांसी **क्षेत्र १२६०-०० चौरस मीटर** ही प्लॉट मिळकत **नवनिवांत अपार्टमेंट को.ऑप. हौसिंग सोसायटी लि. नाशिक** या संस्थेच्या मालकीच्या असून रेव्हेन्यु रेकॉर्ड ऑफ राईटसला **६-ड फेरफार नोंद नं.४०८२५९** अन्वये संस्थेचे नांव दाखल आहे. संस्थेचे पुढीलप्रमाणे सभासद आहेत .....

| अ.क्र. | सभासदांचे नांव | सदनिका क्रमांक | जुने बांधीव क्षेत्र चौरस फुट मध्ये (बिल्टअप) |
|---|---|---|---|
| १) | श्री.जयंत यशवंत जोशी | १ | ३१५.०० |
| २) | श्री.जयंत यशवंत जोशी | २ | ४८४.०० |
| ३) | सौ.भारती सुनिल बोरसे<br>श्री.सुनिल केदु बोरसे | ३ | ४८४.०० |
| ४) | श्री.जब्बार गणी शेख | ४ | ३१५.०० |
| ५) | श्री.हेन्री अँथनी डिसुझा | ५ | ३१५.०० |
| ६) | श्रीमती सुनंदा दिलीप पाटील | ६ | ४८४.०० |
| ७) | श्री.कैलास उगमसिंग मारु | ७ | ४८४.०० |
| ८) | श्री.हेमंत हिरामण गायकवाड | ८ | ३१५.०० |
| ९) | श्री.प्रदिप रविंद्र खोंडे | ९ | ३१५.०० |
| १०) | श्री.विलास गोविंद घोडके | १० | ४८४.०० |
| ११) | श्री.राहुल दिलीप खैरनार | ११ | ४८४.०० |
| १२) | श्री.विवेक भालचंद्र गिते | १२ | ३१५.०० |
| १३) | श्री.प्रकाश अनंत आंबेकर | १३ | ३१५.०० |
| १४) | श्री.प्रकाश अनंत आंबेकर | १४ | ४८४.०० |
| १५) | श्री.जयेश गोपाळ दसपुते<br>सौ.गायत्री जयेश दसपुते | १५ | ३१५.०० |
| १६) | श्री.जयेश गोपाळ दसपुते<br>सौ.गायत्री जयेश दसपुते | १६ | ४८४.०० |
| १७) | श्री.उमेश राजाराम कुलकर्णी<br>सौ.स्नेहा उमेश कुलकर्णी | १७ | ३१५.०० |
| १८) | श्री.मोहितकुमार केवल नारंग | १८ | ४८४.०० |
| १९) | श्री.प्रकाश सुर्यकांत सावंत | १९ | ४८४.०० |
| २०) | श्री.समीर श्रीराम माळी | २० | ३१५.०० |
| २१) | श्री.मुकुंद जगन्नाथ पाठक | २१ | ३१५.०० |
| २२) | श्री.मुकुंद जगन्नाथ पाठक | २२ | ४८४.०० |
| २३) | श्री.सतिश सदाशिव केळकर | २३ | ३१५.०० |
| २४) | सौ.अलका सतिश केळकर | २४ | ४८४.०० |
| २५) | श्री.दिलीपकुमार अमरसिंग सोळंकी | २५ | ३१५.०० |
| २६) | श्री.मिलिंद गंगाराम गायकवाड | २६ | ४८४.०० |
| २७) | श्री.बाळासाहेब बबन म्हस्के<br>सौ.शितल बाळासाहेब म्हस्के | २७ | ४८४.०० |
| २८) | श्री.अशोक रामभाऊ ठोके<br>सौ.आशा अशोक ठोके | २८ | ३१५.०० |
| २९) | श्री.मोहन लक्ष्मणराव कळसकर | २९ | ३१५.०० |
| ३०) | श्री.प्रदिप दिनकर भोसले | ३० | ४८४.०० |
| ३१) | कै.गंगाधर नारायण मोघे तर्फे वारस<br>अशिष गंगाधर मोघे व<br>तन्मय गंगाधर मोघे | ३१ | ४८४.०० |
| ३२) | कु.पार्वती कामत | ३२ | ३१५.०० |
| ३३) | श्री.प्रशांत नारायण सोनगीर<br>सौ.कविता प्रशांत सोनगीर | ३३ | ३१५.०० |
| ३४) | श्री.संजय रमेश झनकर | ३४ | ४८४.०० |
| ३५) | कै.अशोक बाजीराव सोनवणे तर्फे<br>वारस श्रीमती लता अशोक सोनवणे<br>सौ.ममता मनिष कोतुळकर व<br>सौ.मिनल शैलेश गायकवाड | ३५ | ४८४.०० |
| ३६) | श्री.दामोदर जिजाबा दिघे | ३६ | ३१५.०० |

**उपरोक्त संस्थेच्या पुनर्विकासाकामी प्लॉटसह बांधीव मिळकतीचे टायटल तपासणेकामी संस्थेमार्फत प्रस्तुतची टायटल व्हेरीफिकेशन नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.** उपरोक्त प्लॉट मिळकतीवर अथवा सभासदांच्या फ्लॅट मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचे गहाण,दान,बोजा, कर्जा,तारण,कोर्टवाद,लेखी व तोंडी करार इत्यादी प्रकारचा हक्क अगर हितसंबंध किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे लेखी अथवा तोंडी करार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेचे तारखेपासून **१० (दहा) दिवसांचे मुदतीचे** आत साक्षांकीत मुळ कागदपत्रांसह लेखी हरकती आमच्या खालील पत्यावर नोंदवाव्यात व खात्री पटवून द्यावी. परस्पर वृत्तपत्रात प्रसिध्द होणाऱ्या हरकती किंवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. सबब, वरील मुदतीत तक्रारी अगर हरकती न आल्यास उपरोक्त प्लॉटसह बांधीव इमारत मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून तसा दाखला देण्यात येईल व इमारतीच्या पुनर्विकासाचे कामकाजास सुरूवात करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती व तक्रारींचा विचार केला जाणार नाही. परस्पर वृतपत्रात घेतलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही व त्या आमचे पक्षकारांवर आणि उपरोक्त मिळकतींवर बंधनकारक राहणार नाही,याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरीफिकेशन नोटीस.नाशिक. दि.२९/४/२०२५

-:: आमचे मार्फत प्रसिध्द ::-

**ॲड.विलास एल.घोरपडे**

पुर्णम सेंटर पॉईंट, कान्हेरेवाडी, नाशिक. मो.नं.९८५०२०२७०६

# जेलरोडला डासांचा प्रादुर्भाव; ठेकेदारावर कारवाई करा

## माजी नगरसेविका आढाव, दिवे यांचा आंदोलनाचा इशारा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकरोड विभागातील जेलरोडच्या प्रभाग १७ मधील दसक परिसरासह गोदावरी नदी लगतच्या भागात मोठ्या प्रमाणात डासांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे. याप्रकरणी पालिकेने निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या ठेकेदाराचे देयके अदा करू नये. तसेच मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. डासांमुळे नागरिकांचे हाल होत असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे डास प्रतिबंधक उपाययोजना करण्यात यावी. अन्यथा महापालिकेविरोधात जनआंदोलन केले जाईल, असा इशारा शिवसेना ठाकरे गटाच्या माजी नगरसेविका मंगला आढाव, माजी नगरसेवक प्रशांत दिवे, युवासेना सरचिटणीस रोशन आढाव यांनी मनपा आयुक्त मनीषा खत्री यांना निवेदनाद्वारे दिला.



ठेकेदाराच्या सुपरवायजर्सचा नंबर अथवा मनपा कर्मचाऱ्यांचे नाव व फोन नंबर लोकप्रतिनिधी व नागरिकांकडे दिला जात नाही. गोदावरी संवर्धन अंतर्गत पाणवेली काढणे, नदीपात्र स्वच्छ करणे हे पूर्णतः बंद आहे. सदर ठेकेदाराचे काम हे निकृष्ट दर्जाचे असून, त्यावर कठोर कार्यवाही करण्यात सोबतच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले की, जेलरोडमधील डासांचे वाढते प्रमाण बघता यामुळे आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. गोदावरी नदीमध्ये मोठया प्रमाणात घाण, पाणवेली, रसायन मिश्रीत पाणीमुळे दुर्गंधी पसरली असून डासांची उत्पत्ती वाढली आहे. नियुक्त ठेकेदाराकडून डास प्रतिबंधक, औषध फवारणी व रात्रीच्या वेळी केली जाणारी धूर फवारणी निकृष्ट दर्जाची आहे. विशेषतः धूर फवारणी कधीच वेळेवर केली जात नाही.

महानगरपालिका नियमांनुसार सायंकाळी सहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत धूर फवारणी करणे आवश्यक आहे. परंतु ठेकेदार फक्त रात्री आठ ते नऊ एक तास काम करतात. छोटे ३ मशीन व मोठे १ मशीन सध्या उपलब्ध असून, नियमानुसार ६० लिटर डिझेल मध्ये केमिकल मिश्रित करून धूर फवारणी आवश्यक असताना तेवढ्या प्रमाणात डिझेल वापरले जात नाही. १० लिटर पेट्रोल मशीनसाठी लागते. मात्र, तेही तेवढ्या प्रमाणात वापरले जात नाही. कर्मचाऱ्यांकडे सुविधा नाही.

सायंकाळी फक्त ३ ते ४ कर्मचारी धूर फवारणीसाठी येतात. ते पूर्णवेळ काम करत नाहीत. सकाळी ५० कर्मचारी औषध फवारणीसाठी नेमले असून, ते कर्मचारी कधीही काम करताना आढळून येत नाही. कामांच्या देखरेखीसाठी मनपाचा कुठलाही अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसतो.

# जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ५१ जोडप्यांचा सामूहिक विवाहसोहळा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

समाजातील वंचित, गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी सामाजिक बांधिलकी जपत जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे एक भव्य सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा येत्या २० मे रोजी, मंगळवार, सायंकाळी ६ वाजता छत्रपती राजे संभाजी स्टेडियम, अश्विननगर, सिडको, नाशिक येथे संपन्न होणार असल्याची माहिती जय श्री बालाजी चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा जयश्री चौधरी यांनी दिली.

या सामूहिक विवाह सोहळ्यात एकूण ५१ जोडपी विवाहबद्ध होणार असून, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील पाल्य, कर्जबाजारी शेतकरी, अनाथ व निराधार वधू-वर तसेच विविध धर्मीय व सामाजिक स्तरातील जोडपी सहभागी होणार आहेत. सामाजिक समता, बंधुभाव व एकोप्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे या संपूर्ण विवाह सोहळ्याचा खर्च ट्रस्टतर्फे पूर्णपणे विनामूल्य उचलण्यात येणार आहे.



जयश्री चौधरी, ट्रस्टच्या संस्थापिका अध्यक्ष, यांच्या पुढाकाराने या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवविवाहित जोडप्यांना विवाहानंतर आवश्यक ते सर्व साहित्य, कपडे, संसारोपयोगी वस्तू, तसेच शुभेच्छा व आशीर्वादही ट्रस्टतर्फे प्रदान करण्यात येणार आहेत.

हा विवाह सोहळा केवळ एक धार्मिक वा सामाजिक विधी न राहता, तो समाजातील समतेचे व सौहार्दाचे प्रतीक ठरणार आहे. विविध धर्म, जात, आणि पार्श्वभूमी असलेल्या लोकांना एकत्र आणत हा कार्यक्रम राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवणार आहे. या उपक्रमाद्वारे ट्रस्टने एक सामाजिक संदेश देत आदर्श उभारण्याचा प्रयत्न केला आहे. नाशिककरांनी या मंगल सोहळ्याला उपस्थित राहून नवविवाहित जोडप्यांना शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.



# शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन ब्राह्मण संस्थेत भगवान परशुराम जयंती उत्साहात साजरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन ब्राह्मण संस्थेच्या वतीने भगवान परशुराम जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मंगळवारी पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे माल्यार्पण करून करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष सतीश शुक्ल हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

या वर्षीच्या जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष प्रवीण कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यवाह ॲड. भानुदास शौचे यांनी सामाजिक एकोप्याचे महत्त्व अधोरेखित करत सर्व शाखांनी एकत्र येऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमात कार्यवाह ॲड. भानुदास शौचे, वर्षा देशपांडे, कोषाध्यक्ष सुहास भणगे, बीबीएनचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, ज्योतिर्विद सचिन पाडेकर, हेमंत शुक्ल, व मालती कुरुंभटी यांनी आपल्या मनोगतातून परशुराम जयंतीचे महत्त्व सांगितले. संस्थेचे अध्यक्ष सतीश शुक्ल यांनी भगवान परशुरामांचा ब्राह्मणत्वाच्या रक्षणासाठी घेतलेला आदर्श आत्मसात करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन विश्वास पुराणिक यांनी केले. याप्रसंगी राजश्री शौचे, सतीश जोशी, उदय जोशी, हरीश चौबे, अवधूत कुलकर्णी, राजेंद्र वैद्य, रोहिणी कुलकर्णी, कांचन पंचाक्षरी, प्रकाश शुक्ल, प्रतीक शुक्ल, दिलीप शुक्ल, राजन कुलकर्णी, सी. एस. महाजन, रामकृष्ण उपासनी, प्रणिता कुलकर्णी, महेंद्र गायधनी, तुषार जोशी, शैलेश लोंढे, अनिता कुलकर्णी, शांता जाधव, गजानन जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



# राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीतर्फे द्वारसभा

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

परिमंडळ प्रशासनाकडून एकतर्फी मंडळांतर्गत पुनर्रचना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याविरुद्ध नाशिक परिमंडळ विद्युत भवनासमोर राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीतर्फे द्वारसभा घेऊन तीव्र निदर्शने करण्यात आली.

परिमंडळाचे प्रशासन कृती समिती व संघटनांनी मुख्य कार्यालयाला निवेदनही दिले. त्यात काही सूचनांचा व त्रुटींचा अंतर्भाव न करता एकतर्फी पुनर्रचना लागू करत आहे. ज्यामुळे नाशिक मंडळातील तांत्रिक, कार्यालयीन कर्मचाऱ्यांसह अभियंते मोठ्या प्रमाणात अतिरिक्त (सरप्लस) होऊन कर्मचारी विस्थापित होण्याबरोबरच मंजूर पदांची संख्याही कमी होणार आहे. कृती समितीच्या सूचनांचा अंतर्भाव करून नवीन प्रस्ताव तयार करत नाही तोपर्यंत पुनर्रचनेस विरोध असल्याने कृती समितीने २५ एप्रिल रोजी आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. या द्वारसभेत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुनर्रचना घाईगडबडीत का करू नये, त्याचा कर्मचारी संख्येवर होणारा परिणाम व अडचणी आणि प्रशासनाची भूमिका याबाबत प्रखर भूमिका मांडण्यात आली. त्याचबरोबर कालबद्ध आंदोलन छेडण्याचा निर्णयही सर्वानुमते घेण्यात आला. तसे निवेदनही कृती समितीतील पदाधिकाऱ्यांनी नाशिक परिमंडळाचे मुख्यअभियंता सुंदर लटपटे यांना देऊन सविस्तर चर्चाही केली.

यावेळी नाशिक मंडळाचे अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, औद्योगिक संबंधाधिकारी प्रमोद राजेभोसले सुध्दा उपस्थित होते. या द्वारसभेत वर्कर्स फेडरेशनचे व्ही.डी. धनवटे, पंडितराव कुमावत, दीपाली मोगल यांची भाषणे झाली. दीपक गांगुर्डे यांनी प्रास्ताविक तर सूत्रसंचालन महेश वाळुंज, महेश कदम यांनी केले. वीज कामगार महासंघाचे हर्षित काटे यांनी आभार मानले. सुनील पाटील, विशाल मोरे, पराग चौधरी, किरण धनाईत, ज्ञानेश्वर वाटपाडे, तांत्रिक कामगार संघटनेचे गिरीश जगताप, स्वतंत्र बहुजन वीज कर्मचारी संघटनेचे अरुण भालेराव, विनोद भालेराव, वीज कर्मचारी अधिकारी अभियंता सेनेचे रिनेश पिल्ले, भावेश महिंद्र आदींनी मनोगत व्यक्त केले.


**ग्रामपंचायत त्रिंगलवाडी ता. इगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत त्रिंगलवाडी ता. इगतपुरी जि. नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून ग्रामपंचायत त्रिंगलवाडी. ता. इगतपुरी जि. नाशिक येथे खालील प्रमाणे ई निविदेद्वारे दरपत्रके मागवत आहे. १) विविध प्रकारचे बांधकाम साहित्य पुरवठा करणे २) विविध प्रकारचे पाणीपुरवठा साहित्य पुरवठा करणे. वरील साहित्य पुरविणेसाठी ई- निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावरून दि.२८/०४/२०२५ ते दि.०३/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती वर नमूद संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**सही/- ग्रामपंचायत अधिकारी सही/-प्रशासक**
**ग्रामपंचायत त्रिंगलवाडी ता. इगतपुरी जि. नाशिक**



**जाहीर निवेदन**

तमाम सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **कै.भारत महादू नागरे**, राहणार शिवरामनगर, दसक, जेलरोड, नाशिकरोड, ता.जि. नाशिक यांचे **दि.२७/०३/२०२५** रोजी निधन झाले असून त्यांना खालीलप्रमाणे आम्ही कायदेशीर वारस आहोत.

| अ.क्र | वारसांचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती ज्योती भारत नागरे | ४३ | पत्नी |
| २ | तेजस भारत नागरे | २२ | मुलगा |
| ३ | अथर्व भारत नागरे | १८ | मुलगा |
| ४ | शकुंतला महादू नागरे | ६५ | आई |

हे कायदेशीर वारस असून यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाहीत. तरी कोणाचीही काही हरकत असल्यास मा. तहसीलदार मा.सो. नाशिक यांचेकडे **सात** दिवसांच्या आत लेखी खुलासा करावा. अन्यथा मा.मे. तहसीलदार साहेब, नाशिक यांचेकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर प्रमाणपत्र शासकीय कामकाजासाठी देण्यात येणार आहे

**सही/तहसिलदार, नाशिक**


पान १ वरून....

## मृतांच्या नातेवाईकांना ५० लाख

**इतर महत्त्वाचे निर्णय**

■ टेमघर प्रकल्प, ता. मुळशी, जि. पुणे येथील उर्वरित कामे व धरण गळती प्रतिबंधक कामासाठी रु.४८८.५३ कोटी किमतीच्या सुधारित खर्चाला प्रशासकीय मान्यता.

■ मुंबई भिक्षा प्रतिबंध अधिनियमात सुधारणा. भिक्षागृहातील व्यक्तींना ५ रुपये ऐवजी आता ४० रुपये प्रतिदिन. १९६४ नंतर प्रथमच बदल.

■ PM-YASASVI या एकछत्री योजनेअंतर्गत ओ.बी.सी., ई.बी.सी. व डी.एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत केंद्र शासनाने २०२१-२२ ते २५-२६ या वर्षांकरिता निर्गमित केलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्याचा निर्णय.

■ हडपसर ते यवत राज्य मार्गावरील सहा पदरी उन्नत मार्ग व अस्तित्वातील रस्त्याचे सहापदरी बांधकाम करण्यास मान्यता. ५२६२.३६ कोटी रुपयांचा मार्ग

■ सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत महा इनविट (पायाभूत सुविधा गुंतवणूक संस्था) स्थापन करण्यास मान्यता.

■ आदिवासी विकास विभागातर्फे अनुसूचित जमातीसाठी सुरू असलेल्या योजनांच्या धर्तीवर विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजबांधवांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याचा निर्णय.

■ म. रा. इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाख रुपयांवरून १५ लाख रुपये करण्याचा निर्णय.

## बी. आर. गवईंची नियुक्ती

योजनेला रद्द ठरवणाऱ्या पाच सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठातही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. गवई हे त्या खंडपीठाचेही ते सदस्य राहिले आहेत, ज्या खंडपीठाने ४:१ या बहुमताने केंद्र सरकारच्या २००६मधील १००० आणि ५००च्या नोटा रद्द करण्याच्या निर्णयालाही मान्यता दिली होती.

## गतिमंत मुलाचा खून

करत त्याला पकडण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. सचिन बारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र सपकाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक फुलपगारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि आरोपी सुमित पुजारी याला ताब्यात घेतले. सुमित व त्याच्या पत्नीमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सतत भांडणे सुरु होती. या भांडणाला कंटाळून पत्नी माहेरी निघून गेली होती. याच रागातून सुमितने आपल्या सर्वात लहान मुलाचा जीव घेतला.

## तलवार लिलावात जिंकली

आणि युद्धनीती यांवर प्रसन्न होऊन छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना सेनासाहिबसुभा ही पदवी दिली होती. रघुजी भोसले यांनी १७४५ आणि १७५५ मध्ये बंगालच्या नवाबाविरुद्ध युद्धमोहिमांचे नेतृत्व करून मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशापर्यंत विस्तार केला. याचबरोबर त्यांच्या कारकिर्दीमध्ये चांदा, छत्तीसगढ, संबळपूर याही प्रदेशांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. भोसलेंच्या भौगोलिक सीमांमध्ये लोखंड, तांबे यांच्या खाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत्या. यांचा वापर वस्तूंसोबतच शस्त्रे बनवण्यासाठीही केला जात असे. नागपूरकर भोसले घराण्यातील राजशस्त्रे निर्मिती आणि सौंदर्य यांचा अजोड मिलाफ आहेत. नागपूरकर भोसलेंची १८१७ मध्ये सीताबर्डी येथे ईस्ट इंडिया कंपनीविरुद्ध लढाई झाली. या लढाईमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचा विजय झाल्यावर कंपनीने नागपूरकर भोसल्यांच्या खजिन्याची लूट केली. यामध्ये अनेक मौल्यवान वस्तू, दागिने तसेच शस्त्रांचाही समावेश होता. नागपूरचे संस्थान खालसा झाल्यावर ईस्ट इंडिया कंपनीला वेळोवेळी नजराणे आणि भेटीही मिळाल्या होत्या. रघुजी भोसलेंची तलवार युद्धानंतरच्या लुटीमध्ये अथवा ब्रिटिशांना दिलेल्या भेटींमध्ये देशाबाहेर गेली असण्याची शक्यता आहे, जाणकार व्यक्त करीत आहेत.

# टेबल टेनिस स्पर्धेत कुशल चोपडाला सुवर्णपदक

**नाशिक : प्रतिनिधी**

काठमांडू, नेपाळ येथे झालेल्या साउथ एशियन टेबल टेनिस स्पर्धेत नाशिकच्या कुशल चोपडाने १९ वर्षांखालील मुलांच्या एकेरीचे विजेतेपद मिळविले तर कुशलने पुण्याच्या पृथा वर्टीकर हिच्या साथीने मिश्र दुहेरीचे सुवर्ण पदक पटकावून दोन सुवर्णपदके आपल्या नावे केले. कुशल हा नाशिकचा पहिला पुरुष टेबल टेनिसपटू आहे की ज्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले

१९ वर्षाखालील मुलांच्या गटात उपांत्य पूर्व फेरीत कुशल चोपडाने बांगलादेश च्या इक्बाल नफीज चा ११-७,१६-१८, ११-५,११-७ असा ३-१ ने पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्य फेरीत बांगलादेशच्याच इस्लाम मोहमद जॉय चा ११-४, ११-५ व ११-५ असा सहज पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश करत सुवर्ण पदक मिळविण्याचा उद्देशाने वाटचाल सुरु ठेवली. अंतिम फेरीत त्याची गाठ पडली ती भारताच्या राजशेखरन बालमुरुगन याच्याशी. त्याचा कुशलने ११-४, ११-६, ४-११, ११-८ असा ३-१ ने पराभव करून आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्ण पदक पटकावले. कुशल हा पहिला नासिकचा टेबल टेनिस पटू आहे ज्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे सुवर्ण पदक मिळविले. मिश्र दुहेरीत कुशल चोपडा याने पृथा वर्टीकर हिच्या साथीने उपांत्य फेरीत नेपाळच्या ढहाल घनजया व एव्हाना थापा यांचा ११-८, ८-११, ११-६, ११-८ असा ३-१ ने पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.


**ग्रामपंचायत कार्यालय पिंपरखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक, प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय पिंपरखेड ता. दिंडोरी जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या वेबसाईटवरून दिनांक २९/०४/२०२५ पासून ते ०६/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय पिंपरखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय पिंपरखेड, ता. दिंडोरी, जि. नाशिक**



**ग्रामपंचायत कार्यालय म्हेळूस्के, ता. दिंडोरी, जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**ग्रामपंचायत कार्यालय म्हेळूस्के ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

ग्रामपंचायत कार्यालय म्हेळूस्के ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या **https://mahatenders.gov.in** या वेबसाईटवरून दिनांक २९/०४/२०२५ पासून ते ०६/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय म्हेळूस्के, ता.दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय म्हेळूस्के, ता. दिंडोरी, जि. नाशिक**



**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

--------------------

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

--------------------

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

--------------------

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

**पाहिजेत**

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कंपनीसाठी,आडगाव विंचूर गवळी शिवार नाशिक येथे कायमस्वरूपी कामासाठी फील्ड ऑफिसर पाहिजे. शिक्षण किमान १० वी पास, वय २१ ते ६५. **संपर्क** ९२२०२४२५५५

--------------------

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**नावात बदल**

माझे लग्नापूर्वीचे नाव सुनंदा शिवाजी आगळे असे होते. आता लग्नानतर माझे नवीन नाव **सुजाता किशोर घोटेकर** असे झाले आहे. वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे. प्रतिज्ञापत्र दिनांक २६/०४/२०२५ नुसार

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे.
**संपर्क-** ७२०८४९८५२३

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**जाहिरात छोटी किमया मोठी!**


# तोतया पोलिसांकडून १ लाख ९२ हजार किमतीचे दागिने लंपास

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

आडगाव शिवारातील संजयनगर कॉलनीमध्ये बनावट पोलिसांची बतावणी करून एका महिलेची १ लाख ९२ हजार रुपये किंमतीची सोन्याची दागिन्यांची फसवणूक करण्यात आली. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून आडगाव पोलीस ठाण्यात तीन अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी निरजा प्रसाद गंगाराजू (वय ५४, रा. संजयनगर, उद्धव मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल लेन, आडगाव, नाशिक) यामनी दिलेल्या माहितीप्रमाणे, त्या दूध घेण्यासाठी जत्रा हॉटेल पॉइंटकडे पायी जात असताना, दोन इसमांनी त्यांना अडवले. त्यांनी पोलीस असल्याचे भासवत सांगितले की, परिसरात मोठी लूट झाली असून, तुमच्याकडे असलेले सोन्याचे दागिने तातडीने पिशवीत ठेवा, असे सांगितले.

त्याच वेळी एक इसम रस्त्यावरून चालत येत असल्याचे नाटक करून त्याच्याजवळील दागिनेही खिशात ठेवायला लावले गेले. यामुळे फिर्यादींचा विश्वास बसून त्यांनी गळ्यातील एक ३२ ग्रॅम वजनाचा आणि सुमारे९६ हजार रुपये किमतीचा सोन्याची गोफ आणि ३२ ग्रॅम वजनाचे काळ्या मण्यांमध्ये असलेले सुमारे ९६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे पेंडंट पोत असे एकूण १,९२,००० रुपये किमतीचे दागिने त्या इसमांच्या सांगण्यानुसार पिशवीत ठेवले.यानंतर तिघा चोरट्यांनी हातचलाखीने पिशवीमधील दागिने काढून, दोन वेगवेगळ्या मोटारसायकलवरून संजयनगर कॉलनीच्या दिशेने पलायन केले. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात असून, पुढील तपास आडगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश खैरनार, सहाय्यक पोलिस निरीक्षक निखिल बोंडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक काळे, पोलिस हवालदार राजुळे तसेच गुन्हे शोध पथकाचे पोलिस हवालदार मगर तपास करीत आहेत.


**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी **श्री. धनंजय रमेश सोनवणे** राहणार सटाणा, तालुका बागलाण, जिल्हा नाशिक यांनी त्यांचे वडील **श्री. रमेश दादाजी सोनवणे** हे **दिनांक १४/०३/२०२५** रोजी मयत झाल्याने त्यांचे पेन्शन विषयी/ कुटुंबियांना शासकीय बँक व पेन्शन कामी वारस दाखला कामासाठी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला असून त्यात खालीलप्रमाणे वारस असल्याचे दर्शविले आहे.

| अ.क्र | वारसांचे नाव | वय | नाते |
|---|---|---|---|
| १ | जिजाबाई रमेश सोनवणे | ६४ | पत्नी |
| २ | विजय रमेश सोनवणे | ४६ | मुलगा |
| ३ | धनंजय रमेश सोनवणे | ४२ | मुलगा |
| ४ | कविता अजय सोनवणे | २७ | सून |
| ५ | तनिष्का अजय सोनवणे | १ | नात |

करीता या जाहीर प्रगटनाव्दारे सूचित करण्यात येते की, वरील वारसा प्रमाणपत्र बाबतचे कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांसह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून ७ दिवसांचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधितांस वारसा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल.

**सही/तहसिलदार**
**तालुका: बागलाण, जिल्हा : नाशिक**

## महत्त्वाचे



नाशिक : रिलायन्स पेट्रोलपंपासमोर निषेध व्यक्त करताना सकल हिंदू समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

### दहशतवादी हल्ल्याच्या विरोधात सकल हिंदू समाजाच्या वतीने निदर्शने

**पंचवटी : वार्ताहर** काश्मीरमधील पहलगाम येथे हिंदूंवर टार्गेट करून करण्यात आलेल्या अमानवी दहशतवादी हल्ल्याविरोधात सकल हिंदू समाजातर्फे दिंडोरी रोडवरील रिलायन्स पेट्रोलपंपासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी दहशतवादाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी योगेश भवर, वत्सल आगरकर, जयेश जाधव, मुकुंदभाई पटेल, भूषण अहिरे, जयदीप पाटील यांच्यासह पन्नासहून अधिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### नाशिकरोड केंद्रीय विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**नाशिकरोड : प्रतिनिधी** नाशिकरोड केंद्रीय विद्यालय आयएसपी येथे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. प्रमुख अतिथी व विद्यालय भारत प्रतिभूती मुद्रणालयाचे महाप्रबंधक तथा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजेश बन्सल यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना विद्यालयाच्या शिक्षकांनी मुलांमधील असलेल्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी येणाऱ्या काळात अशा कार्यक्रमांचे आयोजन करत राहावे, असे सांगितले. विशेष अतिथी म्हणून मोना बन्सल उपस्थित होत्या. प्राचार्य दीपक अहिरे आणि रोहिणी अहिरे यांनी स्वागत केले. प्राचार्य यांनी वार्षिक अहवाल वाचन करत प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये आपला सहभाग नोंदवत विद्यार्थ्यांनी जागरण गोंधळ, लोकनृत्य, देशभक्तीपर गीते, वैयक्तिक व सामूहिक नृत्य सादर करून मान्यवरांसह पालकांची मनं जिंकली. ज्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन अजय देशपांडे आणि कविता खरगे यांनी केले. संगीत शिक्षक विनोद धायडे यांनी विद्यार्थ्यांना नृत्य दिग्दर्शन, नृत्य संगीत देऊन सुंदर कार्यक्रमाची प्रस्तुती केली. या कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे मुख्याध्यापक मनीष हावरगे, संजय गांगुर्डे, राजीव पृथियानी, ग्रंथपाल शंकर सोनुले यांनी केले.

### लासलगाव-मनमाड रस्त्यावर दुचाकीच्या धडकेत एकाचा मृत्यू

**चांदवड : वार्ताहर** चांदवड तालुक्यातील निंबाळे शिवारात उबाळे वस्तीजवळ लासलगाव-मनमाड मार्गावर २७ एप्रिल रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास झालेल्या दुचाकी अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून, दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संदीप जगन सोनवणे (रा. शिंगवे, ता. चांदवड) हे त्यांच्या ताब्यातील एम.टी. १५ (क्रमांक के.ई. ५४०२) दुचाकीने मनमाडकडून लासलगावकडे जात होते. निंबाळे गावाजवळ त्यांनी चुकीच्या बाजूने (राँग साइडने) भरधाव वेगात दुचाकी चालवत असताना, समोरून पायी चालत येणारे ६५ वर्षीय धनराज पंडित उबाळे (रा. निंबाळे) यांना जोरदार धडक दिली. या अपघातात धनराज उबाळे यांचा जागच मृत्यू झाला, तर दुचाकीचालक संदीप सोनवणे आणि त्याच्या मागे बसलेले राहुल दादाराम खुरसणो हे दोघेही गंभीर जखमी झाले. अपघातात दुचाकीचेही मोठे नुकसान झाले आहे. या घटनेची फिर्याद योगेश धनराज उबाळे यांनी चांदवड पोलीस स्टेशनला दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार बी. व्ही. सांगळे पुढील तपास करीत आहेत.

### विहिरी व घरकुल मंजुरीसाठी लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी

**पळाशी : वार्ताहर** विहिरी व घरकुलांच्या मंजुरीसाठी लाभार्थ्यांकडून



पैसे लुबाडणाऱ्यांच्या विरोधात लाभार्थ्यांनी माझ्याकडे तक्रार केली असून, त्या तक्रारीची शहानिशा करून, अजून तक्रारी प्राप्त झाल्यावर, येत्या दोन दिवसांत पोलिस ठाण्यात लुबाडणूक करणाऱ्यांविरोधात तक्रार दाखल करणार आहे. लाभार्थ्यांची लुबाडणूक करणाऱ्यांना सोडणार नाही, असे चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण चव्हाण यांनी म्हटले आहे. चाळीसगाव तालुक्यात मोठ्या उदात्त हेतूने शेतकऱ्यांना हजारोंच्या विहिरी व बेघरांना घरकुल मंजूर केले होते. मात्र, पंचायत समिती मधील रोहयो विभागातील एपीओ, टिपीओ, ज्यु. इंजिनिअर व वरिष्ठ अधिकारी यांनी परस्पर मंजुरीच्या व जिओ टॅगच्या नावाने प्रत्येक शेतकऱ्यांकडून २० ते २५ हजार रुपये लाच घेऊन आपल्या तुंबड्या भरल्या असल्याच्या तक्रारी माझ्याकडे येत होत्या. एवढे पैसे देऊनही शेतकऱ्यांच्या विहिरी व घरकुलांचे बिल निघत नसल्याने, अखेर आज काही शेतकरी माझ्याकडे तक्रारी घेऊन आले असता, स्वतः आमदार मंगेश चव्हाण यांनी शेतकऱ्यांसह पंचायत समिती कार्यालय चाळीसगाव गाठत गटविकास अधिकारी शेख व संबंधितांची कर्मचारी यांची कानउघाडणी केली. गोरगरीब शेतकऱ्यांकडून पैसे लुबाडण्याचे हे पंचायत समितीमध्ये सिंडिकेट असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार फोफावला आहे. पैसे दिल्याशिवाय काम होत नाही अशी पंचायत समितीची प्रतिमा झाली असल्याचे आमदार मंगेश चव्हाण यांनी सांगितले. त्यानंतर तेथे उपस्थित शेतकऱ्यांसह तात्काळ पोलीस स्टेशन गाठत पंचायत समितीमधील संबंधित भ्रष्टाचारी अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात रीतसर तक्रार दिली आहे. चाळीसगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना व घरकुलधारकांना विनंती आहे की यांच्याकडून विहीर व घरकुल मंजुरीसाठी पंचायत समितीचे अधिकारी कर्मचाऱ्यांनी पैसे घेऊन फसवणूक केली असेल, त्यांनी पुढील दोन दिवसात आपली तक्रार देण्यासाठी माझ्याशी किंवा माझ्या कार्यालयाशी संपर्क साधा, असे आवाहन चाळीसगाव तालुक्याचे आमदार मंगेश चव्हाण यांनी केले आहे.

# मखमलाबाद रोडवरील खड्डे बुजविण्यासाठी मातीचा उतारा

## मखमलाबादकरांना कधी मिळणार चांगला रस्ता

**पंचवटी : वार्ताहर**



खड्ड्यांच्या जाचामुळे गेल्या काही दिवसांपासून नाशिक ते मखमलाबाद गावापर्यंत वाहन चालवताना वाहनचालकांना कसरत करावी लागत होती. महानगरपालिकेने या रस्त्यावर खड्डे बुजविण्यासाठी मातीचा उतारा दिला असून, किती दिवस ही माती खड्ड्यात राहील, असा प्रश्न मखमलाबाद परिसरातील नागरिकांना पडला आहे.

शहरातील अनेक रस्ते सिमेंट काँक्रिटीकरण झाले आहेत. परंतु नाशिक-मखमलाबाद रस्त्याला डांबर देखील मिळत नाही का, असा प्रश्न उपस्थित होतो. अनेक दिवसांपासून ड्रीम कॅस्टल ते मखमलाबाद गावापर्यंतच्या रस्त्यावर स्व. गंगाधर बाबूराव फडोळ चौक तसेच फडोळ मळा, पाटापुढील रस्ता, शिंदे मळा ओमकार गॅरेज आदी भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहनांची वाहतूक होत असते. नाशिककडून मातोरी, मुंगसरा, गिरणारे, हरसूल भागाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शेतकऱ्यांकडून देखील शेतमाल विक्रीसाठी बाजार समितीत जाण्यासाठी-येण्यासाठी याच रस्त्याचा वापर करावा लागतो. तर मखमलाबाद परिसर झपाट्याने वाढल्याने नोकरदारवर्ग, व्यावसायिक आदी नागरिकांना रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मनस्ताप सहन करावा लागतो. त्यातच येणाऱ्या काही दिवसांमध्ये पावसाळा सुरू होणार असल्याने नाशिक महानगरपालिकेने खड्ड्यांमध्ये केलेला मातीचा उतारा किती दिवस तग धरणार, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> **मनपा प्रशासनाला कोणी वाली नाही**
> नाशिक महानगरपालिकेत सध्या प्रशासकराज सुरू आहे. त्यामुळे मखमलाबाद भागात कॉलनी तसेच मुख्य रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. नव्या विकसित झालेल्या कॉलनी भागातील काही रस्त्यांचे खडीकरण होऊन तीन-चार वर्षे उलटले असून, रस्त्यांची खडी उघडी पडली आहे. त्यामुळे नागरिकांना वाहन चालवताना त्रास होतो. याच नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात कर मिळत असताना जर त्यांना मूलभूत सुविधा मिळत नसतील तर त्यांनी करदेखील का भरायचा, असा प्रश्न उपस्थित होतो.
> **- प्रमोद पालवे,** संस्थापक अध्यक्ष, जिजाई फाउंडेशन

# उपजिल्हा रुग्णालय व न्यायालय इमारतीचे काम वेळेत पूर्ण करा

## आ. आशुतोष काळे यांनी घेतला आढावा

**वावी : वार्ताहर**

आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव मतदारसंघाच्या विकासाला गती देताना कोपरगाव शहरातील अनेक महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांच्या इमारतींना देखील निधी दिला आहे. त्यापैकी दिवाणी न्यायालय, उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची आ. आशुतोष काळे यांनी पाहणी केली. काम वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर कामाची गुणवत्ता आणि दीर्घकाळ टिकणारी सुविधा असणंही तेवढंच गरजेचं असल्याचे सांगत कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी त्यांनी सांगितले की, माजी आमदार अशोकराव काळे यांनी कोपरगाव ग्रामीण रुग्णालयासाठी निधी देवून ग्रामीण रुग्णालयाच्या माध्यमातून कोपरगावची आरोग्य व्यवस्था सुरळीत केली परंतु त्यावेळी उपजिल्हा रुग्णालय राहून गेले होते. सर्वसामान्य रुग्णांची होणारी अडचण दूर करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयाची उणीव भरून काढत अथक प्रयत्नातून उपजिल्हा रुग्णालयाला मजुरी मिळवित २८.८४ कोटी रुपये निधी उपजिल्हा रुग्णालयास मिळविला आहे. उपजिल्हा रुग्णालयाचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊन नागरीकांना आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी माझे या कामावर बारीक लक्ष आहे.

दिवाणी न्यायालयाच्या इमारतीसाठी दिलेल्या ३८.६३ निधीतून मागील एक वर्षापासून काम सुरु आहे परंतु सुरु असलेल्या कामाला अपेक्षित वेग नाही. सध्या न्यायालयाच्या जुन्या इमारतीमध्ये एकाच ठिकाणी अनेक न्यायालयांचे कामकाज सुरु असल्यामुळे कामकाज करतांना अडचणी येत आहेत.

त्यामुळे न्यायालयाच्या इमारतीचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करून लवकरात लवकर काम पूर्ण करा, अशा सूचना आ. काळे यांनी यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व सबंधित ठेकेदाराला दिल्या.

यावेळी डॉ. अजय गर्जे, ग्रामीण रुग्णालय अधीक्षक डॉ. गिरीश गुट्टे. डॉ. कृष्णा फुलसौंदर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विकास घोलप. डॉ. चंद्रशेखर आव्हाड, डॉ. संजय उंबरकर. डॉ. अमोल अजमेरे, सचिन जोशी, सुजय भगरे, वीरेंद्र वाकचौरे, समीर वर्पे, विद्यासागर शिंदे, शंतनू धोर्डे, अशोकराव वहाडणे, शिरीष लोहकणे, भास्करराव गंगावणे, मनोहर येवले, सुयोग जगताप, मनोज कडू, एस. एस. वाघ, ए. डी. टुपके, ए. जी. देशमुख, डी. जी. देवकर, सुरेश मोकळ, योगेश खालकर, जी. बी. भोकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता वर्षराज शिंदे, प्रसाद वाकचौरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी अनुभवला 'आयपीएल'चा सामना

**देवळा : प्रतिनिधी**

देशाच्या सर्वांत श्रीमंत असणाऱ्या अंबानी कुटुंबाच्या पाहुणचाराचा आनंद जिल्हा परिषदेच्या देवळा तालुक्यातील फांगदर शाळेच्या ४५ विद्यार्थिनींनी लुटला. त्याचबरोबर आयपीएलच्या मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊदरम्यान क्रिकेट सामना पाहत प्रत्यक्ष क्रिकेट सामना पाहण्याचा योग या विद्यार्थ्यांना मिळाला.

नाशिक येथील दिव्य फाउंडेशनचे श्याम मानकर व रोशनी मानकर या दाम्पत्याने रिलायन्स समूहाशी संवाद साधत ग्रामीण भागातील मुलांना क्रिकेट सामना पाहण्यासाठी विनंती केली होती व शाळेच्या ४५ विद्यार्थिनींना अंबानी परिवाराच्या निमंत्रणाची सुवर्णसंधी लाभली. खामखेडा येथील सरपंच वैभव पवार व पालकांच्या वतीने बसला मुंबईच्या दिशेने रवाना करण्यासाठी हिरवा झेंडा दाखवला होता.

क्रिकेट सामना पाहायला येण्या-जाण्यासाठी मोफत बस, क्रिकेट सामना पाहण्यासाठी सर्व मुलांना आकर्षक टी-शर्ट, मुंबई येथे झालेला मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊदरम्यान क्रिकेट सामना फांगदर शाळेतील ४५ पेक्षा जास्त विद्यार्थिनींनी अनुभवला. नीता अंबानी यांनी रिलायन्स फाउंडेशनच्या माध्यमातून सामना पाहणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नीता अंबानी यांनी सर्व विद्यार्थिनींशी मनमोकळा संवाद साधून मुलांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी शाळा स्तरावरील नावीन्यपूर्ण उपक्रम शाळेचे शिक्षक संजय गुंजाळ व खंडू मोरे यांनी सांगितले.

यापूर्वी फांगदर शाळा व खामखेडा गावाचा परिसर न सोडलेल्या ४५ मुलांनी क्रिकेटचा आनंद, सुप्रसिद्ध क्रिकेटवीर, व्यापक असलेले विश्व, अब्जाधीश नीता अंबानी यांचे सान्निध्य आणि मार्गदर्शन यांचा अतीव आनंद घेतला. रिलायन्स फाउंडेशन आणि श्याम मानकर यांचे आम्ही आयुष्यभर ऋणी राहू, असे मुलांनी सांगितले. विद्यार्थिनी व पालकांनी रिलायन्स फाउंडेशन आणि श्याम मानकर यांचे आभार मानून आनंद व्यक्त केला.

> **स्टेडियममध्ये लक्षवेधी ठरली गांधी टोपी**
> फांगदर शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी गांधी टोपी घातल्याने अनेकांचे लक्ष या विद्यार्थ्यांना वेधून घेत होते. खंडू मोरे यांच्या कल्पकतेने स्टेडियममधील टोप्या उठून दिसत होत्या.



# गौळाणेत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर वर्धापन दिनानिमित्त श्री क्षेत्र गौळाणे (ता. निफाड) येथे दि. ३० एप्रिल ते ७ मे दरम्यान भव्य अखंड हरिनाम सप्ताह व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहामध्ये विविध कीर्तन व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले असून, नामवंत कीर्तनकारांनी हजेरी लावणार आहेत. कार्यक्रमात रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक, आचार्य ह.भ.प. श्री अमृता आश्रम स्वामी महाराज जोशी, भागवताचार्य ह.भ.प. बाळू महाराज गिरगावकर, कीर्तन सिंधू ह.भ.प. सागर महाराज बोराटे, युवाचार्य ह.भ.प. ॲड. ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, कीर्तन केसरी ह.भ.प. कबीर महाराज अत्तार तसेच काल्याचे कीर्तन केसरी महंत अचलपूरकर बाबा यांचे कीर्तन होणार आहे. या धार्मिक सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक शिवाजी चुंभळे, कैलास चुंभळे, समाधान कारभारी चुंभळे, विलास चुंभळे, शांताराम चुंभळे, तानाजी चुंभळे, आत्माराम चुंभळे, रत्नाकर केरू चुंभळे, अशोक चारस्कर, दामोदर तपासे, वामन चुंभळे, सुनील थापेकर, संदीप थापेकर, संपत चुंभळे, विलास जाधव, मुकुंदा तपासे, मधुकर जाधव, भास्कर चुंभळे, राजाराम काजळे, नामदेव थापेकर, विष्णू चुंभळे, दीपक चुंभळे, लहानू चुंभळे आणि सर्व ग्रामस्थांनी केले आहे.

# दरेगाव फाटा येथे भाविकांच्या वाहनाला अपघात; २६ जखमी

**वणी : प्रतिनिधी**

सप्तशृंगगडावर नवसपूर्तीसाठी जाणाऱ्या भाविकांचे वाहन दरेगाव फाट्यानजीक उलटल्याने २६ भाविक जखमी झाले. जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.



मंगळवारी (दि. २९) सकाळी ८.३० वाजेच्या सुमारास पाथर्डी, नाशिक येथून नवसपूर्तीसाठी सप्तशृंगगडावर जाणारी पिकअप (एम.एच.१५/जि.व्ही.४५३८) ही दरेगाव (ता. कळवण) फाट्यानजीक वळणावर रस्त्याचा अंदाज न आल्याने उलटली. या अपघातात लहान मुलांसह २६ भाविक जखमी झाले. रुग्णवाहिकेद्वारे जखमींना वणी येथील ग्रामीण रुग्णालयात प्रथमोपचारासाठी आणण्यात आले. उपचार करण्यासाठी शहरातील खासगी डॉक्टरांना देखील यावेळी पाचारण करण्यात आले होते. वणी ग्रामीण रुग्णालयात डॉ. विराम ठाकरे, डॉ. अनिल पवार, डॉ. प्रकाश देशमुख, डॉ. योगेश पाटील वणी ग्रामीण रुग्णालयातील डॉ. किशोर मोरे यांनी जखमींवर प्रथमोपचार केले. कळवण तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. बेगाळ यांनी वणी ग्रामीण रुग्णालयात भेट देऊन जखमींची पाहणी केली.

या अपघातात आशाबाई खडसे (वय ३५), रोशनी बांगरे (वय १९), प्रियांश जाधव (वय ४), खुशी बोरकर (वय ५), तनू खंदारे (वय ५), अनिल बोरकर (वय ३०), अयोध्या जाधव (वय २०), विलास पारवे (वय ४५), नंदा पारवे (वय ४०), ओम गायकवाड (वय १६), गणेश बोरकर (वय ७), हर्षदा बोरकर (वय २), शारदा बोरकर (वय २५), अंबादास बोरकर (वय ३०), रंजना हिवराळे (वय ४८), सखाराम पारवे (वय ३३), राधा पारवे (वय २५), मनकर्णाबाई खंदारे (वय ६०), मनीषा बोरकर (वय २०), गणेश बांगरे (वय २३), छाया तांबे (वय ३५), एकनाथ हिवराळे (वय ६५), शिवाजी खंदारे (वय ६०), अर्चना पालवे (वय १८), शोभा खंदारे हे जखमी झाले.

# मखमलाबादला आपला दवाखान्याचे उद्घाटन

**पंचवटी : वार्ताहर**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग व नाशिक महानगरपालिका आरोग्य विभाग अंतर्गत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना मखमलाबाद शाखेचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे, आरोग्यमंत्री डॉ. प्रकाश अबिटकर व संबंधित विभागांचे सर्व सचिव अधिकारी यांच्या उपस्थितीत झाले.



या दवाखान्यासाठी माजी नगरसेविका सुनीता पिंगळे यांनी पाठपुरावा केला होता. या दवाखन्यामध्ये जवळजवळ ३३ प्रकारच्या टेस्ट वेगवेगळ्या आजारांवर मोफत उपचार, विविध प्रकारची उच्च प्रतीची औषधे, उच्चशिक्षित स्टाफ (डॉक्टर, नर्सेस) असणार आहे. तसेच मखमलाबाद मनपा शाळेच्या आवारात असलेल्या मनपा अंतर्गत शहरी आरोग्य केंद्र कार्यरत असून, तेथेही दररोज जवळजवळ १५० ते १६० लोक मोफत उपचार घेतात. प्रभागात आता दोन दवाखाने प्रभागातील नागरिकांना मोफत सेवा देणार आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन माजी नगरसेविका सुनीता पिंगळे, माजी नगरसेवक पुंडलिकराव खोडे यांनी केले आहे.

याप्रसंगी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, प्रभागाच्या माजी नगरसेविका तथा सभापती सुनीता ज्ञानेश्वर पिंगळे, माजी नगरसेवक पुंडलिकराव खोडे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, भाजपा पंचायतराज व ग्रामविकास विभाग शहराध्यक्ष ज्ञानेश्वर पिंगळे, शहर कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. शैलेश लोंढे, डॉ. नितीन रावते, डॉ. प्रशांत शेटे, सहाय्यक वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सौ. अजिता साळुंखे, डॉ. खुने, गोकुळ काकड, अंकुश काकड, मखमलाबाद शहरी आरोग्य केंद्र डॉ. संतोष नागरे, हिरावाडी शहरी आरोग्य केंद्र डॉ. विश्वम बस्ते, म्हसरूळ शहरी आरोग्य केंद्र डॉ. सारिका पगार, विनायक आमले, रोशन काटे, डॉ. किरण येणोरकर व इतर अधिकारी व आरोग्य कर्मचारी आशा वर्कर्स, नर्सेस व स्टाफ उपस्थित होते.

# मनमाड बाजार समिती सभापतींविरोधात उपोषण

## माजी आ. पवारांसह दहा संचालकांचे आंदोलन

**मनमाड : प्रतिनिधी**

मनमाड बाजार समिती सभापती दीपक चंद्रकांत गोगड हे मनमानी करत असून, गेल्या तीन महिन्यांपासून बाजार समितीची मासिक बैठक घेत नाही. आम्ही लेखी व तोंडी मागणी करूनही बैठक घेण्यास टाळाटाळ करतात. याशिवाय, त्यांनी बाजार समितीचे सचिव यांना बेकायदेशीररीत्या निलंबित केले आहे. यासह बाजार समितीच्या इतर अनेक प्रलंबित प्रश्नांसाठी बाजार समितीच्या दहा संचालकांनी माजी आमदार संजय पवार यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीच्या आवारात आमरण उपोषण सुरू केले आहे.

मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तत्कालीन महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली माजी खा. समीर भुजबळ, माजी आ. संजय पवार, तत्कालीन शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश धात्रक व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष दीपक गोगड यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली गेली. विद्यमान आमदार सुहास कांदे यांच्या पॅनलचा धुव्वा उडवून वरील मंडळी सत्तेत आली. रोटेशनप्रमाणे प्रथम पंधरा महिने माजी आमदार संजय पवार यांना सभापती करण्यात आले. मात्र, सभापती संजय पवार यांनी अवघ्या चार महिन्यांतच मराठा आरक्षणाचा मुद्दा उपस्थित करत भुजबळ यांची साथ सोडत राजीनामा दिला. यानंतर त्यांनी आमदार सुहास कांदे यांच्या पक्षात प्रवेश करत बाजार समितीच्या इतर सदस्यांनादेखील आपल्या सोबत नेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. यानंतर दीपक गोगड सभापती झाले तेव्हापासून आत्तापर्यंत हा संघर्ष सुरूच असून, यातील आणखी संचालकांनी आमदार कांदे यांना साथ दिली असून, गोगड यांना अपात्र करण्यासाठी प्रयत्न करत आहे. अविश्वास ठराव आणण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती, मात्र सभापती गोगड यांनी सभा तहकूब केली व ९० दिवस उलटले तरी अजूनही सभा घेतली नाही. यामुळे




बाजार समितीच्या संचालकांनी माजी आमदार संजय पवार यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण सुरू केले आहे.

याबाबत सभापती यांच्याशी संपर्क साधला असता संचालक मंडळ हे चुकीची माहिती देत असून, मी कोणत्याही प्रकारे नियमबाह्य काम केलेले नाही. शासन नियमाप्रमाणे मी काम करत आहे. दहा संचालक हे शेतकऱ्यांची तसेच बाजार समितीच्या इतर घटकांची दिशाभूल करत असून, त्यांनी आमरण उपोषण करू नये यासाठी मी त्यांना लेखी पत्र देखील दिले आहे. उपोषण आंदोलनात माजी आमदार संजय पवार, संचालक किशोर लहाने, कैलास भाबड, विठ्ठल आहेर, अशोक पाटील, सुभाष उगले, आप्पा कूलर, दशरथ अहिरे, मधुकर उगले व संगीता कराड हे सहभागी आहेत.

## महत्त्वाचे



### मालेगाव महापालिकेकडून वृक्षांना टँकरद्वारे पाणीपुरवठा

**मालेगाव :** शहरात लावण्यात आलेल्या झाडांचे संवर्धन होणे ही काळाची गरज बनली आहे. येथील महानगरपालिकेकडून शहरात ठिकठिकाणी लावण्यात आलेल्या वृक्षांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करून ती जगवली जात आहेत. शहरातील तापमानाचा पारा हा ४३ अंश सेल्सिअसपर्यंत गेला आहे. त्यामुळे उन्हाच्या काहिलीने नागरिक हैराण झाले आहेत. एकीकडे कडक उन्हामुळे पाण्यावाचून अनेक ठिकाणी वृक्ष मरत असताना येथील महापालिकेने मात्र एकात्मता चौक, कॉलेज मैदानातील जॉगिंग ट्रॅकला लागून असलेली झाडे तसेच मालेगाव-सटाणा रोडवरील सिमेंट रस्ता दुभाजकाच्या मध्यभागी लावण्यात आलेली झाडे जगवण्यासाठी प्रयत्नशील आहे. मनपाच्या पाणीटँकरद्वारे येथील झाडांना सकाळी व सायंकाळच्यावेळी पाणी देण्यात येत असल्याने ही झाडे ऐन उन्हाळ्यात टवटवीत दिसत असल्याने वृक्षप्रेमी नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.

### श्रीदत्त मंदिराचा आज प्रथम वर्धापन सोहळा




**लासलगाव :** लासलगावजवळील टाकळी-विंचूर येथील श्रीदत्त मंदिराचा प्रथम वर्धापन दिन बुधवारी (दि ३०) साजरा करण्यात येणार आहे. यावेळी खासदार भास्कर भगरे, बाळासाहेब सानप, नाशिकचे ज्येष्ठ ज्योतिषाचार्य प्रभाकर भोजने, शिवसेनेचे नेते दत्ता गायकवाड, दिनकर पाटील, प्रकाश नन्नावरे, राजेंद्र जायभावे, शुभांगी नांदगावकर, कृष्णराज शेवलेकर, विश्वजितमुनी लासुरकर आणि अरुण भोजने उपस्थित राहणार आहेत. सोहळ्याच्या दिवशी श्रीदत्त देवपूजा, श्रीमूर्ती पूजन आणि विडाअवसर यासारखे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. त्यानंतर महानुभाव पंथाचे भजनसम्राट विशाल जोगदेव यांच्या चक्रधर भक्तीधारा या भक्तिपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवारी (दि १) ध्वजारोहण, धर्मसभा, पंचवतार उपहार, महाआरती आणि महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.



### सायखेडा खेळाडूंचा भारतात तिसरा क्रमांक

**निफाड :** सायखेडा जनता इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये सुरू असलेल्या बोटक्लबच्या १४ खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. सांगली येथे महाराष्ट्र संघ निवड चाचणी स्पर्धा झाली. यात वैभव पानसरे, आदित्य ढिकले, कृष्णा कुटे, निखिल कुटे, शैलेश बोडके, शुभम घुगे, आर्यन जाधव, मयूर घुगे, प्रेम कुटे, सोहम सानप, आकाश ढीकले, रोहित जाधव, निखिल लहाने, संभव गोडे, वेदांत खालकर, आदित्य खेलुकर यांचा समावेश होता. या खेळाडूंची २४ ते २८ एप्रिल या कालावधीमध्ये भोपाळ येथे झालेल्या १३ व्या राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेमध्ये भारतात तिसरा क्रमांक प्राप्त केला. तसेच ५०० मीटर क्रीडा प्रकारात भारतात तिसरा क्रमांक प्राप्त केला. खेळाडूंना प्राचार्य डॉ. एन. के. निकम, जिमखाना विभागप्रमुख जाधव व गिते यांचे मार्गदर्शन लाभले.

### सकल जैन समाजातर्फे मूक मोर्चा

**मालेगाव :** पहलगामचा दहशतवादी हल्ला, मुंबईत पाडलेले जैन मंदिर व जैन संतांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ सकल जैन समाजाने मूक मोर्चा काढला. यावेळी अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण यांना निवेदन देत योग्य कारवाईची मागणी केली. सकल जैन समाजाच्या विविध संघांनी एकत्र येत बारा बंगला भागातून मूक मोर्चा काढला. पहलगाममध्ये हिंदूंवर झालेल्या आतंकी हल्ल्याचा जाहीर निषेध करत जैन समाजाला न्याय द्या, अहिंसक जैन संतांवरील हल्ले सहन केले जाणार नाहीत, अशा विविध आशयांचे फलक हाती घेत जैन समाजबांधव सहभागी झाले होते. अपर जिल्हाधिकारी कार्यालय येथे पिंटू कर्नावट यांचे भाषण झाले. या आंदोलनात श्रीवर्धमान क्षमणसंघीय स्थानकवासी जैन श्रावक संघ, समस्त दिगंबर जैन समाज, श्रीजनकुशल सुरी जैन दादावाडी बाडमेर ट्रस्टसह इतर संघांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. जैन साधू-संतांना संरक्षण द्यावे आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.


## निधन वार्ता

### रखमाबाई भोसले



**आराई :** येथील प्रतिष्ठित नागरिक, नांदगाव साकोरे येथील रयत शिक्षण संस्थेचे, कर्मवीर भाऊराव पाटील माध्य. विद्यालयाचे शिक्षक शिवाजी भोसले यांच्या मातोश्री रखमाबाई बापूराव भोसले यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### बाळासाहेब हिरे



**उमराणे :** निमगाव येथील रहिवासी बाळासाहेब पंडित हिरे (६६, हल्ली मु. नाशिक) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### मंदाबाई हगवणे



**नाशिक :** सिन्नर तालुक्यातील घोरवड येथील मंदाबाई गोविंद हगवणे (६८) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### बबीबाई शेटे



**नाशिकरोड :** देवळाली कॅम्प लॅम रोडवरील कैलास भुवन येथील रहिवासी श्रीमती बबीबाई दगू शेटे (८६) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. जयहिंद किराणाचे संचालक सुरेश शेटे व मधुकर शेटे यांच्या त्या मातोश्री होत. शेटे परिवार मूळचा चांदोरी (ता. निफाड)चा राहणारा आहे.

### संतोष बोडके



**नाशिक :** दिंडोरी तालुक्यातील आशेवाडी रामशेज येथील संतोष ( गोगा) किसन बोडके (५०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुली, मुलगा, भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. व्यापारी जयेश बोडके यांचे ते वडील होत.

# नांदूरमध्यमेश्वर कालवे दुरुस्तीत वरवरची मलमपट्टी

## काढलेला गाळ जाणार पुन्हा कालव्यात, भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार

**निफाड : आनंदा जाधव**



सुमारे १२० वर्षांपूर्वी बांधलेल्या नांदूरमध्यमेश्वर कालव्यांची वहनक्षमता घटल्याने गोदावरी पाटबंधारे विभागाकडून या कालव्याच्या दुरुस्तीसाठी दरवर्षी करोडो रुपये खर्च होत असतानाही कालव्याची सुधारणा होताना दिसत नाही. यावर्षीदेखील कालव्यातील गाळ काढून कमकुवत झालेल्या ठिकाणी कालव्याला भराव देण्यासाठी पाटबंधारे विभागाने दुरुस्तीसाठी ५५ कोटी रुपये मंजूर करून काम हाती घेतले आहे. काम करणाऱ्या ठेकेदाराने पोकलेनच्या सहाय्याने वरवरचा गाळ काढून तो कालव्याच्या उतारावर टाकल्याने कालव्यांना पाणी सोडल्यानंतर हा गाळ पुन्हा कालव्यात जाऊन या कामावर खर्च होणारे करोडो रुपये पाण्यात जाणार आहे.

दरम्यान, या कालव्याला भराव देण्याबरोबरच कालव्यालगतची काटेरी झुडपे काढणे गरजेचे असतानाही ती काढली जात नसल्याने हे काम म्हणजे ठेकेदार पोसण्यासाठी केलेली तजवीज ठरत आहे. या कामात मोठा भ्रष्टाचार होत असल्याची तक्रार शेतकरी करीत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात खोदलेले नांदूरमध्यमेश्वर धरणाचे कालवे आता अतिशय जीर्ण झाले आहेत. अनेक ठिकाणी हे कालवे फुटून पाण्याचा अपव्यय होत आहे. छत्रपती संभाजीनगर आणि अहिल्यानगर या दोन जिल्ह्यांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी या कालव्यांची दरवर्षी दुरुस्ती केली जाते. मात्र, अद्यापही या कालव्यावरील पूल जीर्ण असून, अनेक ठिकाणी कालव्यांचा भराव कमकुवत झालेला आहे. साहजिकच दरवर्षी या कालव्यांसाठी खर्च केला जातो. आतादेखील नांदूरमध्यमेश्वर धरणाच्या उजव्या, डाव्या आणि जलद कालव्यातील शेवाळ माती काढण्याबरोबरच कालव्याच्या आतील भागाला व्यवस्थित उतार देणे, कालव्यात असणारी काटेरी झुडपे काढून कालव्याची वहनक्षमता वाढावी यासाठी पाटबंधारे विभागाने ५५ कोटी रुपये मंजूर करीत या कामाला सुरुवात केली आहे. त्यासाठी दोन पोकलेनच्या सहाय्याने वरवरचा गाळ काढून तो कालव्याच्या उतार भागावर टाकला जात आहे. कालव्यात आणि कालवा उतारावर असणारी काटेरी झुडपे, बाभळी, बोरी अशी झाडे तशीच ठेवल्याने पाणी वहनक्षमतेत अडथळा ठरण्याची शक्यता अधिक आहे. अनेक ठिकाणी कालव्यात असणारे शेवाळ तसेच दिसत आहे. तर कालव्यात खोलगट भाग तर काही ठिकाणी उंच भाग तसाच ठेवला आहे. जेथे कालव्याचा भराव कमकुवत आहे, तेथे देखील माती, मुरूम टाकून भरावाला आधार देण्याचे कुठलेही कष्ट घेतलेले नाही. केवळ टक्केवारी आणि पदाधिकारी यांचे खिसे भरण्यासाठीच दरवर्षी या कालवा दुरुस्तीची निविदा काढून सरकारी तिजोरीवर डल्ला मारला जात असल्याची चर्चा आहे. सध्या कालव्याचे जे काम घाईघाईत उरकले जात आहे, त्याबाबत संबंधित ठेकेदाराला योग्य समज देत कालव्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण करून घेऊन कालवा लगतच्या काटेरी झुडपे काढण्याची ताकीद द्यावी, अशी मागणी होत आहे.

**वहनक्षमतेसह कालव्याची लांबी घटली**

नांदूरमध्यमेश्वर धरण निर्मिती तर या कालव्यांची निर्मिती करण्यात आली. यात उजवा कालवा ११० किमी लांबीचा करण्यात येऊन त्याची वहनक्षमता ५५० क्यूसेकची होती. तर डावा कालवा ९० कि. मी.चा करून त्याची वहनक्षमता ३५० क्यूसेकची होती. मात्र, योग्य ती देखभाल आणि दुरुस्ती न केल्यामुळे उजव्या कालव्याची लांबी ७० कि.मी.वर तर डाव्या कालव्याची लांबी ६० कि.मी.वर आली आहे. या दोन्ही कालव्यांबरोबरच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी तिसरा जलद कालवा १२८ कि. मी. लांबीचा करून या कालव्यातून ११०० क्यूसेक क्षमतेने पाणी जाते. साहजिकच धरण नाशिक जिल्ह्यात असले तरी पाणी मात्र इतर दोन जिल्ह्यांसाठी पुरविले जाते.

**दुरुस्तीचे काम निकृष्ट**

कालव्यातील गाळ काढण्याचे काम निकृष्ट होत असून, एकाच दिवसात सुमारे १५ कि.मी.पर्यंत कालव्यातील गाळ काढल्याचे दाखविले जात आहे. कालव्यात अद्यापही गाळ तसाच असून, उतार व्यवस्थित दिलेला नाही. त्यामुळे या सर्व कामांची चौकशी करून काम व्यवस्थित करावे. **संजय उबाळे,** शेतकरी, नांदूरमध्यमेश्वर

# भुईकोट किल्ला परिसरातील अतिक्रमण हटणार

## ३६८ जणांना नोटिसा; १५ दिवसांत अतिक्रमण हटवण्याचा इशारा

**मालेगाव : प्रतिनिधी**



येथील भुईकोट किल्ला परिसरात अतिक्रमण केलेल्या ३६८ जणांना तहसीलदारांनी नोटिसा बजावल्या आहेत. येत्या १५ दिवसांत अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमण हटवावे, अन्यथा एकतर्फी कारवाई करत घरे हटवण्याचा इशारा नोटिसीद्वारे दिला आहे.

दरम्यान, किल्ला झोपडपट्टी बचाव कमिटीने याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेच्या निर्णयानंतरच स्थलांतरावर विचार करण्याची भूमिका कमिटीने जाहीर केल्याने हा मुद्दा चिघळण्याची चिन्हे आहे.

गड व किल्ल्यांवरील अतिक्रमणे ३१ मेपूर्वी निष्कासित करण्याचे निर्देश शासनाने दिले आहे. यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली आहे. या निर्देशाची अंमलबजावणी सुरू करत अतिक्रमणधारकांना नोटिसा दिल्या आहेत. लोकायुक्तांनी १९ सप्टेंबर २०२२ मध्ये अतिक्रमण निष्कासित करण्यापूर्वी त्यांचे पुनर्वसन करण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानुसार अतिक्रमणधारकांना मनपाच्या अकरा हजार कॉलनी घरकुलांत स्थलांतर केले जाणार आहे. संबंधित अतिक्रमणधारकांनी एकात्मिक विकास योजनेंतर्गत लाभार्थी हिस्सा अंशदान रक्कम २३ हजार ४०० रुपये १५ दिवसांत मनपाकडे जमा करत घरकुलात स्थलांतर करावे. नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अतिक्रमण न हटवल्यास अतिक्रमण हटवून यासाठी येणारा खर्च संबंधितांकडून वसूल केला जाईल.

> किल्ल्याच्या आत शाळा, जिमखाना आहे. खंदकात मनपाचा हॉल आहे. त्यामुळे नेमके अतिक्रमण कोणते ते निश्चित करावे. लोकायुक्त व मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. सदर नोटीसची प्रत न्यायालयात सादर करणार आहोत. न्यायालयाचा निर्णय येत नाही तोपर्यंत घरे हटवली जाणार नाहीत.
> – **मुस्तकिम डिग्निटी, प्रमुख,** किल्ला झोपडपट्टी बचाव कमिटी

> ३१ मेपूर्वी अतिक्रमण हटवण्याचे शासन आदेश आहेत. स्थलांतर व अतिक्रमण निष्कासित करण्याच्या कायदेशीर नोटिसा बजावल्या आहेत. १५ दिवसांची मुदत दिली आहे. यानंतर पुढील कारवाई केली जाईल.
> – **विशाल सोनवणे,** तहसीलदार, मालेगाव

# मालेगावी पाकिस्तानचा ध्वज जाळत हल्ल्याचा निषेध

## श्रीराम नवमी उत्सव समितीतर्फे निवेदन

**मालेगाव : प्रतिनिधी**

पहलगाम भागात हिंदू पर्यटकांवर आतंकवादी हल्ला करणाऱ्या पाकिस्तानी मुस्लिम दहशतवाद्यांचा आणि दहशतवादाला पाठबळ देणाऱ्या पाकिस्तान सरकारचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, या मागणीसाठी श्रीराम नवमी उत्सव समितीतर्फे येथील महात्मा गांधी पुतळ्याजवळ पाकिस्तानी राष्ट्रध्वज जाळत निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकान यांना निवेदन सादर करण्यात आले.

भारताने पाकिस्तानबरोबर केलेला सिंधू पाणी करार फक्त तात्पुरता स्थगित न करता कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा. पाकिस्तानसोबत होत असलेली औषध व इतर अत्यावश्यक वस्तूंची निर्यात बंद करून आयातीवर देखील बंदी घालण्यात यावी. दहशतवादी हल्ल्यामध्ये बळी गेलेल्या हिंदू नागरिकांच्या परिवाराला भारत सरकारकडून मदत देण्यात यावी, या मागण्यांचे निवेदन अपर जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.

यावेळी मच्छिंद्र शिर्के, साहेबराव वाघ यांची भाषणे झाली. या आंदोलनात डॉ. तुषार शेवाळे, रामदास बोरसे, निखिल पवार, भारत पाटील, जगदीश गोऱ्हे, मधुकर माऊली, किशोर जाधव, दिनेश गवळी, सारंग बोरसे, ऋषीकेश बोरसे, सुभाष मालू विकी चव्हाण, सखोल लिंगायत, प्रवीण सूर्यवंशी, प्रवीण भोसले, विनोद निकम, शुभम पवार, मयूर पाटील, कविता शिर्के आदी सहभागी झाले होते.



# ओझरटाऊनशिपला परशुराम जयंती

**ओझर : वार्ताहर**

येथील एचएएल कामगार ब्राह्मण संघातर्फे परशुराम जयंती साजरी करण्यात आली. ओझरटाऊनशिपमधील लोखंडे हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एचएएल कामगार संघटनेचे सरचिटणीस व कन्व्हेनर संजय कुटे होते.

व्यासपीठावर संघटनेचे अध्यक्ष अनिल मंडलिक, प्रशांत आहेर, रणजीत कोल्हटकर, ब्राह्मण संघाचे अध्यक्ष नितीन जोशी, एचएई डब्ल्यू आरसीचे सरचिटणीस दीपक टावरे, एचएएल सोसायटीचे चेअरमन संजय मोरे उपस्थित होते. रूपेश दीक्षित यांनी भगवान परशुराम यांच्या जीवन काळातील महत्त्वाच्या गोष्टी सर्वांसमोर ठेवल्या. कार्यकारिणी सदस्य परिमल जोशी यांनी ही मनोगत व्यक्त केले. उन्हाळ्याच्या तीव्रतेचा विचार करून एचएएल ब्राह्मण संघाने सर्व उपस्थितांना उन्हाळी टोपीचे वाटप केले. कार्यक्रमासाठी ब्राह्मण संघाचे सदस्यांसह विविध समुदायाचे प्रमुख व कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालन रूपेश दीक्षित यांनी केले तर परिमल जोशी यांनी आभार मानले.

# लासलगावला 'सकल हिंदू समाज'कडून निषेध

**लासलगाव : वार्ताहर**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी पर्यटकांवर हल्ला करून २८ जणांची हत्या केली. या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यासाठी लासलगाव व पिंपळगाव नजीक येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने काल मंगळवारी सकाळी दहा वाजता शांततापूर्ण निषेध मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक, शिरसागर डेअरी पिंपळगाव नजीक येथून या मोर्चास प्रारंभ होऊन लासलगाव पोलीस स्टेशन येथे मोर्चाची सांगता करण्यात आली.

यावेळी पहलगाम अतिरेकी हल्ल्यात सहभागी सर्व दोषींवर कठोर कारवाई व्हावी व त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी. देशभरात अतिरेकी कारवायांना खतपाणी घालणाऱ्या जिहादी संघटनांवर बंदी घालण्यात यावी.

हिंदू भाविकांच्या सुरक्षेसाठी केंद्र व राज्य सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात. काश्मीरसह देशभरात हिंदू यात्रांचे आणि मंदिरे, तीर्थक्षेत्र यांचे संरक्षण अधिक बळकट करावे. देशातील सर्व समाजात एकोपा टिकवण्यासाठी अतिरेकी प्रवृत्तीवर कठोर कारवाई करण्यात यावी आदी मागण्यांचे लेखी निवेदन लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांना लासलगाव व पिंपळगाव नजीक येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने देण्यात आले.

संपूर्ण शांततेने व संविधानिक मार्गाने आम्ही या घटनेचा निषेध नोंदवत आहोत. तरी आपल्यामार्फत आमच्या भावना आणि सर्व मागण्या योग्य त्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात याव्यात, अशी विनंती लासलगाव व पिंपळगाव नजीक येथील सकल हिंदू समाजाच्या वतीने या वेळी करण्यात आली. या मोर्चात सर्व हिंदू समाज बांधव, महिला, लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



**लासलगाव : पहलगाम अतिरेकी हल्ल्यात सहभागी सर्व दोषींवर कठोर कारवाई व्हावी, या मागणीचे निवेदन सपोनी भास्करराव शिंदे यांना देताना लासलगाव व पिंपळगाव नजीक येथील सकल हिंदू समाजबांधव. (छाया : समीर पठाण)**

# कोचरगावला नऊ ठिकाणी अवैध दारू विक्री

## पोलिसांसह राज्य उत्पादन शुल्कचा कानाडोळा

**दिंडोरी : प्रतिनिधी**



तालुक्यातील कोचरगाव येथे अवैध दारू विक्री सर्रासपणे सुरू असून, गावात नऊ ठिकाणी अवैध दारू विक्री सुरू आहे. याविरोधात येथील महिलांनी पोलीस ठाणे गाठत उपनिरीक्षक किसन काळे यांना निवेदन देत दारूबंदी करण्याची मागणी केली.

गावातील अनेक तरुण दारूच्या आहारी जाऊन आपल्या जिवाला मुकले आहेत. दारूमुळे अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. गावातील दारू विक्री बंद करण्याच्या मागणीसाठी अनेकवेळा निवेदने देण्यात आली. मात्र, त्याची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे आक्रमक झालेल्या महिलांनी दिंडोरी येथे पोलीस ठाणे गाठत दारूबंदीची मागणी केली. यावेळी सरपंच कल्पना टोंगारे, उपसरपंच गोरखनाथ लिलके, पोलीसपाटील सीता टोंगारे, अलकाबाई खाडे, मंजुळा निंबेकर आदींसह महिला उपस्थित होत्या.

दिंडोरीच्या पश्चिम भागात दारू विक्रीची दुकानेच नाही. तरीही अवैध दारू विक्री करणाऱ्यांकडे दारूचे बॉक्स येतातच कसे, राज्य उत्पादन शुल्क विभागाने दुकानदार बॉक्स विक्रीची परवानगी दिली तर नाही ना? असा प्रश्न यावेळी महिलांनी उपस्थित केला. दारूबंदी करण्याचे गावाने ठरविले आहे. दारू विक्री करणाऱ्या महिलांनी नऊ दारू विक्रेत्याची नावे दिली आहे. त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे पोलीस उपनिरीक्षक किसन काळे यांनी सांगितले.

**अन्यथा उपोषणास बसणार**

आजपर्यंत दिंडोरी पोलिसांना दोनदा निवेदने दिली. नाशिक ग्रामीण पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले, मात्र गावात राजरोसपणे अवैध दारूविक्री सुरू आहे. आज दिलेल्या निवेदनावर कारवाई झाली नाही तर नागरिक उपोषणाला बसतील.
– **कल्पना टोंगारे,** सरपंच, कोचरगाव



# येवल्यातील मुक्तिभूमीतून माती कलश रवाना

**येवला : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटातर्फे मुंबई येथे महाराष्ट्र दिनी गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

या महोत्सवासाठी महाराष्ट्राच्या विविध भागातून महात्म्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीतून पवित्र माती संकलित करून ही पवित्र माती मुंबई येथे या कार्यक्रमासाठी पाठवण्यात येणार आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी येवला शहर व तालुका पदाधिकारी यांनी येवला शहरातील मुक्तिभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराची ऐतिहासिक घोषणा केलेल्या पवित्र जागेतील माती कलशामध्ये सकलित करून मुंबई येथे पाठवली आहे.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वसंत पवार, माजी नगरसेवक दत्ता निकम, भूषण लाघवे, विकी बिवाल, ज्येष्ठ नेते भागीनाथ पगारे, दीपक लोणारी, विशाल परदेशी, गोटू मांजरे, युनूस शेख, संजय पगारे, सचिन सोनवणे, सुभाष गांगुर्डे, सौरभ जगताप, दीपक पवार, मुस्ताक शेख, संतोष राऊळ, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### सातपूरमध्ये घरफोडी : रोख रक्कम व दागिन्यांसह ७५ हजारांचा ऐवज चोरीला

**सिडको :** सातपूर परिसरातील डेमोक्रेसी हॉटेल परिसरातील येथील बंदावणे मळ्याजवळ अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सुमारे ७५ हजार रुपये किमतीचा ऐवज लंपास केला आहे. या प्रकरणी सातपूर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी पंकज भिमराव तिनगोटे (वय ३०, रा. डेमोक्रेसी, सातपूर) हे काही दिवस घराबाहेर होते. २४ एप्रिल २०२४ रोजी दुपारी २.३० वाजता ते २६ एप्रिलच्या मध्यरात्री त्यांच्या अनुपस्थितीत अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरातील कपाट उचकून त्यामधील रोख रक्कम आणि दागिने चोरले. चोरीस गेलेल्या मालमत्तेमध्ये ५० हजार रुपये रोख आणि २० हजार रुपये किंमतीचे ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (मंगळसूत्र व दोन अंगठ्या) आणि ५ हजार रुपये किमतीचे ८ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने (बाजूबंद व पायातील चेन) यांचा समावेश आहे. तपास सहायक पोलीस निरीक्षक व सहायक पोलीस निरीक्षक पठाण करीत आहेत.

### महिलेच्या गळ्यातील दागिने हिसकावले

**सिडको :** नाशिकरोड परिसरातील मॉडेल कॉलनी येथे विघ्नहर्ता गणपती मंदिराजवळ भररस्त्यात एका महिलेच्या गळ्यातील सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने दोन अज्ञात इसमांनी मोटारसायकलवरून येत हिसकावून पळ काढला. फिर्यादी संगीता बनसोडे (वय ४०, रा. मॉडेल कॉलनी, जेलरोड, नाशिकरोड) या आपल्या पती व भाच्यासह उसाचा रस पिऊन परतत असताना त्यांच्या गळ्यातील दागिन्यांची चोरी झाली. गळ्यातील १० ग्रॅम वजनाचे, अंदाजे ६० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मनी मंगळसूत्र व १० ग्रॅम वजनाची, ६० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन हिसकावून घेतली. ही दोन्ही दागिने अंदाजे १ लाख २० हजार रुपयांचा आहे. या प्रकरणी नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास नाशिकरोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी व पोउनि आहिरे तपास करत आहेत.

### शिवशाहीमधून तिकीट मशीन चोरीला

**सिडको :** इंदिरानगर पोलीस ठाणे हद्दीत राणेनगर येथील साई पॅलेस हॉटेलजवळ, शिवशाही बसमधून ४० हजार रुपये किमतीचे इलेक्ट्रिकल तिकीट मशीन चोरट्यांनी चोरून नेले. २८ एप्रिल सकाळी ६.१५ वाजता ही घटना घडली. याप्रकरणी ज्ञानेश्वर नागरे यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, शिवशाही बस बंद पडल्याने चालक दुसरी बस आणण्यासाठी निघून गेले होते. या वेळी बसमध्ये एकटेच असलेल्या नागरे यांनी स्थानिक नागरिकांना पर्यायी मार्ग दाखवत असतानाच, चोरट्याने बसमध्ये प्रवेश करून कंडक्टर सीटवरील रॅक मधून 'ईबिक्सकॅश' कंपनीची तिकीट मशीन लंपास केली. सदर मशीनची किंमत अंदाजे ४० हजार रुपये असून, या प्रकरणी इंदिरानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा ऑनलाइन

**नाशिक :** राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी व्यवस्थापनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी ऑनलाइन -२०२५ परीक्षा ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात येणार आहे. या परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या या संकेतस्थळावर २५ एप्रिल २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, इच्छुक उमेदवारांनी या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# ५० लाख लिटर पाण्याची नासाडी थांबणार

## शिवडे बंधाऱ्यातील गळती काढण्यात नगरपालिकेला यश

**सिन्नर : प्रतिनिधी**

**गेल्या पाच - सहा महिन्यांपासून सुरू असलेली शिवडे बंधाऱ्यातील जलवाहिनीची गळती काढण्यात नगरपालिका प्रशासनाला अखेर यश आले आहे. रविवारी गळती काढण्याचे सुरू झालेले काम सोमवारी (दि.२९) दुपारी तीन वाजेपर्यंत पूर्ण झाले. संध्याकाळी ५ वाजेला पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला. ही गळती काढल्यामुळे दिवसाकाठी किमान ५० लाख लिटर पाण्याची बचत होणार आहे. त्यामुळे सिन्नरकरांना आता पूर्ण दाबाने पाणी मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. नगरपालिका वाढत्या पाण्याच्या आता कसे नियोजन करते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.**

सिन्नर नगरपालिकेने २४ एप्रिल रोजी शिवडे बंधाऱ्यातील गळती काढण्यास प्रारंभ केल्यानंतर तेथील ग्रामस्थांनी विरोध केल्यामुळे हे काम थांबवण्यात आले होते. पुन्हा रविवारी (दि.२८) दंगा नियंत्रण पथक आणि पोलीस बंदोबस्तात



**शिवडा बंधाऱ्यातील गळती काढताना नगरपालिकेचे दुरुस्ती पथक.**

गळती करण्याच्या कामास सुरुवात केली. बंधाऱ्यातील पाणी विद्युत मोटारी टाकून आणि डोंगळ्यांच्या सहाय्याने काढण्यात आले.

त्यानंतर रविवारी रात्री उशिरापर्यंत गळती काढण्याचे काम सुरू होते. सोमवारी ही गळती काढण्याचे काम पूर्ण झाले, मात्र काही प्रमाणात गळती राहिल्याने पुन्हा ही गळती काढण्याचे काम हाती घेण्यात आले. दुपारी तीन वाजेपर्यंत हे काम पूर्ण क्षमतेने पूर्ण झाल्यानंतर ५ वाजता कडवा धरणातून पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आल्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अभियंता प्रशांत मेश्राम यांनी दिली.

**एक वॉश आऊट व्हॉल्व्ह, ३ एअर व्हॉल्व्ह बदलले**

शिवडे बंधाऱ्यात १ वॉश आऊट व्हॉल्व्ह लिकेज होता तो पूर्ण बदलण्यात आला. त्यानंतर याच परिसरात असलेले तीन एअर व्हॉल्व्हही बदलण्यात आले. मेंटेनन्स टीमने त्यासाठी मेहनत घेतली. यापूर्वी सोनांबे आणि लोणारवाडी येथील गळती काढण्यात आली आहे. मात्र पुन्हा तिथे थोड्याफार प्रमाणात गळती झाली असून, ती तातडीने काढण्यात येणार असल्याची माहिती नगरपालिका प्रशासनाने दिली.

**३७ हजार नागरिकांची भागणार तहान**

शहरात माणसी सरासरी १३५ लिटर पाणी दिले जाते. हे पाणी पिण्यासाठी, स्वयंपाकासाठी आणि इतर वापरासाठी वापरले जाते. गळती काढल्यामुळे प्रतिदिन ५० लाख लिटर पाण्याची बचत झाल्यास शहरातील ३७ हजार लोकसंख्येला हे पाणी पिण्यासाठी आणि वापरण्यासाठी मिळणार आहे. वाचणाऱ्या पाण्यातून ३७ हजार शहरवासीयांची तहान भागणार आहे.




**पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ ठाणगावात काढलेल्या मोर्चात सहभागी झालेले ग्रामस्थ.**

# ठाणगावात दहशतवादी हल्ल्याचा मोर्चा काढून निषेध

## मारुती मंदिर चौकात श्रद्धांजली सभा

**ठाणगाव : वार्ताहर**

पहलगाम येथील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा सिन्नर तालुक्यातील ठाणगाव ग्रामस्थांच्या वतीने मोर्चा काढून निषेध नोंदवण्यात आला. हल्ल्यात मृत पावलेल्या पर्यटकांना गावातील मारुती मंदिर चौकात ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

गावातील बसस्थानकापासून पासून निघालेल्या मोर्चात पाकिस्तान मुर्दाबाद, भारत माता की जय या घोषणा देण्यात आल्या. मारुती मंदिराच्या प्राणंगणामध्ये मोर्चाचा समारोप करण्यात आला. सेवानिवृत्त सैनिक रोहन शिंदे यांनी मनोगतात हल्ल्याचा निषेध केला.

नागरिकांना धर्म विचारून अतिरेक्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. येथून पुढे गावामध्ये कोणीही बाहेरची व्यक्ती आढळल्यास ग्रामपंचायतला त्यांची व्यवस्थित माहिती देऊन चौकशी करावी. देशातील नागरिकांनी आता सतर्क राहायला हवे असे आवाहन शिंदे यांनी यावेळी केले. यावेळी सरपंच नामदेव शिंदे, प्रतीक शिंदे, बबन काकड, रामदास भोर, विलास मोरे, राजेंद्र काकड, अमित पानसरे, मोहन आव्हाड, गणेश शिंदे, किसन शिंदे, आदिनाथ शिंदे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्य भारतीची सिन्नर तालुका कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी देव थोरात, कार्याध्यक्षपदी भोरकडे

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील कामगार कल्याण केंद्रात पार पडलेल्या साहित्यिकांच्या बैठकीत साहित्य भारतीच्या सिन्नर तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

अध्यक्षपदी देव थोरात, कार्याध्यक्षपदी बाबासाहेब भोरकडे तर उपाध्यक्षपदी मोहन वाघचौरे व वृक्षमित्र विष्णू वाघ यांची नियुक्ती करण्यात आली. कोषाध्यक्षपदी सौ. सुनीता वाळुंज संघटकपदी सौ. सुनीता सांगळे, प्रसिद्धीप्रमुखपदी जालिंदर डावरे यांची नियुक्ती करण्यात आली, कार्यकारिणीत सदस्यपदी उत्तम खताळे, सौ. जयश्री चव्हाणके, सौ. प्रियांका वाबळे,योगेश थोरात, अमोल चिने, नागेश सोंडकर , सोमनाथ एखंडे, अंकुर काळे, सौ. रोहिणी मिठे, शाहीर स्वप्निल डुंबरे




यांची नियुक्ती करण्यात आली, मार्गदर्शक म्हणून प्रा. राजाराम मुंगसे, रवींद्र कांगणे, मनीषा उगले, किरण भावसार, प्रा. जावेद शेख काम पाहणार आहेत.साहित्य भारती ही भारतभर कार्यरत असलेल्या अखिल भारतीय साहित्य परिषदेची शाखा असून ती महाराष्ट्रात साहित्य भारती नावाने काम करते. मराठी साहित्य आणि संस्कृतीचा प्रसार, विविध साहित्यिक उपक्रम, स्पर्धा आणि प्रकाशने आदी कार्यक्रम संस्थेच्या वतीने आयोजित केले जातात. या नवनियुक्त कार्यकारिणीचे अभिनंदन होत आहे.

# मूलभूत सुविधा पुरवण्यात पालिका प्रशासन अपयशी

## शहर भाजपाच्या बैठकीत शहरातील समस्येवर चर्चा

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर तालुका भारतीय जनता पार्टीच्या शहरातील पदाधिकाऱ्यांची बैठक पक्ष कार्यालयात नूतन अध्यक्ष सजन सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहरातील वाहतूक कोंडी, अपुरा पाणीपुरवठा आणि इतर समस्या संदर्भात यावेळी चर्चा करण्यात आली.




माजी शहराध्यक्ष बाळासाहेब हांडे, सुभाष करपे यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या तीन वर्षांपासून नगरपालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती असल्याने शहरातील विकास कामांना खीळ बसले आहे. रस्त्यावरील वाहतूक कोंडी रोजची डोकेदुखी ठरली आहे. बेशिस्त भाजीपाला आणि फळ विक्रेत्यांमुळे अतिक्रमणाची समस्या बोकाळली आहे. बहुतेक खांबावर पथदीप नसून, या भागात नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागतो. बहुतेक ठिकाणी घंटागाडी पोहोचत नाही. अनेक रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात कचरा बघावयास मिळत आहे. त्यामुळे सिन्नरकरांना मूलभूत सुविधा मिळवून देण्यासाठी पुढाकार घेण्याचा निर्णय भाजपाच्या बैठकीत घेण्यात आला. त्याचप्रमाणे या संदर्भात मुख्याधिकाऱ्यांना जाब विचारण्याचा निर्णय घेण्यात आला. याप्रसंगी विनोद आंबोले, देवयानी वाघ, गणेश क्षीरसागर, अनिता गांडुळे, पोपटराव पगार, प्रिया लहामगे, संतोष चव्हाण, दत्तात्रय आचार्य, रामचंद्र रोडे, गोपाल भराडे, वसंत बेनके, योगेश सानप, प्रमोद उगले, गंगाराम खैरे, गौतम गरजमल आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

**पाणी समस्येवर तीव्र नाराजी**

कडवा धरणात पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध असतानाही नगरपालिकेच्या नियोजनामुळे नागरिकांना आठ-आठ दिवसांनी पाणी मिळत आहे. पालिका प्रशासनाला या संदर्भात जाब विचारण्याचा निर्धार भाजपा पदाधिकाऱ्यांनी या बैठकीत केला.

# महायुतीच्या मंत्र्यांमध्ये नैतिकता नाही : सपकाळ

**नाशिक : प्रतिनिधी**

२६/११ चा अतिरेकी हल्ला झाल्यानंतर तेव्हाचे गृहमंत्री आर. आर. पाटील काही काळ बाजूला गेले होते. संसदेवर हल्ला झाला त्यावेळी संबंधित मंत्र्याने जबाबदारी स्वीकारली होती. पण, आता जबाबदारी घेण्याचा भागच नष्ट होत चालला आहे. कृषिमंत्र्यांवर न्यायालयानेच ठपका ठेवला आहे. धनंजय मुंडेंवरही आरोप झाले. तरीही नैतिकता दाखविली जात असून, एकप्रकारे हरवत चालली आहे, असा टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला.

सद्भावना यात्रेनिमित्त नाशिकमध्ये आलेले सपकाळ यांनी शासकीय विश्रामगृहावर पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, राज्यभर ताणतणावाची परिस्थिती आहे. जातीय तेढ, धर्मांधता दिसून येत आहे. निवडणुका येतील आणि जातील. पण, सामाजिक ऐक्य टिकून राहिले पाहिजे. फुले-शाहू-आंबेडकर यांचा पुरोगामी महाराष्ट्राचा महाराष्ट्र धर्म टिकला पाहिजे. महाराष्ट्र धर्म टिकला तरच देश टिकणार आहे.

सामाजिक ऐक्य टिकून राहावे, या उद्देशाने सद्भावना यात्रा काढण्यात आली आहे. नागपूरनंतर नाशिकमध्ये आलो असल्याचे त्यांनी स्पष्ट केले .

पहलगाम घटनेचा आपण निषेध करतो. पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून काँग्रेस पक्ष सरकारसोबत आहे. राष्ट्र म्हणून आपण सर्वांनी एक असलो पाहिजे. कोणीही पक्षीय अभिनिवेशात काहीही बोलू नये. काँग्रेसच्या कार्यकारी समिती यासंदर्भात जी भूमिका घेतली, तीच भूमिका पक्षाच्या सर्व नेत्या-कार्यकर्त्यांनी घेतली पाहिजे, असे सांगत विजय वडेट्टीवार जे काही बोलले, त्यावर त्यांनी खुलासा केला आहे. आता कोणीही त्यांच्या वक्तव्यावर टीका करू नये, असे आवाहनही त्यांनी केले. ईडीचे कार्यालय असलेल्या इमारतीला आग लागल्याच्या घटनेसंदर्भात सपकाळ यांनी ईडीने आग लागली कशी, त्यास जबाबदार कोण, हे सांगितले पाहिजे, अशी मागणी केली.

> काठेगल्ली येथील दर्गा हटविल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवरही सपकाळ भाष्य केले. या घटनेत पोलिसांनी योग्य दिशेने तपास करावा. जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. पुरावे तपासावेत, चुकीची कारवाई करू नये. कोणीही कायदा हातात घेऊ नये, असे आवाहन केले.

# सद्भावना रॅलीतून एकात्मतेचा संदेश

## 'नफरत छोडो.. देश जोडो'च्या घोषणा

**नाशिक : प्रतिनिधी**

काँग्रेसच्या वतीने एकात्मता, शांती आणि सद्भावनेचा संदेश देण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत सद्भावना रॅलीचा नाशिक शहरातून प्रारंभ करण्यात आला. देशभरात भाजपा सरकारकडून हिंदू आणि मुस्लिम या दोन समाजात तेढ निर्माण करणारे वातावरण निर्माण करत राजकारण करण्यात येत असल्याचा आरोप काँग्रेसकडून सद्भावना यात्रेच्या निमित्ताने करण्यात आला. या यात्रेच्या माध्यमातून समाजातील एकात्मता टिकवून ठेवणे हा मुख्य हेतू आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यात्रेप्रसंगी सांगितले. प्रदेश काँग्रेस कार्याध्यक्ष कुणाल पाटील, खासदार शोभा बच्छाव, नाशिक शहर जिल्ह्याचे प्रभारी ब्रिजकिशोर दत्त, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शिरीष कोतवाल, काँग्रेस शहराध्यक्ष आकाश छाजेड, प्रदेश कमिटीचे उपाध्यक्ष राजाराम पानगव्हाणे, नाशिक जिल्हा ग्रामीण युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष गौरव



पानगव्हाणे, उपाध्यक्ष शरद आहेर, प्रदेश काँग्रेस सचिव राहुल दिवे, प्रदेश युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष स्वप्निल पाटील, महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाख, प्रदेश एनएसयूआयचे अध्यक्ष अमीर शेख, काँग्रेस महिला शहराध्यक्ष स्वाती जाधव, अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष ज्ञानेश्वर काळे, काँग्रेस सेवा दलाचे वसंत ठाकूर, वत्सला खैरे, बबलू खैरे यांच्यासह मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते. सद्भावना यात्रेस प्रारंभ हुतात्मा स्मारकात अभिवादन करून करण्यात आला.

> काँग्रेसच्या सद्भावना रॅलीत नफरत छोडो, देश जोडो, संविधान जिंदाबाद, आतंकवाद मुर्दाबाद, आतंकवादाला धर्म नाही, अशा घोषणा करत सद्भावना यात्रेत बॅनर झळकवण्यात आले.

हुतात्मा स्मारकातून निघालेल्या सद्भावना यात्रेचा संत गाडगे महाराज पुतळ्यासमोर समारोप झाला. यावेळी यात्रा मार्गावरून ठिकठिकाणाहून काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले.

हुतात्मा स्मारकापासून सद्भावना यात्रेला सुरुवात झाली. मेहेर सिग्नल, महात्मा गांधी रस्ता, रेड क्रॉस सिग्नल, नेहरू गार्डन, शालिमार, गंजमाळ सिग्नल, दूध बाजार, बादशहा चौक मार्गे ही यात्रा संत गाडगे महाराज पुतळ्याजवळ पोहचली. या ठिकाणी समारोप झाला. यावेळी खासदार डॉ. शोभा बच्छाव, प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष कुणाल पाटील, प्रभारी ब्रिजकिशोर दत्त, जिल्हाध्यक्ष शिरीष कोतवाल, शहराध्यक्ष आकाश छाजेड आदींसह विविध आघाड्यांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# निधीअभावी रखडले ६९ अंगणवाड्यांचे काम

## पावसाळ्यात होतात चिमुकल्यांचे हाल

**नाशिक : प्रतिनिधी**

जागेअभावी व इतर कारणांमुळे शहरातील विविध भागात मनपाच्या स्वतःच्या हक्काच्या अंगणवाड्या नसल्याचे चित्र आहे. तब्बल ६९ अंगणवाड्यांमधील चिमुकल्यांना खासगी जागांमध्ये, मंदिराच्या आवारात, झाडाखाली, समाजमंदिरात शिक्षणाचे धडे घ्यावे लागत असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. बांधकाम विभागाकडून ६९ अंगणवाडया बांधल्या जाणार होत्या. मात्र, समाजकल्यानकडे पुरेसा निधीच नसल्याने या अंगणवाड्यांचे काम रखडले आहे.

महापालिका हद्दीत ४१९ अंगणवाड्या असून, त्यापैकी ६९ ठिकाणी चिमुकल्यांना हक्काची जागा नसल्याचे धक्कादायक वास्तव आहे. परिणामी, बालकांना इतरत्र बसवले जात आहे. बालकांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून महापालिकेकडून विविध उपाययोजना केल्या जातात.

मात्र चिमुकल्यांना बसायलाच जागा नसल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे मुलांना शिक्षणाची गोडी कशी लागणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तत्कालीन समाजकल्याण विभागाचे उपआयुक्त डॉ. दिलीप मेनकर यांनी अंगणवाड्यांसाठी स्वतःची इमारत असावी, यासाठी तत्कालीन आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता.

महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत ४१९ अंगणवाड्या चालविल्या जात असून, शहरातील गरीब आणि सामान्य कुटुंबांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अंगणवाड्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. खासगी नर्सरीचा खर्च झेपावत नसल्याने पालक मनपाच्या अंगणवाड्यांमध्ये मुलांना टाकतात.

> जेथे पक्क्या अंगणवाड्या नाहीत तेथे अंगणवाड्या बांधण्यात येणार आहे. काही ठिकाणी देखभाल-दुरुस्ती केली जाणार असून, बांधकाम विभागाकडे प्रस्ताव देणार आहोत.
>
> **-नितीन नेर,** उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मनपा

गेल्या काही वर्षांत अंगणवाड्यांची स्थिती अत्यंत वाईट असून, महापालिका प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे.

आर्थिक दुर्बल कुटुंबांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अंगणवाड्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. विशेषतः खासगी शाळांच्या स्पर्धेत मनपाच्या शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. परंतु, मनपा प्रशासनाचे अंगणवाड्यांकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे.

# खोपडी, पाथरेच्या साईभक्त निवास इमारतींचे व्यवस्थापन संस्थानने करावे

## कृषिमंत्री कोकाटे यांचे साई संस्थानच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पत्र

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर-शिर्डी महामार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचएआय) वतीने सिन्नर तालुक्यातील खोपडी व पाथरे ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रात बांधकाम करण्यात आलेल्या साईभक्त निवास इमारती श्री साईबाबा संस्थानने व्यवस्थापनासाठी ताब्यात घ्याव्यात, अशी सूचना कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त संस्थेच्या शिर्डी येथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना लेखी पत्र दिले आहे.

सिन्नर - शिर्डी राष्ट्रीय महामार्गावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या वतीने ग्रामपंचायत खोपडी व पाथरे शिवारात अद्ययावत साई भक्त निवास बांधले आहे. सदर भक्तनिवास बांधकाम पूर्ण होऊनही अद्याप वापरात आणलेले नाही. त्यामुळे या मार्गावरून रात्री - अपरात्री प्रवास करणारे साईभक्त, पदयात्री यांची गैरसोय होत आहे. या भक्त निवासी इमारत श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था यांचेकडे व्यवस्थापनासाठी सुपूर्द करण्यास वरील ग्रामपंचायतची हरकत नाही. सदर भक्तनिवास इमारत व तेथील परिसर श्री साईबाबा संस्थानच्या ताब्यात दिल्यास उत्कृष्ट व्यवस्थापन होऊन साईभक्त तसेच परिसरातील नागरिकांना सदर इमारतीचा योग्य पद्धतीने वापर करता येईल.

स्थानिक स्तरावर लहान मोठ्या कार्यक्रमांसाठी देखील पालख्या नसतानाच्या कालावधीत वापर शक्य होईल. नाममात्र शुल्क आकारून सर्वसामान्य भाविकांसाठी सदर परिसरातील सुविधांचा लाभ मिळेल. तसेच स्थानिक पातळीवर स्थानिक बेरोजगार युवकांना कायमस्वरूपी रोजगार देखील उपलब्ध होईल.

**स्थानिकांनाही पुरवता येईल आरोग्य सुविधा**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या भक्तनिवास इमारती श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था यांच्याकडे विनाअट व्यवस्थापनासाठी ताब्यात देण्याची कार्यवाही करावी, जेणेकरून या ठिकाणी संस्थानमार्फत परिसरातील गावांसाठी आरोग्य सुविधा देखील पुरवता येईल. आपले स्तरावरून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाशी पाठपुरावा करावा व भक्त निवासच्या पाथरे आणि खोपडी ग्रामपंचायत हद्दीतील या इमारतीचे व्यवस्थापन करण्यासाठी पुढाकार घ्यावा. नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी देखील मोठ्या प्रमाणात देशभरातील भाविक शिर्डी ते नाशिक असा प्रवास करतील. त्या भाविकांना देखील संस्थांच्या मार्फत सदर भक्तनिवासांमध्ये माफक दरात सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होईल, असेही कोकाटे यांनी म्हटले आहे.



▸▸ मालेगाव महापालिकेकडून वृक्षांना टँकरद्वारे पाणीपुरवठा ▸▸ पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



▸▸ येवल्यातील मुक्तिभूमीतून माती कलश रवाना ▸▸ पान ६

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५


# पुण्याच्या धर्तीवर शहरात ठरणार पार्किंग पॉलिसी

## प्रक्रिया अंतिम टप्प्यात; मनपा आयटीडीपी संस्थेशी करणार करारनामा

**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक महापालिकेच्या वाहतूक विभागाने शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्याकरिता व वाहतूक कोंडी फोडण्यासाठी शहरात ३५ ठिकाणी स्मार्ट पार्किंगची उभारणी केली जाणार आहे. दरम्यान, शहरात पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पार्किंग पॉलिसी ठरवली जाणार असून, आयटीडीपी (इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्स्पोर्टेशन अँड डेव्हलपेंट पॉलिसी) या संस्थेशी महापालिका करारनामा करणार आहे. दोन आठवड्यांत स्मार्ट पार्किंगची निविदा खुली होण्याची शक्यता आहे. शहरात २९ ऑन स्ट्रीट आणि सहा ऑफ स्ट्रीट अशा एकूण ३५ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था केली जाणार आहे.**

महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी मंगळवारी (दि.२९) स्मार्ट पार्किंगवर बैठक घेत सद्यस्थित पार्किंगची प्रक्रिया कुठवर आली, याबाबत माहिती घेऊन लवकरात लवकर सदर प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचना वाहतूक सेलला दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, वाहतूक सेलचे कार्यकारी अभियंता रवींद्र बागुल, आयटीडीपी संस्थेचे सदस्य उपस्थित होते. महापालिकेच्या वाहतूक सेलने शहरातील सार्वजनिक वाहतूक सुरळीत व्हावी, यादृष्टीने महापालिकेच्या ट्रॅफिक सेलने वाहनतळ निश्चित केले आहेत. स्मार्ट पार्किंग करताना पाचशे मीटर परिसर नॉन पार्किंग असेल. सदर परिसरात वाहने उभी केल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. स्मार्ट सिटी कंपनीने २०२०-२१ च्या दरम्यान शहरात स्मार्ट पार्किंग प्रकल्प हाती घेतला होता. त्यासाठी ट्रायजीन कंपनीला हा प्रकल्प चालविण्यासाठी देण्यात आला होता. मात्र, कोरोना महामारीमुळे प्रकल्पाला फटका बसला. पार्किंग दरात कपात करून मिळावी, ही मागणी अमान्य झाल्याने ठेकेदार कंपनीने प्रकल्प थांबविला. त्यावरून स्मार्ट सिटी कंपनीने ठेका रद्द का करू नये, अशी ठेकेदाराला नोटीस बजावत १ कोटी १८ लाखांची बँक गॅरंटी वर्ग करून घेतली. त्यामुळे ट्रायजीन कंपनीने स्मार्ट सिटीविरोधात जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला. महापालिकेच्या वाहनतळ प्रक्रियेत हा अडथळा ठरेल असे वाटत होते. मात्र, याप्रकरणी महापालिकेला कुठलीही अडचण येणार नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी म्हटले. मनपाच्या वाहतूक विभागाने निश्चित केलेल्या शहरासह परिसरात ३५ वाहनतळांमुळे एकाच वेळी ४ हजार ८६५ वाहने पार्क करण्याची व्यवस्था निर्माण होणार आहे. कोंडी आणि वादविवादाच्या प्रसंगांना नागरिकांना सामोरे जावे लागते. महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी ऑन स्ट्रीट आणि ऑफ स्ट्रीट वाहनतळ सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. तत्पूर्वी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी शहरातील वाहनतळांच्या जागांचा सर्व्हे करत ठिकाणे निश्चित केली आहेत. महापालिकेच्या जागेवर विकासकांनी उभारलेली चार वाहनतळेदेखील महापालिका ताब्यात घेऊन त्या ठिकाणी पे अँण्ड पार्क सुरू करणार आहे.

### आयुक्त खत्रींकडून या सूचना

शहरात पार्किंग उभारताना कुठेही वाहतूक कोंडी होणार नाही, याबाबतचे नियोजन असावे. शिवाय पोलीस प्रशासनाशी संवाद साधून त्यांच्याकडून माहिती घ्यावी. राज्यातील इतर शहरांत पार्किंग पॉलिसी कशी आहे, त्याचा अभ्यास करावा. आयुक्तांच्या सूचनेनुसार मनपाचे कार्यकारी अधिकारी रवींद्र बागुल व आयटीडीपी या सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी वाहतूक शाखेने मंगळवारी पोलीस प्रशासनाच्या वाहतूक शाखेतील प्रमुखांना भेटून टोइंगसह इतर तांत्रिक माहिती जाणून घेतली.

## गिरीश महाजन करणार महाराष्ट्रदिनी ध्वजवंदन

**नाशिक : प्रतिनिधी**



महाराष्ट्र दिनानिमित्त नाशिकमध्ये ध्वजवंदनाचा मान जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांना मिळाला आहे. यासंदर्भात शासनाकडून यादी जाहीर करण्यात आली आहे. यादीप्रमाणे नाशिकमध्ये महाराष्ट्रदिनी मंत्री गिरीश महाजन तर रायगडमध्ये आदिती तटकरे ध्वजवंदन करतील. अमरावतीत शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात येणार आहे.

चार महिन्यांपासून नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा कायम आहे. महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर नाशिकच्या पालकमंत्रिपदाची धुरा भाजपचे गिरीश महाजन यांच्याकडे तर रायगडच्या पालकमंत्रिपदाची धुरा आदिती तटकरे यांच्याकडे देण्यात आली होती. पालकमंत्रिपदी महाजन यांची वर्णी लागताच नाशिकमध्ये शिवसेना शिंदेगटाने नाराजी व्यक्त केली. तर जिल्ह्यात सर्वाधिक आमदार असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही पालकमंत्रिपदावर दावा केला होता. यामुळे नाशिकच्या पालकमंत्रिपदाबाबत तिढा निर्माण झाला. मंगळवारी (दि.२९) जाहीर करण्यात आलेल्या यादीत नाशिकमध्ये महाराष्ट्रदिनी १ मे रोजी मंत्री गिरीश महाजन ध्वजवंदन करणार असल्याने पालकमंत्रिपदाचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. २०२७ मध्ये नाशिकमध्ये कुंभमेळा होणार असल्याने महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची अंमलबजावणी सुरळीतपणे व्हावी यासाठी भाजप जिल्ह्याच्या प्रशासनावर आपली पकड कायम ठेवण्यास उत्सुक आहे. तर २०२२ ते २०२४ दरम्यान पालकमंत्री राहिलेल्या दादा भुसेंनीही पालकमंत्रिपदावर दावा ठोकला आहे. याचवेळी कृषिमंत्री कोकाटेंनीही पालकमंत्रिपदासाठी प्रयत्न सुरू केल्याने हा तिढा कधी सुटणार अन् पालकमंत्रिपदाची घोषणा कधी होणार, याच्या प्रतीक्षेत सामान्य नाशिककर आहेत.

# समृद्धी महामार्गाचे काम पूर्णत्वास

## इगतपुरी ते कसारादरम्यान देशातील सर्वाधिक लांबी, रुंदीचा बोगदा

**इगतपुरी : प्रतिनिधी**

राज्याच्या दळणवळणाला 'समृद्ध' करणारा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मुंबई ते नागपूर हा ७०१ किलोमीटर लांबीचा समृद्धी महामार्ग १ मे महाराष्ट्रदिनाच्या पार्श्वभूमीवर पूर्ण क्षमतेने खुला होण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार असल्याचे बोलले जात आहे.

या महामार्गाचा अखेरचा नाशिक-मुंबई हा टप्पा महाराष्ट्रदिनी अर्थात १ मे रोजी खुला केला जाण्याची शक्यता असल्याने, नाशिक-मुंबई हे अंतर अवघ्या अडीच तासांवर येणार आहे. इगतपुरी ते आमणे या टप्प्यातील ७६ किमी लांबी नाशिक व ठाणे जिल्ह्यात येते. या टप्प्यामध्ये कसारा घाटात एकूण पाच बोगदे असून, या बोगद्यांची एकूण लांबी ११ किमी आहे. त्यातील इगतपुरी ते कसारा दरम्यान दुतर्फा बोगदा ७.८ किमी लांबीचा असून, हा देशातील सर्वाधिक लांबी व रुंदीचा बोगदा आहे. या बोगद्याची उंची ९.१२ मीटर आहे. या बोगद्यामुळे केवळ आठ मिनिटांत इगतपुरी ते कसारा हे अंतर पार करता येणार आहे. कसारा घाटाला पर्यायी मार्ग म्हणून या महामार्गाकडे पाहिले जात आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ नाशिक महामार्गावरील कसारा घाटाला पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यामुळे वाहतूक जलद होणार आहे. त्याचा फायदा नाशिकच्या दळणवळणाला होणार आहे.



इगतपुरी येथील नांदगावसदो येथील कसारा घाटाकडे जाणारा बोगदा. (छाया : ओंकार गवांदे)

रस्ते विकास महामंडळाने ५५ हजार कोटी रुपयांचा निधी खर्चून ७०१ किमी लांबीचा २४ जिल्ह्यांना जोडणारा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग उभारून राज्याचे दळणवळण गतिमान केले आहे. आतापर्यंत या महामार्गाचे टप्प्याने लोकार्पण करण्यात आले असून, ६२५ किमी लांबीचा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. आता अखेरचा इगतपुरी-आमणे, भिवंडी हा ७६ किमीचा टप्पा पुढील मे महिन्यात खुला केला जाणार आहे. त्याचा सर्वाधिक फायदा नाशिक जिल्ह्याला होणार असून, देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई आता नाशिकहून अवघ्या अडीच तासांत गाठता येणार आहे. मुंबई-पुणे - नाशिक या सुवर्ण त्रिकोणात नाशिकला स्थान असले तरी मुंबई-पुण्याच्या मानाने नाशिकचा म्हणावा तसा विकास झाला नाही. यास दळणवळण हे प्रमुख कारण मानले जाते. समृद्धीमुळे नाशिक मुंबईच्या अधिक जवळ जाणार असल्याने, त्याचा मोठा फायदा नाशिकच्या विकासाला होणार असल्याने, अखेरचा टप्पा लवकर खुला केला जावा, अशी मागणी प्रवासी व वाहनधारकांनी केली आहे.

# चंदुकाका सराफमध्ये सोने खरेदीवर प्रतितोळा २५०० रु. सूट

## खरेदीदारांना ज्युपिटर बाइक जिंकण्याची संधी

**नाशिक :** अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर चंदुकाका सराफमध्ये सोने खरेदी करणे तुम्हाला लाभदायक ठरणार आहे. येत्या ३० एप्रिल रोजी अक्षयतृतीयेच्या सुवर्ण मुहूर्तावर रु. ३०,००० व पुढील खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ज्युपिटर बाइक जिंकण्याची संधी मिळणार आहे. तसेच शुभमुहूर्ताच्या खरेदीसाठी सोन्याच्या दागिन्यांवरदेखील रु. २५०० प्रति १० ग्रॅमपर्यंत खास सूट देण्यात आली आहे. तसेच सोन्याच्या दागिन्यांच्या खरेदीवर ग्राहकांना किमान रुपये १०० प्रति ग्रॅम सूट मिळणार आहे. त्याचप्रमाणे हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १०० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येणार आहे आणि ०% घट जुन्या सोन्याच्या दागिन्यांवर आहे. चंदुकाका सराफ यांच्या सर्व स्टोअर्समध्ये हे लाभ ग्राहकांना घेता येतील. तसेच प्रत्येक स्टोअरमध्ये १ व बारामती स्टोअरमध्ये २ ज्युपिटर बाइक्स जिंकण्याची संधी मिळणार आहे. या ऑफर्स केवळ अक्षयतृतीयेच्या दिवशी म्हणजेच ३० एप्रिल रोजीच लागू राहणार आहेत, असे चंदुकाका सराफ प्रा. लि. चेअरमन किशोरकुमार शहा व संचालक सम्यक शहा यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक : १८०० २६७ ८५५५.

चंदुकाका सराफ SINCE 1827 Jewellers Loved Across Generations

# नाशिक शहर पोलिस दलाचे अभिमानास्पद यश

## उपायुक्त बच्छाव, राऊत यांच्यासह ४८ पोलिसांचा महासंचालक पदकाने गौरव

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून राज्यातील पोलिस दलात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांना पोलिस महासंचालक पदक जाहीर करण्यात आले आहे. नाशिक शहर पोलिस दलासाठी ही अत्यंत गौरवाची बाब ठरली आहे, कारण यंदा नाशिक शहरातील उपायुक्त प्रशांत बच्छाव आणि मोनिका राऊत यांच्यासह एकूण ४८ अधिकारी व कर्मचाऱ्यांना या प्रतिष्ठेच्या पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

गुन्हे शाखेचे उपायुक्त प्रशांत बच्छाव यांनी गंभीर गुन्ह्यांचा तपास करताना दाखवलेली कार्यक्षमता, तसेच परिमंडळ दोनच्या उपायुक्त मोनिका राऊत यांनी पोलीस व्यवस्थापनात दाखवलेले नेतृत्व, हे पदक मिळवण्यामागे ठळक कारण ठरले आहे. त्यांच्या कार्यकुशलतेची आणि प्रशासनातील योगदानाची राज्य पातळीवर दखल घेतली गेली आहे.




या सन्मानप्राप्त यादीत म्हसरूळचे प्रभारी निरीक्षक अंकुश चिंतामण, सातपूरचे प्रभारी रणजित नलावडे, अंबड पोलिस ठाण्यांतर्गत चुंचाळे चौकीचे प्रभारी निरीक्षक मनोहर कारंडे यांचाही समावेश आहे. तसेच उपनिरीक्षक मुक्तारखान पठाण, सहाय्यक उपनिरीक्षक संपत जाधव, हवालदार नाजीमखान पठाण, नितीन धोंडगे, देवीदास ठाकरे, प्रवीण पगारे, अतुल पाटील, राजेंद्र सांगळे, धनंजय शिंदे, अरविंद उगले, घनश्याम पाटील, गायत्री गोसावी, संतोष काळे, विजय वरंदळ, प्रशांत मरकड नलावडे आणि विशेष शाखेचे निरीक्षक युवराज पत्की तसेच शहर, ग्रामीण महाराष्ट्र पोलिस अकादमीतील ४८ पोलिस अधिकारी-अंमलदारांचा यात समावेश आहे.

राज्याचे पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी महाराष्ट्र दिन पार्श्वभूमीवर २०२४ या वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील ८०० पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांना पोलिस महासंचालक पदक जाहीर केले. यात शहर आयुक्तालयातील २९, नाशिक ग्रामीण पोलिस दलातील १७ आणि महाराष्ट्र पोलिस अकादमीतील तीन असे ४८ पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तर नाशिक ग्रामीण : सहायक निरीक्षक उमेश बोरसे, उपनिरीक्षक राजीक शेख,सहायक उपनिरीक्षक हारून शेख, हवालदार भगीरथ भडांगे, शरद कडलग, नंदू वाघ, प्रवीण वनवे, कृष्णा माळोदे, जालिंदर खराटे, प्रशांत पाटील, विजय बिलघे, गोरक्षनाथ संवत्सकर, हेमंत गिलबिले, पोलिस नाईक सुशांत मरकड, श्रीकांत देशमुख, संकेत कासार. महाराष्ट्र पोलिस अकादमी : हवालदार प्रदीप वाघमारे, राजू दोरकर, सुनील कोकणे आदींचाही गौरव करण्यात आला आहे.

या पदकामुळे नाशिक पोलिस दलातील कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावले असून, आगामी काळात अधिक जोमाने सेवा बजावण्याची प्रेरणा त्यांना मिळणार आहे. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या या यादीत नाशिकच्या कामगिरीची ठळक नोंद घेतली गेली असून, शहरात सर्वत्र या यशाबद्दल अभिनंदन व्यक्त होत आहे.









## महाजननगरला कुत्र्यांचा सुळसुळाट

**नाशिक :** सिडको परिसरातील महाजननगर, एकदंतनगर परिसरात रात्रीच्या वेळी कुत्रे कामगार, पादचाऱ्यांवर हल्ले करून चावा घेत आहेत. अनेक वाहनधारकांच्या मागे हे कुत्रे लागतात. त्यामुळे अनेक वाहनधारकांचा अपघातही झाला आहे. या परिसरात कामगार वर्ग राहत असून, रात्री-बेरात्री यावे-जावे लागते. परंतु हे कुत्रे रस्त्यावरच ठाण मांडतात. या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.





आरओसी-2025-26/क्र-5/C४४४



स्टेट बँक ऑफ इंडियाचा शेअर ९०० रुपयांच्या पार जाणार पान ३

नाशिक आज
# गांवकरी



राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलचे उद्घाटन पान ३

नाशिक, बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५

महत्त्वाचे ▶▶▶▶



## डॉ. गुजर सुभाष शाळेत उन्हाळी शिबिराला सुरुवात

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

शंकर एज्युकेशन सोसायटी संचालित डॉ. गुजर सुभाष हायस्कूलच्या वतीने दहादिवसीय उन्हाळी शिबिर आयोजित करण्यात आले असून, त्याची सुरुवात शुक्रवार दिनांक २५ रोजी सायंकाळी डॉ. गुजर सुभाष हायस्कूलच्या सभागृहात संस्थेचे सचिव रतन चावला यांच्या हस्ते करण्यात आली. इनडोअर खेळात चेस, कॅरम, टेबल टेनिस तर आऊटडोअर खेळात क्रिकेट, व्हॉलीबॉल आणि बॅडमिंटन खेळ खेळण्यात येणार असून, या उन्हाळी शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन शाळेतर्फे करण्यात आले. शिबिर यशवीतेसाठी क्रीडाशिक्षक बालकृष्ण घोलप, गुरप्रीत कौर ढीलोन, रोहित सोनार, नॉलबट जोसेफ, मनोज कनोजिया, तांजिल शेख, भाऊसाहेब घनदाट, गौरव अमेसर, सागर घोरपडे प्रयत्नशील राहणार आहे. पहिल्या दिवशी जवळपास २५ मुलांनी सहभाग घेतला.

## जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय उद्यापासून कार्यान्वित

**नाशिक :** दिव्यांग कल्याण विभागाच्या १०० दिवसांचा कृती आराखडा या उपक्रमांतर्गत प्रादेशिक व जिल्हास्तरावर कार्यालय सुरू करणे या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार नाशिक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन आवारातील शासकीय अंधशाळेच्या इमारतीत जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय १ मेपासून कार्यान्वित होणार असल्याची माहिती नाशिकचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी भरत चौधरी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. या कार्यालयामार्फत दिव्यांग शाळा संहिता, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना, नियम इत्यादीबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद यांच्यामार्फत सद्यस्थितीत होणारी कामे करण्यासाठी जिल्हा समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद यांना देण्यात आलेले प्रशासकीय व वित्तीय अधिकारी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांना सोपविण्यात आले आहे.

## 'लाभार्थ्यांनी हयातीचे दाखले सादर करावेत'

**नाशिक :** संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांचे हयातीचे दाखले ३० जूनपर्यंत सादर करावे, असे आवाहन संजय गांधी योजना नाशिक शहर तहसीलदार उषाराणी देवगुणे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. हयात प्रमाणपत्र सादर करताना यासोबत बँक पासबुक, रेशनकार्ड, दारिद्र्यरेषा प्रमाणपत्र, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र यांच्या छायांकित प्रत, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थींकरिता रुपये २१ हजार उत्पन्नाचा दाखला, दिव्यांग लाभार्थींकरिता रुपये ५० हजार उत्पन्नाचा दाखला, मतदान ओळखपत्र, मुलाचे वयाचे दाखले, दिव्यांग लाभार्थी यांनी महानगरपालिकेतून लाभ घेत नसल्याबाबत प्रमाणपत्र, लाडकी बहीण योजनेचा लाभ घेत नसल्याबाबत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतील ५० वर्षे व त्यापुढील वयोगटातील लाभार्थ्यांसाठी उत्पन्नाचा दाखला दरवर्षी न घेता तो ५ वर्षांतून एकदा जमा करावयाचा आहे. त्यामुळे मागील वर्षी ज्या लाभार्थ्यांनी उत्पन्न दाखले जमा केलेले आहेत, त्यांनी उत्पन्नाचा दाखला जमा करण्याची आवश्यकता नाही.



## मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापक आज घेणार सिंहस्थाचा आढावा

**नाशिक : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या भुसावळ डिव्हिजनच्या विभागीय व्यवस्थापक इती पांडे या सिंहस्थाच्या रेल्वेचा आढावा घेण्यासाठी आज बुधवारी दि.३० नाशिक रोड रेल्वेस्थानक येथे येणार आहेत.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या गर्दीचे नियोजन करणे, रेल्वेगाड्यांचे व्यवस्थापन करणे व रेल्वेस्थानक येथील सेवासुविधांचा आढावा घेण्याच्या दृष्टीने इती पांडे या नाशिक येथे बैठक घेणार आहेत. त्यासोबतच त्या विविध स्थानकांना भेटी देऊन तेथील व्यवस्था व स्थितीची पाहणी करणार आहेत.

### चेअरमन सतीश कुमार शनिवारी नाशिकला

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने प्रयागराज येथे करण्यात आलेल्या विविध उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर आगामी नाशिकच्या असल्यास कुंभमेळ्यासाठी नाशिक रोड रेल्वेस्थानकाला पर्यायी रेल्वेस्थानके निर्माण करणे व गर्दीचे विभाजन करून नियोजन करणे या दृष्टीने आढावा घेण्यासाठी रेल्वेचे चेअरमन सतीश कुमार हे शनिवारी नाशकात दाखल होणार आहे. त्या दृष्टीने रेल्वे प्रशासन सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला जोमाने कामाला लागले असल्याचे दिसून येत आहे.

# आज अक्षयतृतीया; बाजारपेठेत होणार उलाढाल

**नाशिक : प्रतिनिधी**


**आज साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला अक्षयतृतीया हा सण साजरा होणार आहे. वैशाख शुक्ल पक्षातील तृतीया तिथी मंगळवारी सायंकाळी ५ वाजून ३१ मिनिटांनी सुरू होऊन बुधवारी दुपारी २.१२ मिनिटांपर्यंत राहणार आहे.**



भगवान विष्णूंसह पितरांच्या पूजनासाठी या तिथीला हिंदू धर्मांमध्ये विशेष महत्त्व आहे. अक्षयतृतीयेच्या निमित्ताने बाजारपेठेला झळाली प्राप्त झाली आहे. बाजारपेठेत करा-केळी व आंब्यांना मागणी वाढली आहे. तर नागरिकांकडून सोन खरेदीचाही मुहूर्त साधण्यात येणार आहे. अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर आंब्यांची मागणी वाढली आहे. पण दर अधिक असल्याचे चित्र आहे. या दिवशी केले जाणारे कर्म अक्षय्य राहते, त्यामुळे सोने खरेदीसह विविध वस्तूंची खरेदी करण्याकडे नागरिकांचा कल असतो. सोने खरेदी, वास्तू प्रवेश, विवाह यांसह अधिक शुभकार्यासाठी अक्षयतृतीयेचा मुहूर्त साधण्यात येतो. त्यासह होम धार्मिक अनुष्ठाने आदींचे महत्त्व असल्याने विविध मंदिरांत फुलांची सजावट करण्यात आली असून, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे.

> अक्षयतृतीयेचा मुहूर्तावर नागरिकांचा खरेदी करण्याचा कल असतो. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रकारच्या ऑफर्स दिल्या आहेत. या ऑफर्स वस्तूनुसार आहेत.
>
> **– प्रसाद पाटील,**
> (प्रसाद इलेक्ट्रिकल्स)

### विविध ऑफर्सचा वर्षाव



अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर अनके जण खरेदी करत अक्षय मुहूर्त साधत असल्याने शहरातील सराफ बाजार, वाहन बाजार व इलेक्ट्रिक वस्तूंच्या खरेदीवर ऑफर्सचा वर्षाव करण्यात आला आहे. तर गृह खरेदीवरही अक्षयतृतीयाच्या निमित्ताने व्यावसायिकांकडून सूट देण्यात आली आहे.

### वाहन व घरांचे आधीच बुकिंग



अक्षयतृतीयेच्या दिवशी खरेदीचा मुहूर्त साधण्यासाठी अनेकांनी वाहन, घर व इलेक्ट्रॉनिक गॅझेट्सचे आधीच बुकिंग केले आहे. आज अक्षयतृतीयेचा मुहूर्त साधत वाहने घरी नेण्यात येणार आहेत व नवीन घरात गृहप्रवेश केला जाणार आहे.


# गोदावरी प्रदूषणाकडे दुर्लक्ष महापालिकेला भोवणार

## याचिका दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश

**नाशिक : प्रतिनिधी**

गोदावरी प्रदूषणमुक्तीबाबत केलेले दुर्लक्ष महापालिकेला भोवणार आहे. याप्रकरणी आता उच्च न्यायालयाने महापालिकेविरोधात याचिका दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. निरीच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणे, स्मार्ट सिटीकडून नदीपात्रात सुरू असलेले मेकॅनिकल गेट उभारणीचे काम पालिकेच्या अंगलट आले असून, प्रशासनाविरुद्ध अवमान याचिका दाखल करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. निशिकांत पगारे यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणीत उच्च न्यायालयाने हे आदेश दिले आहेत.

गोदावरी प्रदूषण उपसमिती उच्च न्यायालयाच्या आदेशाने गठित केली आहे. या समितीद्वारे गोदावरी प्रदूषणमुक्त कशी होईल आणि गोदावरीचे पुनरुज्जीवन करण्यास सांगितले होते. मात्र, याकडे सदर समितीला सपशेल अपयश आल्याचे चित्र आहे. दरम्यान, नदीचे काँक्रिटीकरण, मेकॅनिकल गेट, पाथवे, काँक्रीटचे पार्क, रासायनिक प्रदूषण, निळ्या पूररेषेत अवैध बांधकाम थांबविण्यासाठी जनजागृती, नदी व नाले वेगवेगळे



करण्यासाठी प्रत्यक्ष कृती करणारी यंत्रणा उभारणीत अपयश, निळ्या पूररेषेतील पात्र काँक्रीटमुक्त करणे, गोदा रक्षणासाठी एक पोलीस इन्स्पेक्टर, चार पोलीस सब इन्स्पेक्टर व तीस पोलीस कर्मचारी अशी स्वतंत्र पोलीस फोर्स देण्याच्या आदेशाचा अवमान होत असल्याचे दिसून आले आहे. गोदावरी गटारीकरण विरोधी मंचच्या वतीने गोदावरी नदी प्रदूषणमुक्तीसंदर्भात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. गोदावरी नदी पुनरुज्जीवनासाठी निरी या तज्ज्ञ संस्थेची नेमणूक करत अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. वेळोवेळी देण्यात आलेल्या आदेशांचे, निरीच्या सूचनांचे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी या समितीवर आहे.

परंतु, न्यायालयीन आदेशांचे पालन करण्याऐवजी वेळोवेळी अवमान प्रशासनाने केले गेले. त्यामुळे गोदेची दुरवस्था होत असल्याने विभागीय आयुक्त कार्यालय, मनपा, जिल्हा परिषद, प्रदूषण नियंत्रण महामंडळ व एमआयडीसीविरोधात याचिका दाखल होईल.

> न्यायालयाने १८ डिसेंबर २०१८ रोजी गोदावरी नदी प्रदूषणसंदर्भात सविस्तर असा आदेश दिला होता. परंतु, अद्यापही नाशिकमधील सर्व प्रशासनाकडून अद्यापही या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. या सर्व आदेशाची पडताळणी करून उच्च न्यायालयात लवकरच अवमान याचिका दाखल करणार आहोत. **–निशिकांत पगारे,** याचिकाकर्ता, गोदावरी गटारीकरणविरोधी मंच

# डॉ. धनेश्वरांच्या नियुक्तीमुळे पालिकेत चर्चांना उधाण

## सेवाज्येष्ठता डावलल्याचा आरोप

**नाशिक : प्रतिनिधी**



महापालिकेच्या आरोग्य विभागातील सहायक आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत शेटे यांची पंड्या रुग्णालय प्रकरणी मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी सोमवारी मुख्यालयातून हलवत बदली केली. डॉ. शेटे यांच्या जागी डॉ. जितेंद्र धनेश्वर यांच्याकडे प्रभारी म्हणून नियुक्ती देण्यात आली. दरम्यान, डॉ. धनेश्वर यांना प्रभारीची जबाबदारी देताना प्रशासनाने सेवाज्येष्ठता असलेल्या अधिकाऱ्यांना डावलल्याची चर्चा महापालिकेत सुरू झाली आहे.

गंगापूर रोडवरील पंड्या रुग्णालयात अवैद्य गर्भनिदान सुरू असल्याचे आरोप झाले होते. याप्रकरणी गंगापूर रोड पोलीस ठाण्यात सदर रुग्णालयावर गुन्हाही दाखल झाला. मात्र, आरोग्य विभागाने या रुग्णालयावर कारवाई करताना हलगर्जी केल्याचे आरोप वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण व डॉ. प्रशांत शेटे यांच्यावर झाले. चव्हाण यांची राज्य शासनाकडून बदली होणार आहे. तर डॉ. प्रशांत शेटे महापालिकेच्या सेवेतील असल्याने मनपा आयुक्तांनी सोमवारी त्यांची बदली करत हटवले. मात्र शेटे यांच्या जागी डॉ. धनेश्वर यांना नियुक्ती दिल्याने ही बाब आरोग्य विभागातील अनेकांना खटकली आहे. प्रमोटेट अधिकारी असतानाही त्यांना का डावलण्यात आले, असा सवाल केला जातो आहे. वर्षानुवर्षे प्रामाणिक काम करणाऱ्यांवर प्रशासन अशाच पद्धतीने अन्याय करत असल्याची भावना काही अधिकाऱ्यांनी बोलून दाखवली आहे. दरम्यान, डॉ. जितेंद्र धनेश्वर यांची झालेली नियुक्ती पाहता डॉ. नितीन रावते, डॉ. शिल्पा काळे, डॉ. विजयकुमार देवकर, रीना काळदाते, डॉ.आरती चिरमाडे, डॉ. रीना पाटील, डॉ. अविनाश फुलमाळी, डॉ. शैलेश खुने, डॉ. अनिता हिरे आदी अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता असूनही त्यांना डावलल्याची जोरदार चर्चा आहे.

# आवक वाढल्याने आंबा सामान्यांच्या आवाक्यात

## अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर घरोघरी आमरस, पुरणपोळीचा बेत

**नाशिक : प्रतिनिधी**

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षयतृतीयेला आमरसाला विशेष महत्त्व असते. त्यामुळे घरोघरी आमरस-पुरणपोळीचा बेतही आखला जात असल्याने आंब्याची मोठ्या प्रमाणात खरेदी होते. यंदा आंब्याची आवक चांगली असल्याने आंबा दर सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्यात आहेत. हापूससह केशर, राजापुरी, देवगड आंब्यांना अधिक मागणी आहे. यंदा अवकाळीचा फारसा फटका बसला नसल्याने आंब्याचे उत्पादन चांगले झाले आहे. परिणामी, यंदा अक्षयतृतीयेला दर आवाक्यात आल्याने सर्वसामान्यांना आंब्याचा गोडवा चाखता येणार आहे.**



### करा-केळी, खरबूजही दाखल

अक्षयतृतीयेला पितरांची पूजा केली जाते. पूजेसाठी आवश्यक साहित्यानेही बाजारपेठ सजली आहे. घागर अर्थात करा-केळी खरेदीला नागरिकांकडून गर्दी केली जात असून, शंभर रुपये प्रतिनग याप्रमाणे घागर विक्री होत आहे. याशिवाय खरबूजही मोठ्या प्रमाणात बाजारात दाखल झाले आहेत. पूजेसाठी टरबूज आणि खरबूज यांचा वापर केला जातो.

### हापूस ५०० ते ८०० रुपये डझन

आंब्याचा सीझन सुरू झाल्यानंतर सुरुवातीला १५०० ते २००० हजार रुपये डझनने हापूस आंब्याची विक्री होत होती. मात्र, आता आवक वाढल्याने दर घसरले असून, ५०० ते ८०० रुपये डझनने हापूस आंबा विकला जात आहे.

| आंबा | दर |
|---|---|
| रत्नागिरी हापूस | २२० रु. |
| देवगड हापूस | २४० रु. |
| जुनागड केशर | ११० रु. |
| रत्नागिरी केशर | २२० रु. |
| बंगलोर लालबाग | २०० रु. |
| विजयवाडा बदाम | १२० रु. |
| आम्रपाली गुजरात | १४० रु. |
| हैदराबाद मल्लिका | १५० रु. |

# सहकार व लेखा पदविका, सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन परीक्षेचे निकाल जाहीर

नाशिक : सहकार विभागामार्फत मे २०२४ मध्ये शासकीय सहकार व लेखा पदविका परीक्षा (J.D.C&A)) आणि सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रमाणपत्र परीक्षा (C.H.M) घेण्यात आल्या होत्या. त्या परीक्षांचा निकाल घोषित करण्यात आले असून, गुणपत्रक व प्रमाणपत्रांच्या छापील प्रती कार्यालयास प्राप्त झाल्या असून, परीक्षार्थींनी समक्ष ते प्राप्त करून घ्यावेत, असे आवाहन सहकारी संस्था जिल्हा उपनिबंधक फय्याज मुलाणी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

परीक्षार्थींना गुणपत्रक व प्रमाणपत्र जिल्हा उपनिबंधक कार्यालयात कार्यालयीन वेळेत हस्तदेय स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



अग्रलेख

# आईवडिलांनी घडवलेला वैभव

भारतात लोकप्रियतेच्या शिखरावर असलेली क्रिकेट स्पर्धा म्हणजे इंडियन प्रीमियर लीग अर्थात आयपीएल. ट्वेन्टी ट्वेन्टी क्रिकेट म्हणजे २० मर्यादित षटकांचे सामने. झटपट निकाल. कमी षटकांत जास्तीत जास्त धावा काढण्याच्या प्रयत्नात फलंदाज कधी बाद होईल, याचा काही भरवसा नसतो. पण, या सामन्यांत गोलंदाजांची धुलाई होत असते. यंदाच्या १८ व्या आयपीएलमध्ये सोमवारी रात्री राजस्थान रॉयल्सचा १४ वर्षे वयाचा चिमुरडा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने कमाल केली. प्रतिस्पर्धी गुजरात टायटन्सच्या दिग्गज गोलंदाजांची यथेच्छ धुलाई करताना अवघ्या ३५ चेंडूत त्याने शतक झळकावले. त्याने ११ षटकार आणि सहा चौकार ठोकले. त्याने केलेल्या १०१ धावांपैकी ९४ धावा षटकार-चौकारांच्या आतषबाजीतून वसूल केल्या. प्रत्यक्ष मैदानात उपस्थित राहणाऱ्या आणि दूरचित्रवाहिनीवरुन थेट प्रसारण पाहणार्या क्रिकेट रसिकांच्या डोळ्यांचे पारणे वैभवने फेडले. केवळ १४ वर्षे वय असलेल्या या खेळाडूने अफलातून फलंदाजी केली. तो जेव्हा बाद झाला तेव्हा मैदानातून बाहेर पडत असताना प्रतिस्पर्धी गुजरात टायटन्सच्या खेळाडूंनीही त्याचे अगदी मनापासून अभिनंदन केले. अशा अभिनंदनाचा मान एखाद्या खेळाडूला क्वचितच मिळतो. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुजरात टायटन्सने २० षटकांत २०९ धावा करुन जिंकण्यासाठी २१० धावा करण्याचे आव्हान राजस्थान रॉयल्सला दिले. तसे हे आव्हान काही सोपे नव्हते. सलामीला आलेल्या वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जयस्वाल यांनी पहिल्या षटकापासूनच आक्रमक पवित्रा घेतला. एका बाजूला वैभव फटकेबाजी करत असताना त्याला यशस्वी जयस्वालने संयमी खेळ करण्याचे पसंत करुन वैभवला साथ दिली. वैभवची फलंदाजी जवळून पाहण्याची संधी त्याला मिळाली. दुसरीकडे गुजरात टायटन्सच्या गोलंदाज इशांत शर्मा, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, वॉशिंग्टन सुंदर, राशिद खान, करीम जनत यांना कशी गोलंदाजी करावी, हे काही सुचेनासे झाले होते. कारण कसाही चेंडू टाकला तरी वैभव तो टोलावतच होता आणि क्षेत्ररक्षक धावतच होते. वैभव चेंडू कसा मारत आहे, याकडे ते असहाय्यतेने पाहत होते. कोट्यवधी क्रिकेट रसिकांना वैभवच्या एकाच खेळीने भुरळ पाडली. आयपीएलमध्ये सर्वांत वेगवान शतक झळकावण्याचा मान वैभवला मिळाला. इतकेच नाही तर ट्वेन्टी ट्वेन्टी क्रिकेटमध्ये वेगवान शतक करण्याचा विश्वविक्रमही त्याच्या नावावर नोंदला गेला. आयपीएलकडे साऱ्या क्रिकेट जगताचे लक्ष असल्याने वैभवच्या धमाकेदार खेळीची जगभर चर्चा होत आहे. पण, त्याच्या अनेक संघर्षमय कथाही बाहेर आल्या आहेत. त्यांची चर्चा जगभरात सोशल आणि मुख्य प्रवाहातील मीडियामध्ये होत असून, एका शेतकऱ्याचा मुलगा क्रिकेट जगतात हीरो झाला आहे. प्रसिध कृष्णाने १०१ धावांवर त्रिफळा उडवून वैभवची खेळी संपुष्टात आणली. तेव्हा मैदान सोडताना अभिनंदन होत असताना तो रडत होता. त्याच्या रडण्यामागे त्याच्या शेतकरी बापाचा एक त्याग होता. आयपीएल सुरू झाल्यानंतर तीन वर्षांनी वैभवचा जन्म बिहारमधील समस्तीपूरमध्ये झाला. वडील संजीव सूर्यवंशी यांनीच त्याला क्रिकेटच्या मैदानावर आणले. संजीव यांचेही क्रिकेटर होण्याचे स्वप्न हलाखीच्या परिस्थितीमुळे पूर्ण होऊ शकले नव्हते. पण, मुलगा क्रिकेटटर व्हावा म्हणून त्यांनी त्याच्या मार्गात कोणताही अडथळा येऊ दिला नाही. वयाच्या पाचव्या वर्षापासूनच वैभवने क्रिकेट शिकण्यास सुरुवात केली. त्याची क्रिकेटमधील प्रगती झपाट्याने होत होती. त्यानंतर तो १० वर्षांचा असताना त्याला पाटणामध्ये आठवड्यातून तीन दिवस क्रिकेट अकादमीमध्ये प्रशिक्षण देण्यासाठी नेण्यास संजीव यांनी सुरुवात केली. याच आठवणीने वैभव रडत होता. वैभवला क्रिकेटपटू म्हणून घडवण्याचे त्याच्या वडिलांचे स्वप्न होते. घरातील परिस्थिती बेताची असल्याने त्याच्या वडिलांनी स्वत:ची जमीन विकली. एवढंच नाहीतर ते बेरोजगार झाले. त्यानंतरही त्यांनी वैभवच्या सरावात खंड पडू दिला नाही. पाटण्यात १० व्या वर्षी नेट प्रॅक्टीस करताना इतर मुले साधारण रोज १०० बॉल खेळत. वैभव रोज ६०० बॉल खेळायचा. १६-१७ नेट बॉलर्स त्याला बॉलिंग करत. या सर्वांसाठी रोज १० डबे त्यांच्यासाठी वैभवचे वडील घेऊन येत असत. त्यासाठी वैभवची आई रोज पहाटे उठून स्वयंपाक करायची. ही गोष्ट वैभवनेच सांगितली. आई-वडिलांच्या या कष्टाचे चीज झाले. वयाच्या १३ व्या वर्षीच तो १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धेत भारताकडून खेळला. दीड वर्षांपूर्वी चंदीगड येथे १९ वर्षांखालील विनू मंकड चषक क्रिकेट स्पर्धा खेळवण्यात आली. त्यावेळी कर्नाटकचे माजी क्रिकेटपटू व्ही. एस. तिलक नायडू यांचे वैभवकडे लक्ष गेले तेव्हा तो ११-१२ वर्षांचा होता. तो त्याच्यापेक्षा मोठ्या मुलांविरुद्ध चांगला खेळायचा. त्याच्यापेक्षा परिपक्व व शारीरिकदृष्ट्या दणकट खेळाडूंबरोबर तो खेळत होता. नायडू यांच्या पॅनेलने राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे वैभवकडे लक्ष वळवले. अकादमीचे प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण यांनी वैभवला आणखी पुढे नेले. सन २०२४ च्या सुरुवातीला दक्षिण आफ्रिकेत १९ वर्षांखालील क्रिकेट विश्वचषक स्पर्धा खेळवण्यात आली होती. या स्पर्धेसाठी वैभवची निवड झाली नाही. मात्र लक्ष्मण त्याला पाठिंबा देत राहिले. अकादमीने वैभवच्या क्षेत्ररक्षणाकडे लक्ष दिलं. या काळात त्याला ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांमध्ये संधी मिळाली नाही. परंतु, त्यानंतर उभय संघांमध्ये दोन कसोटी सामने खेळवण्यात आले, ज्यामध्ये वैभवला भारतीय संघात स्थान मिळाले. त्याने मिळालेल्या संधीचे सोने केले. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या कसोटी सामन्यात वैभवने ६२ चेंडूत १०४ धावांची खेळी केली. वेगवान गोलंदाजी व बाऊन्सर्सचा (उसळी) त्याच्या खेळावर काहीच परिणाम झाला नाही. तोवर त्याने बिहारच्या वरिष्ठ संघाकडून क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत पदार्पण केले होते. आयपीएलसाठी राजस्थान रॉयल्सने त्याला १.१ कोटी रुपयांत घेतले. त्याने आपली निवड सार्थ ठरविली. कमी वयात इतकी चांगली कामगिरी करणारे फार थोडे खेळाडू भारताला लाभले आहेत. त्यात वैभव आला आहे. भविष्यात भारतीय क्रिकेट संघात त्याची निवड होणे अपेक्षित आहे. पण, त्याला आपल्या खेळात सातत्य ठेवावे लागणार आहे. भारतातील अनेक आजीमाजी क्रिकेटपटू वैभवच्या खेळीने अवाक् झाले आहेत. वैभवला भविष्यात मोठ्या संधी आहेत.

# निर्मितीतच पाकिस्तानच्या फुटीची बीजे

अपघाताने इंग्रजांच्या फोडा-झोडाच्या रणनीतीने व तत्कालीन 'थकलेल्या, उतरणीला लागलेल्या काँग्रेसच्या नेतृत्वामुळे व सक्षम, कार्यप्रवीण नसलेल्या विरोधी पक्षांमुळे' पाकिस्तानसारखा विचित्र देश १४ ऑगस्ट १९४७ ला अकाली जन्माला आला. भारतीय जनमानसात चौदस व अमावास्या या तिथी अपवित्र मानल्या जातात. त्याच मुहूर्तावर देशाची फाळणी होऊन पाकिस्तानची निर्मिती झाली. महाभारतातील दुर्योधन जन्माला आला तेव्हा म्हणतात, रक्ताचा सडा पडला होता. अगदी तसेच झाले. १४ / १५ ऑगस्ट १९४७ ला व त्या महिन्यांमध्ये. पवित्र पावन सिंधू व तिच्या उपनद्यांत म्हणजे रावी, चिनाब, सतलज, झेलम, व्यास नद्यांमधून रक्ताचे पाट वाहू लागले. याला कारणीभूत तत्कालीन नेहरूंचे सरकारच होते. कारण यांच्यासोबतच इंग्रजांच्या देश स्वतंत्र होण्यासंबंधीच्या वाटाघाटी होत होत्या. ईस्ट इंडिया कंपनी व नंतर इंग्रज सरकारद्वारा आवश्यक तेवढी आणि महत्वाची सर्व प्रकारची लूट पूर्ण होत आली होती. संपूर्ण भारतभर सर्वस्तरातील भारतीय जनता जागृत झाल्याने व इंग्रजांप्रति विद्रोह वाढत असल्याने इंग्रजांना शासन करणे खूप कठीण जात होते. गोऱ्या अधिकाऱ्यांचे शिरकाण सुरू होते. अशा स्थितीत इंग्लंडच्या तत्कालीन सरकारने १५ ऑगस्ट १९४७ हा दिनांक निश्चित केला होता.

संपूर्ण देशातून मुस्लिमबहुल भाग असलेले प्रांत निवडण्यात आले. पूर्वेकडील बंगाल प्रांत, तर पश्चिमेकडील सिंध प्रांत. संपूर्ण देशात ५६५ च्या वर संस्थानांचे राज्य होते. त्यामध्ये हिंदू राजांसोबतच अनेक ठिकाणी मुस्लिम शासक नवाबसुद्धा होते.

**अस्पष्ट सूचना व जनता संभ्रमात**

फाळणीचा दिवस नक्की ठरल्यानंतरसुद्धा मुस्लिमबहुल भाग निवडणे व त्यानुसार सीमारेषा रेखांकित करणे हे अतिशय कठीण काम होते. ज्याला काहीही यासंबंधी माहिती नाही आणि भूगोलाचे ज्ञान नाही अशा इंग्रज अधिकारी 'रेड क्लिफ' यावर सीमा निश्चितीचे काम देण्यात आले. धुंदीतच त्यांनी सीमा निश्चित केल्याचे स्पष्ट दिसून येते. भारत व पश्चिम पाकिस्तानमधील सरळ काढलेली रेषा हे त्याचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. त्यामुळे लाहोर त्या रेषेच्या पश्चिम बाजूला गेले. जे की भारतामध्ये हवे होते. अशी असंख्य उदाहरणे आहेत.

धर्माच्या आधारावरच देशाची फाळणी झाल्यामुळे मुस्लिमबहुल भागातील हिंदूंचे स्थनांतरण होणे निश्चितच होते. त्याची कोणतीही रूपरेषा नियोजन संबंधित काँग्रेस समितीकडून करण्यात आली नाही. त्यामुळे पश्चिमेकडील सिंध व पूर्वेकडील बंगाल प्रांतातील संपूर्ण हिंदू, ज्यामध्ये दीनदलितांसह सर्व जातींचे हिंदू होते. त्यांना शेकडो मैल दिवसरात्र, मुस्लिम टोळ्यांपासून जीव वाचवून भारतात दिल्लीजवळ निर्वासित व्हावे लागले. जे भारतात पोहोचले ते नशीबवान ठरले. पण असे हजारो तरुण, स्त्रिया, कुमारिका, मुले यांच्यावर अनन्वित अत्याचार, छळ, बलात्कार झाला. त्यांना मारून टाकण्यात आले. स्थावर संपत्ती, धन-दौलत सोडून हिंदू मिळेल त्या रस्त्याने जीव मुठीत घेऊन पळू लागले. कामांध व धर्मांध झालेल्या नरपशूंमुळे तरुण मुली, कुमारिका, मुले, माणसे यांना तीक्ष्ण धारदार अशा शस्त्रांनी मारण्यात आले. त्यांच्यामुळे रक्त सिंधू व तिच्या उपनद्यांमधून वाहू लागले.




फाळणीच्या काळात प्रत्यक्ष सिंध प्रांतात जाऊन हे हृदयद्रावक वास्तव, पुस्तकातून मांडलेले आहे. धार्मिक तत्त्वावर स्थानांतरण



**भारता भोवतालचे अस्वस्थ वर्तमान**

हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

झाल्याने सिंध प्रांतातून येणाऱ्या हिंदूंवर (जेव्हा हिंदू हा शब्द वापरतो तेव्हा हिंदूतील सर्व जाती, बौद्ध जैन या सर्वांचा समावेश होतो) अत्याचार झाले. श्रीमंत व उच्चवर्णीय यांच्याकडे पैसे असल्याने त्यांचे हाल तुलनेने कमी झाले. पण जी उपेक्षित गावकुसाबाहेरची मंडळी त्यांना जेव्हा घरदार सोडावे लागते तेव्हा त्यांचे अतिशय हाल होतात आणि झालेही तसेच.

डॉ. भीमराव आंबेडकर यांनी १५ ऑगस्टपूर्वीच अत्यंत महत्त्वाची सूचना संबंधित काँग्रेस समितीला दिली केली होती. ती जर अमलात आणली गेली असती तर लाखो निर्वासित झालेल्या जीवांचा संहार झाला नसता. डॉ. आंबेडकरांनी सूचित केले होते की, 'फाळणी धार्मिक तत्त्वावर असल्याने एकदाच काय ते समूळ स्थानांतरण करावे. उर्वरित भारतातील झाडून सर्व मुस्लिमांना पाकिस्तानात पाठवावे. औषधालासुद्धा ठेवू नये व त्यासोबतच त्या भागातून म्हणजे प्रस्तावित पाकिस्तानातून- सिंध प्रांत व बंगालमधून येणारे हिंदू विशेषतः दलित, स्त्रिया, मुले, म्हातारी माणसे यांना आणण्याचे उच्चस्तरीय नियोजन करावे. त्यानंतरच फाळणी निश्चित करावी. पण दुर्दैवाने सूचना स्वीकारली गेली नाही. लाखो लोकांचा नरसंहार झाल्यानंतर फाळणी समितीचे डोळे उघडले. एवढा भयानक नरसंहार होईल, असे त्यांच्या मनीध्यानीही नव्हते. नंतर हळहळ करून काय उपयोग?

**छानछौकी, अय्याशी जगणारे बॅ. जिना**

हायकोर्टात वकिली करणारे सूटबूट व चिरुटमध्ये उच्चपदस्थात वावर असणारे व आपल्या वयापेक्षा निम्मे वयाची पत्नी असणारे बॅरिस्टर जिना यांची जीवन पद्धती इंग्रजांसारखीच होती. कोणे एके काळी लोकमान्य टिळकांचे वकीलपत्र घेणारे, काँग्रेसच्या नेत्यांत वावरणारे, कालांतराने मुस्लिम लीगसारखा पक्ष स्थापून, धार्मिक राजकारणावर स्वार होऊन पाकिस्तानच्या निर्मितीचे मसीहा होणारे बॅरिस्टर जिनाच! यांना पाकिस्तानचे निर्माते होण्याचे भाग्य लाभले.

स्वातंत्र्यानंतर काहीच महिन्यांत बॅरिस्टर जिना यांना त्यांच्या पाकिस्तानात उपेक्षित जीवन जगावे लागले व मृत्यूस सामोरे जावे लागले. तसेच पण थोड्या फरकाने का होईना महात्मा गांधीजी यांचेही असेच झाले. नेहरू-पटेल सरकारला गांधीजींच्या विचारांची, सूचनांची अडचणच होत होती. गांधीजींचे अनेक निर्णय सरकारला त्रासदायक ठरत होते. महात्मा गांधी व सरकार यांच्या अंतर्गत वैचारिक विरोधात ३० जानेवारी १९४८ ला दिल्लीला प्रार्थना स्थळावर नथुराम गोडसे या महाराष्ट्राच्या युवकाने गोळ्या झाडून हत्या केली. १४ ऑगस्ट १९४७ ला पश्चिमेकडील मुस्लिमबहुल प्रांत म्हणून पश्चिम पाकिस्तान व पूर्वेकडील मुस्लिमबहुल प्रांत म्हणून पूर्व पाकिस्तान अशी निर्मिती झाली. दोन टोकावर दोन भाग असल्याने काही किलोमीटर रुंद असलेला दोन पाकिस्तानला जोडला जाणारा रस्ता सुद्धा पाकिस्तानला होता. दुर्दैवाने तो झाला नाही. आपले सुदैव!

दोन टोकावरचे दोन पाकिस्तान यांची संस्कृती वेगळी, भाषा वेगळी, सण, परंपरा वेगळी. त्यामुळे त्यामध्ये एकसंघता येणे अशक्य होते. पूर्व पाकिस्तानवर झालेल्या अन्यायामुळे कालांतराने १९७१ मध्ये भारताच्या सहकार्याने पाकिस्तानचे तुकडे झाले व पूर्वेकडील पाकिस्तान स्वतंत्र होऊन त्याचा बांगलादेश नावाचा नवीन देश तयार झाला. त्याकरिता लढा देणारे शेख मुजीबुर रहमान देशाचे प्रमुख झाले. राहिलेल्या पश्चिम पाकिस्तानला पाकिस्तान म्हणून संबोधण्यात येते. यामध्येही आतापावेतो पंजाबी मुस्लिमांचेच वर्चस्व राजकीयदृष्ट्या राहिलेले आहे.

यामध्ये अफगाणिस्तानकडील खैबर पस्तुनवा हा प्रांत, सिंध प्रांत, बलुचिस्तान यावर आजपर्यंत अन्याय होतो आहे. पाकिस्तानच्या निर्मितीतच पाकिस्तानच्या फुटीची बीजे रोवली गेली आहेत. या अभद्र निर्माण झालेल्या देशाची शोकांतिका व अंत एव्हाना व्हायला हवा होता. मात्र, वर्तमानात, क्षितिजावर या शोकांतिकेची किरणे आता स्पष्टपणे दिसायला लागली आहेत.

# गावाच्या विकासाचा मार्ग सांगणारी ग्रामगीता

महान साहित्यिक, विचारवंत, समाजसुधारक स्वातंत्र्यसैनिक, महानतम देशभक्त, विश्व हिंदू परिषदेचे संस्थापक उपाध्यक्ष, संतश्रेष्ठ, राष्ट्रसंत माणिक बंडोजी इंगळे ऊर्फ तुकडोजी महाराज त्यांचे उच्च विचार व ग्रामगीतासारख्या अजरामर साहित्यसंपदेस आणि त्यांच्या महान जीवन संदेशांना कोटी कोटी प्रणाम.

आजची आपल्या देशाची झालेली प्रगती ही आपल्या भारतीय समाजाला पारतंत्र्याच्या वेळी लाभलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (१९०९-१९६८) यांच्यासारख्या महान राष्ट्रसंत आणि देशभक्त, साहित्यिक, विचारवंत, विभूतींच्यामुळे झाली. अमरावती जिल्ह्यातील यावली गावात ३० एप्रिल १९०९ रोजी गरीब ठाकूर परिवारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म झाला. जन्मजात घरावरचे छप्पर सोसाट्याच्या वाऱ्याने उडून गेले आणि वरचे आकाश हेच घराचे छप्पर बनून राहिले. त्यांच्या आईचे नाव मंजुळामाय व वडिलांचे नाव बंडोजीबुवा होते. माधानच्या अंध संत गुलाबराव महाराजांनी त्यांचे बालपणीचे नाव माणिक असे ठेवले. मराठी शाळेचे दोन चार वर्ग शिकलेले राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गुरू आडकोजी बाबांच्या कृपाप्रसादाने तुकड्यादास नावाने भजन लिहायचे. त्यांचे भजन जनसामान्यांच्या मनाचा ठाव घ्यायचे. त्यांनी मांडलेलं तत्त्वज्ञान फक्त देवभक्ती नव्हती तर समाजातील दुःख, वेदना विषमता त्यांच्या भजनातून प्रतीत व्हायची. एक सुजलाम्–सुफलाम् देशाचे स्वप्न त्यांनी बघितले होते. त्यांनी राष्ट्र-धर्म आणि भक्ती याची एकत्रित सांगड घातली. अंधश्रद्धेला फाटा देत श्रद्धेचा वापर आपल्या लोकजीवनाला सर्वधर्म समभावाची दिशा देण्यासाठी केला.

तुकडोजी महाराजांनी खंजिरी वाजवून केलेल्या कीर्तनांतून जनप्रबोधन केले. याचा फार मोठा धसका ब्रिटिश सरकारने घेतला होता. ''पत्थर सारे बॉम्ब बनेंगे, भक्तों की बनेगी सेना''अशी ललकारी देत त्यांनी स्वतः १९४२ सालच्या स्वातंत्र्य आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. कारावासदेखील भोगला. प्रत्येक खेड्याने संपूर्ण स्वावलंबी, सुसंस्कृत, सुसपंन्न आणि आत्मनिर्भर व्हावे यासाठी सक्रिय होत त्यांनी गावोगावी मंडळे उभारली. प्रखर राष्ट्रभक्तीने ओतप्रोत भरलेल्या



कीर्तनातून राष्ट्रप्रेम जागृती आणि देशोन्नतीचा प्रसार व प्रचार व्हायचा. तुकडोजी महाराजांनी १९६२ च्या भारत-चीन युद्धाच्या काळात त्यांनी सैनिकांचे मनोबल वाढवण्यासाठी

प्रा. अमोल अहिरे
९९२१९७६४२२

नेफा, तिबेट, सियालकुटी, सिलिगुडी आणि गुवाहाटी या प्रत्यक्ष युद्धभूमीवर जाऊन राष्ट्रभक्तीपर भजने आणि राष्ट्रचेतना जागवणारी भाषणे केली.

झाड झडुले शस्त्र बनेंगे,
भक्त बनेगी सेना
पत्थर सारे बॉम्ब बनेंगे
नाव लगेगी किनारे

त्यांनी चीनच्या युद्धपिपासू वृत्तीचा तीव्र शब्दात निषेध केला. त्यांनी आपल्या कार्याद्वारे केवळ सैनिकांचे मनोबल वाढवले नाही, तर देशात राष्ट्रीय एकतेची भावना जागृत केली. ते एवढ्यावरच थांबले नाहीत, त्यांनी श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या माध्यमातून भारत सेना सेवा निधी स्थापन केला आणि संरक्षण दलांसाठी मोठी आर्थिक मदत गोळा केली.

१९४२ च्या स्वातंत्र्य जनआंदोलनाचे विदर्भातील प्रेरणास्थान राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होते. चिमूर, आष्टी, यावली, बेनोडा येथील स्वातंत्र्यसंग्राम यांच्याच प्रेरणेने घडला. त्यांनी जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या लोकोपयोगी कामांकडे पाहून महात्मा गांधी आकर्षित झाले होते. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मोठ्या आदरातिथ्याने दिल्लीला बोलावून राष्ट्रपती भवनात त्यांच्या खंजिरी भजनाचा कार्यक्रम झाला. त्या भजनाने प्रभावित होऊन राजेंद्रबाबू म्हणाले, आप संत नही, राष्ट्रसंत है. मग साऱ्या जगाने त्यांना राष्ट्रसंत म्हणून संबोधले.

महाराजांची खंजिरी भजन ही पद्धती एक स्वतंत्र निर्मिती होती. त्यातून उठणारे झंकार थेट हृदयालाच जाऊन भिडत. ही पद्धत एवढी प्रभावी होती की, त्यांची खड्या आवाजातील भजने क्षणात जनमनाचा पगडा घेत. त्यांची भजन सर्वसामान्यांपर्यंत विचार पोहोचवण्यात यशस्वी झाली. १९५५ ला जपानमध्ये भरलेल्या विश्वशांती व विश्वधर्म परिषदेसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान राष्ट्रसंतांना मिळाला. तिथे परिषदेच्या आयोजकांनी त्यांना जपानमध्ये राहून काम करण्यासाठी मोठी प्रलोभनं दाखवली. पण आपल्याला भारतातच काम करायचंय सागून ते परतले. ग्रीन कार्ड आणि एचवन व्हिसा हेच सर्वस्व मानणाऱ्यांसाठी हा मोठाच धडा आहे.

ग्रामगीता ही राष्ट्रसंतांच्या तत्त्वज्ञानाचे सार. अनेक संतांनी आजवर अनेक ग्रंथ लिहिले. पण अशी गावाच्या विकासाचा मार्ग सांगणारी ही गीता केवळ अद्वितीय आहे. आजही त्यातलं वास्तववादी तत्त्वज्ञान भुरळ पाडणारं आहे. ग्रामगीता नाही पारायणासी, असं राष्ट्रसंत कठोरपणे सांगतात. देशातले तरुण हे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ. ते बलोपासक असावेत म्हणजे ते समाजाचे व राष्ट्राचे संरक्षण करू शकतील. ते नीतिमान व सुसंस्कृत कसे होतील, याविषयीचं उपदेशपर व मार्गदर्शनपर लेखन त्यांनी केले. व्यसनाधीनतेचा तीव्र निषेध राष्ट्रसंतांनी आपल्या लेखनातून केला. ऐहिक व पारलौकिक यांचा सुंदर समन्वय राष्ट्रसंतांच्या साहित्यात झाला आहे. त्यांनी मराठीप्रमाणंच हिंदी भाषेतही विपुल लेखन केले. आजही त्यांचे हे साहित्य आपल्याला मार्गदर्शन करीत आहे. यावरून त्यांच्या साहित्यात अक्षर वाङ्मयाची मूल्यं कशी दडली आहेत, याची सहज कल्पना येईल. ग्रामगीता या काव्यात तुकडोजी महाराज म्हणतात,

संत देहाने भिन्न असती।
परि ध्येय धोरणाने अभिन्न स्थिती।
साधने जरी नाना दिसती।
तरी सिद्धान्तमति सारखी।।

११ ऑक्टोबर १९६८ रोजी संध्याकाळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे देहावसान झाले. १२ ऑक्टोबर सकाळी ध्यानाचा कार्यक्रम झाला. एका सुशोभित ट्रकवर राष्ट्रसंतांचा चिरनिद्रा घेत असलेला देह ठेवला गेला आणि भजनाच्या निनादात दास टेकडीचं दर्शन घेण्यासाठी दिंडी निघाली. आयुष्यभर राष्ट्रसंतानी दिलेला मानवतेचा संदेश या अंत्ययात्रेत दिसत होता. सर्व धर्म, पंथ, संप्रदायाचे लोक यात सहभागी होते. गुरुदेव सत्संग मंडळ देशभर त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचे काम करते.

# खानदेशी संस्कृती - आखाजीचा सण

अक्षयतृतीया सणाला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. अक्षयतृतीया खानदेशात गवराईचा उत्सव व पितरांना आगारी टाकायचा दिवस. म्हणजे पितरांना घास टाकायचा. अक्षय याचा अर्थ सतत कायम तसेच ज्याचा कधीच क्षय होणार नाही असा स्वर्गातल्या वाडवडिलांचा म्हणजे पितरांचा अक्षय आशीर्वाद. ही संकल्पना अहिराणी संस्कृतीची. हा सण अहिराणी संस्कृतीचा प्रमुख सण. साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त म्हणून धार्मिक परंपरेने या सणाला मान्यता दिली जाते.

बारा महिन्यांत येणाऱ्या गुढीपाडवा, नवरात्रोत्सव, दिवाळी आणि अक्षयतृतीया या सणांना महत्त्व आहे. अक्षयतृतीया या सणाचे महत्त्व आजही ग्रामीण भागात टिकून आहे. आखाजीनिमित्त ग्रामीण भागातील शेतात, खळ्यात भल्या मोठ्या झाडांना दोरखंड बांधून त्यावर महिला झोका घेत अथानी कैरी तथानी कैरी, कैरी झोका खाय वं! असे गाणे म्हणतात. वर्षातून एकदा माहेरी येणाऱ्या कन्या घरी आल्याने ग्रामीण भागात चैतन्याचे वातावरण निर्माण होते.

अक्षयतृतीया या सणानिमित्ताने महिलांना माहेरी जाण्याची ओढ लागते. उन्हाळ्याची सुट्टी असल्याने मुलांना मामाच्या गावी सुट्टीचा आनंद घ्यावयाचा असतो. या सणाला खानदेशात विशेष महत्त्व आहे. नवविवाहिता महिला ही माहेरी जाते. यामुळे या कुटुंबकबिल्यात मोठा उत्साह संचाललेला असतो. सासरहून माहेरी आलेल्या कन्येसाठी माहेरच्यांकडून सांजोरी, पुरणपोळी, आमरस या सुग्रास भोजनाचा बेत असतो. माहेरी आलेल्या विवाहिता गावात एकत्र येऊन एखाद्या वृक्षाला झोका बांधून त्याचा आनंद घेतात. अक्षयतृतीया हा सण ग्रामीण भागातील पर्व असते. मोठमोठे शेतजमीन मालक शेतात, गुरेढोरे चारण्यासाठी सालदार लावतात. शेतात बारा महिने कामासाठी सालदारांचा मेहनताना या दिवशी ठरवला जातो. आता यंत्राद्वारे शेतीची कामे होत असल्याने सालदारकीची परंपरा नष्ट होत आहे. गवराई ही बीज देवता आहे. फलोत्पादित करण्याची शक्ती तिच्यात आहे. म्हणून तिच्या अवतीभवती धान्य पेरतात. इतकेच काय फुलांच्या माळा न घालता बिजांच्या माळा घालतात. अक्षयतृतीयेला शिवकथेची परंपरा आहे. हिमराजा पार्वतीला म्हणजे आपल्या लेकीला या दिवशी माहेरी आणतो. जाताना नागोजी

**जनमनाचे प्रतिध्वनी**

सुताराकडून दोन घोड्यांचा लाकडी रथ घडवून घेतो. गवराई हे कृषी संस्कृतीचे दैवत आहे. प्रतीक आहे.

अक्षयतृतीयेच्या दिवशी रात्री मुली गावात एका ठिकाणी सर्व गवराया जमवतात. रात्री जागून गाणी म्हणतात. यालाच गौर जागवणे म्हणतात. दुसऱ्या दिवशी बाशी आखाजीला बार खेळतात, म्हणजे दोन शेजारी गावांमध्ये नदी, नाला, रस्ता किंवा रेल्वे रूळ यांच्या अल्याड- पल्याड त्या त्या गावच्या मुली व स्त्रिया उभ्या राहून भांडतात. एकमेकांना दगडही मारतात. हे प्रत्यक्ष मी मालेगाव शहरातून वाहणाऱ्या मोसम नदीच्या अल्याड-पल्याड गावाचे मजेशीर बार खेळणे पाहिले आहे. (आता ही पद्धत इतिहासजमा झाली आहे)

सासूरवाशिणींचा सोनाना दिन आहे. माहेरी यावेच लागते हा रिवाज म्हणजे माहेरचा साज. ग्रामीण भागात यानिमित्ताने घरोघरी चैत्र पौर्णिमेनंतर गौराईची प्रतिस्थापना होते. धावपळीच्या युगातही या सणाचे महत्त्व अर्ध प्रमाणात टिकून आहे. पूर्वी या सणासाठी अंगणात लाकडाच्या आधारावर किंवा झाडांना झोके बांधून घरात बसविलेल्या गौराईचे गुणगान झोक्याद्वारे गाण्यातून महिलांसह मुली म्हणून आनंद व्यक्त करतात. आता गौराईचे गाणे मात्र मुकी आहेत. संस्कृती जनजीवन, कुटुंब व्यवस्था, सासर-माहेर नातेसंबंध यांचे असंख्य पदर उलगडून गाणे म्हटले जात.

**प्रभाकर वारुळे, ७५८८१७६२७१**

# जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण ।।

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण । हें जीवपणाचें मुख्य लक्षण ।। सुख-दुःख, विपत्ति-आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती ।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून । माया न हटे न सुटे जाण ।। आता करी शूर मन । मायेसी हटवावे आपण ।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें ।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान ।। ज्याच्यांत मानावें मी सुख । त्याच्यातच उद्भवतें दुःख ।। नराचा होय नारायण । जर न चुकला मार्ग जाण ।। जेथे ठेवावी आस । त्याचे बनावें लागतें दास ।। देह तो पंचभूतांचा । त्याचा भरवसा न मानावा फारसा ।। मी तुम्हांस सांगतों हित । दृश्यांत न ठेवावें चित्त ।। दृश्य वस्तु नाशिवंत असते । भगवत्कृपेने समाधान येतें ।। परिस्थिति नसे बंधनास कारण । असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण ।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग । तोंवर रामसेवा नाही घडत सांग ।। आपलें आत्यंतिक हित । हेंच खरा स्वार्थ जाण ।। चित्तीं जे विषयापासून सुटले । ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।।



विचारधन

गांवकरी®
('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टॅंडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### बाबाज् थिएटरचा रौप्यमहोत्सवी कार्यक्रम १ मे रोजी 'गर्जतो मराठी'चे आयोजन

**सिडको :** बाबाज् थिएटर या संस्थेच्या वतीने दर महिन्याच्या १ तारखेला ज्येष्ठ नागरिक आणि संगीतप्रेमींसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या संगीत मैफलींचा यंदाचा ५४ वा पुष्पगुच्छ १ मे रोजी सायंकाळी कुर्तकोटी सभागृह, शंकराचार्य न्यास येथे गुंफला जाणार आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाराष्ट्र दिनानिमित्त 'गर्जतो मराठी' हा विशेष संगीत कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना प्रशांत जुन्नरे यांची असून, सरगम म्युझिक ॲकॅडमी संचलित नंदकुमार देशपांडे प्रस्तुत गर्जतो मराठी या कार्यक्रमात मराठीतील अजरामर गीतांचा बहारदार नजराणा प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध निवेदक संजय किल्लेदार करणार आहेत. गायक नंदकुमार देशपांडे, संतोष कराळे, अमित गुरव, अजय पाटील, मयुरी मुर्डेश्वर, सानिका जैन व दर्शना बडोगे यांच्या सादरीकरणातून मराठी संगीताची समृद्ध परंपरा रंगणार आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नाशिकच्या सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री निलेश व पूजा गायधनी (कला क्षेत्र), पूनम पाटील (अभिनेत्री) आणि प्रतीक पंडित (सितार वादक) या मान्यवरांना कृतज्ञता सन्मान पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस आदरणीय नितीनजी ठाकरे व महाराष्ट्र भंडारचे संचालक मंगेश पिसोळकर यांची उपस्थिती लाभणार आहे. त्यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत तरी या कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे,असे आवाहन बाबाज थिएटरचे संचालक प्रशांत जुन्नरे यांनी केले आहे.

### 'शातिर The Beginning'चा टीजर प्रदर्शित




**मुंबई :** शातिर The Beginning या मराठी चित्रपटाचा टीजर नुकताच सोशल मिडियावर प्रदर्शित करण्यात आला आहे. संवेदनशील विषयावर बेतलेला, सस्पेन्स थ्रीलर 'शांतिर The Beginning' आजच्या तरुणाईची कथा सांगणारा असल्याचे टीजर मधून दिसते. हा चित्रपट येत्या २३ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. शातिर The Beginning या चित्रपटाची निर्मिती श्रीयांश आर्ट्स अँड मोशन पिक्चर्स या बॅनरखाली रेश्मा वायकर यांनी केली असून, या चित्रपटाद्वारे सुनील सुशीला दशरथ वायकर यांनी दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केले आहे. शातिर The Beginning च्या टीजरवरून दिसते की हा आजच्या तरुणाईची कथा सांगणारा चित्रपट असून, कॉलेज तरुणाईमध्ये वाढत असलेल्या अंमली पदार्थाच्या व्यसनांवर भाष्य करणारा असल्याचे दिसतो. पोलिसांवर हल्ला करून पसार झालेला ड्रग्ज माफिया कोण ? पोलिस या ड्रग्ज माफिया चा शोध घेण्यात यशस्वी ठरणार का? आणि नायिकेची या सर्व प्रकरणात भूमिका नेमकी काय? हे जाणून घेण्याची उत्कंठा शातिर ढहश इशसळपपळपस चा टीजर वाढवतो. या चित्रपटात रेश्मा वायकर या प्रमुख भूमिकेत असून त्यांच्यासह योगेश सोमण, रमेश परदेशी,मीर सरवर, अनिल नगरकर, अभिमन्यू वायकर, वेद भालशंकर, ॲड. रामेश्वर गिते, गौरव रोकडे, निशांत सिंग, मनोज चौधरी यांच्या महत्वपूर्ण भूमिका शातिर ढहश इशसळपपळपस मध्ये आहेत. येत्या २३ मे २०२५ रोजी शातिर The Beginning हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

### मराठी चित्रपट 'अमायरा'चे पोस्टर प्रदर्शित

**मुंबई :** जेव्हा एखादा चित्रपट चांगला आशय देतो तेव्हा तो




प्रेक्षकांना आकर्षित करतो. मराठी सिनेमे सध्या संपूर्ण देशभरात आणि जगभरात प्रचंड यश मिळवत आहे. असाच एका हृदयस्पर्शी नवीन विषयासह सुभाष घाई यांच्या मुक्ता आर्ट्स निर्मित आणि लोकेश गुप्ते दिग्दर्शित, एव्हीके एंटरटेनमेंट आणि महलसा एंटरटेन्मेंटच्या अंतर्गत नवा मराठी चित्रपट अमायरा आपल्या भेटीला येणार आहे. या सिनेमाचा पोस्टर नुकताच प्रदर्शित करण्यात आला. पोस्टरवर आपण आपल्या लाडक्या मराठी कलाकारांना पाहू शकतो. अजिंक्य देव, राजेश्वरी सचदेव, पूजा सावंत हे मराठी सिनेश्रुष्टीतील उत्तम कलाकार असून त्यांचं काम प्रेक्षकांनी अनुभवलंय आणि त्यांना भरपूर प्रेम सुद्धा दिलंय. पण विशेष आकर्षण ठरते ती म्हणजे लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुएंसर सई सचिन गोडबोले. पोस्टरवरून अंदाजा येतो कि ह्या सिनेमाचं चित्रीकरण बाहेरदेशात केलं गेलाय. पण नक्की सई चं अजिंक्य देव, राजेश्वरी सचदेव आणि पूजा सावंत सोबतचं नातं काय? या कलाकारांची चित्रपटात काय भूमिका असणार आहे ? हे येत्या १६ मे २०२५ ला कळेल. अद्भुत आणि उत्तम कलाकारांसोबत सईची जुगलबंदी बघण्यासारखी असणार आहे. या सिनेमाचे दिग्दर्शक लोकेश गुप्ते हे असून लेखक मिहीर राजदा आहेत. तसेच राहुल पुरी, स्वाती खोपकर, सुरेश गोविंदराय पै निर्माते आहेत. तर सह निर्माते निनाद नंदकुमार बत्तीन आणि तबरेज पटेल आहेत. या सिनेमाला संगीत रोहित राऊतने दिलं आहे. 'अमायरा' हा चित्रपट १६ मे २०२५ ला सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

## स्टेट बँक ऑफ इंडियाचा शेअर ९०० रुपयांच्या पार जाणार



**मुंबई : स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शेअरमध्ये गेल्या काही दिवसांपासून पुन्हा तेजी पाहायला मिळत आहे. मे महिन्यात एसबीआयकडून जानेवारी ते मार्च २०२५ च्या तिमाहीचे निकाल जाहीर केले जाणार आहेत.**

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक म्हणून स्टेट बँक ऑफ इंडियाची ओळख आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाचा शेअर येत्या काही दिवसांमध्ये ९०० रुपयांचा टप्पा पार करू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काही दिवसांपासून स्टेट बँकेच्या शेअरमध्ये तेजी आहे.

एक्सिस सिक्यूरिटीजनं दिलेल्या सल्ल्यानुसार स्टेट बँक इंडियाचा शेअर १० ते १५ टक्क्यांनी वाढू शकतो. यामुळं येत्या १ ते ३ महिन्यांच्या कालावधीसाठी शेअर खरेदी करावा, असा देण्यात आला आहे.

स्टेट बँक इंडियाचा शेअर सध्या ८१०.७५ रुपयांवर आहे. गेल्या महिन्याभरात स्टेट बँकेच्या शेअरमध्ये ३९ रुपयांची तेजी दिसून आली आहे. एप्रिल २०२५ मध्ये शेअरनं ७८७ रुपयांच्या स्तरावर इनवर्टेड हेड अँड शोल्डर्स पॅटर्न तोडला आहे. त्यानंतर शेअरची खरेदी वाढली आहे.

एक्सिस सिक्यूरिटीजच्या अंदाजानुसार बँकेचा शेअर ८८५-९३० रुपयांपर्यंत पोहोचू शकतो. शेअरचा रिलेटिव्ह स्ट्रेंथ इंडेक्स तेजी दर्शवत असून यातून सकारात्मक संकेत मिळतोय. स्टेट बँक ऑफ इंडियाला आरबीआयकडून विशेष दर्जा देण्यात आला आहे. डोमेस्टिक सिस्टमिकली इंपॉर्टंट बँक असा दर्जा दिला आहे. म्हणजेच देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक बँक होय. स्टेट बँकेचा शेअर खरेदी करायचा असल्यास ८१५-७९९ दरम्यान खरेदी करावा असा सल्ला ब्रोकरेज फर्मनं दिला आहे. तर, स्टॉप लॉस ७७५ रुपये असावा कारण येत्या एक ते तीन महिन्यात बँकेचा शेअर ८८५ ते ९३० रुपयांपर्यंत पोहोचू शकतो.

## पंडित रोणू मजुमदार यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री प्रदान

**नाशिक : प्रतिनिधी**

प्रख्यात बासरीवादक पंडित रोणू मजुमदार यांना भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सोमवारी २८ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती भवन येथील एका भव्य समारंभात पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. पंडित मजुमदार यांनी देशातील तिसऱ्या क्रमांकाचा हा सर्वोच्च नागरी पुरस्कार संपूर्ण देशाला, त्यांचे आई-वडील आणि गुरूंना समर्पित केला. पद्मश्री या सर्वोच्च मनाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल मी आयुष्याच्या या वळणावर भावूक आणि त्याचवेळी आनंदीही आहे. मी माझा हा पुरस्कार संपूर्ण देशाला, संगीताच्या या क्षेत्रात आपली कारकीर्द घडवू पाहणाऱ्या प्रत्येकाला समर्पित करतो. हा पुरस्कार मला माझ्या आईच्या पायावर समर्पित करायचा आहे. या पुरस्काराने तिच्या



डोळ्यात आनंदाश्रू तराळले होते. हा पुरस्कार मी माझ्या गुरूंना म्हणजे भारतरत्न रवी शंकरजी, माझे गुरू पंडित विजय राघव राव आणि माझे प्रथम गुरू व वडील भानू मजुमदारजी यांना समर्पित करतो, असे उद्गार पंडित मजुमदार यांनी पुरस्कार मिळाल्यावर काढले. त्यांनी पुढे म्हटले, मी भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदीजी, माननीय गृहमंत्री अमितभाई शाह यांचेही आभार मानतो. त्यांनी या क्षेत्रात गेली ५० वर्षे मी जे योगदान दिले त्याची दखल घेतली. आज पहलगाममध्ये जी घटना घडली आहे, त्या पार्श्वभूमीवर मी आजचा हा क्षण काही मोठ्या प्रमाणावर साजरा करणार नाही. या पुरस्काराने मला अधिक कठोर मेहनत करण्याचे बळ दिले आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्यासाठी टॉनिक असून, त्यातून मला माझ्या सांगीतिक क्षेत्रात काम करण्यासाठी अधिक बळ मिळणार आहे.

मजूमदार यांनी मध्य प्रदेशातील ऐतिहासिक ग्वाल्हेर किल्ल्यावर जानेवारी महिन्यात ५४६ संगीतकारांचा अपूर्व सिंफनी आयोजित करून इतिहास रचला आहे. या अद्वितीय सादरीकरणासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने जगातील सर्वात मोठ्या सिंफनीद्वारे सादर झालेले संगीत म्हणून मान्यता देत विक्रम नोंदवला आहे. या सिम्फनीमध्ये एकाच रचनेचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर त्यांना आता हा पुरस्कार मिळाला आहे. नव्या जमान्याच्या संगीताच्या तसेच पारंपरिक संगीताच्या क्षेत्रात कल्पकता दाखवणाऱ्या मजुमदार यांनी केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक संगीत क्षेत्रातही स्वतःचा ठसा उमटवला आहे.

त्यांना अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार आणि गौरव मिळाले आहेत. त्यांमध्ये संगीत नाटक अकादमी, आदित्य विक्रम बिर्ला पुरस्कार आणि सहारा इंडिया लाइफटाइम ॲचिव्हमेंट पुरस्कार यांचा समावेश आहे. संगीत क्षेत्रात त्यांच्या योगदानाचा परिचय त्यांच्या महत्त्वपूर्ण अल्बमच्या माध्यमातून होतो.

## क्वालिटी वॉल्सचे दि डेअरी फॅक्टरी हे नवीन आइस्क्रीम बाजारात

**नाशिक : प्रतिनिधी**

आपल्या उत्पादनांना अधिक वैविध्यपूर्ण बनवण्याच्या दृष्टिकोनातून क्वालिटी वॉल्स या ख्यातनाम ब्रँडने घरच्या घरी आइस्क्रीमचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी डेअरी फॅक्टरी हे स्लो चर्न्ड आइस्क्रीम्स बाजारात आणले आहेत. डेअरी फॅक्टरी ही खऱ्या दुधापासून बनवलेली उत्तम दर्जाची क्रीमी आइस्क्रीम्सची श्रेणी आहे. त्याचे रिच टेक्श्चर प्रत्येक चवीसोबत जिभेवर रेंगाळते. या आइस्क्रीम्सचे




पार्टी पॅक्स आणि सुंदर टब्स चार लोकप्रिय प्रकारांमध्ये उपलब्ध आहेत- व्हॅनिला, बटरस्कॉच, मँगो आणि चॉकलेट. त्यामुळे तुमच्या घरी तुम्हाला उत्तम दर्जाच्या आइस्क्रीमची जादू अनुभवता येईल. ते तुम्हाला जवळच्या स्टोअर्समध्ये आणि क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध होतील.

मागील अनेक पिढ्यांपासून लोकांना हाताने बनवलेल्या आइस्क्रीम्सच्या चवीचा आनंद घ्यायला आवडतो. आपला अनुभव आणि अद्वितीय चवींचा संगम यांच्याद्वारे डेअरी फॅक्टरी स्लो चर्निंगच्या अनुभवसिद्धतेचा गौरव साजरा करते. त्यात संयम आणि अचूकतेमुळे प्रत्येक स्कूप एक अद्वितीय आनंदात रूपांतरित होतो. ही नवीन श्रेणी अत्यंत संथ वेगाने आइस्क्रीम चर्न करण्याच्या खास तंत्राद्वारे तयार केलेली आहे. त्यामुळे बर्फाचे बारीक खडे तुटतात आणि हवा या मिश्रणात भरली जाते. लोकांच्या आवडत्या क्लासिक फ्लेवर्सपासून सुरूवात करून डेअरी फॅक्टरी देशभरातील तुमच्या घराजवळच्या क्वालिटी वॉल्स रेफ्रिजरेटरमध्ये उपलब्ध असेल. आम्ही उन्हाळ्यासाठी सज्ज होत असून, सुट्टीसाठीही तयार होत आहोत. त्यामुळे खवय्यांना या आइस्क्रीम्सचा आनंद घेता येईल.

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलचे उद्घाटन

**मुंबई :** राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते काल वडाळा, मुंबई येथील नव्याने अद्ययावत करण्यात आलेल्या आदित्य ज्योत आय हॉस्पिटल-चे उद्घाटन करण्यात आले. डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटल समूहाचा भाग असलेल्या या ९,००० चौरस फुटांतील सुधारित सुविधेमुळे महाराष्ट्रात प्रगत आणि सर्वांसाठी सुलभ नेत्रसेवा देण्याच्या समूहाच्या प्रयत्नांना मोठी चालना मिळाली आहे.

आदित्य ज्योत आय हॉस्पिटलचे रूपांतर अत्याधुनिक सुविधेने करण्यात आले आहे. येथे आता सुसज्ज मॉड्युलर ऑपरेटिंग थिएटर, जागतिक दर्जाचे लेसर रिफ्रॅक्टिव्ह ऑपरेशन थिएटर, आधुनिक ऑप्टिकल रिटेल आणि डायग्नोस्टिक डिस्प्ले युनिट, तसेच पूर्ण सुसज्ज इन-हाउस फार्मसी उपलब्ध आहे. सर्वसमावेशक आणि सुलभ नेत्रसेवेचा अनुभव देण्यासाठी या केंद्राची रचना करण्यात आली आहे. मोतीबिंदू, रेटिना, कॉर्निया, लेसिक, ग्लॉकोमा, युव्हीआयटिस, स्क्विंट, बाल नेत्ररोग, न्यूरो-ऑप्थॅल्मोलॉजी, डव्हान्स्ड आय ट्रॉमा




सेंटर, अक्युलर ऑन्कोलॉजी आणि ऑक्युलोप्लास्टी अशा विविध नेत्रविकारांवरील प्रगत उपचार येथे एकाच छताखाली उपलब्ध आहेत.

राज्यपाल राधाकृष्णन म्हणाले, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटल नेटवर्कचा एक भाग असलेल्या आदित्य ज्योत आय हॉस्पिटलचे अत्याधुनिक केंद्र म्हणून झालेले रूपांतर पाहणे खरोखरच प्रेरणादायी आहे. 'रुग्ण प्रथम' या तत्त्वाला आधार देत वैद्यकीय क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग केला, तर आरोग्यसेवा किती उंचावू शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

## 'मर्सी' आशियाई चित्रपट महोत्सवात प्रदर्शित होणार

**मुंबई :** प्रिय व्यक्तीपासून विभक्त होण्याच्या नाजूक क्षणांचा शोध घेणारा एक कोमल आणि खोल मानवी चित्रपट मर्सी ५ मे २०२५ रोजी लंडनमधील रिच मिक्स थिएटरमध्ये यूके आशियाई चित्रपट महोत्सवात प्रदर्शित केला जाईल.

नवोदित कलाकार मितुल पटेल दिग्दर्शित मर्सी मृत्यूबद्दल कमी तर प्रेमाच्या भावनिक परिणामांबद्दल आणि निरोप देण्यासाठी लागणारे धैर्य याबद्दल अधिक आहे.

दया हा चित्रपट नुकसानाभोवती असलेल्या शांत, अनेकदा अव्यक्त भावनांचे प्रतिबिंब आहे. तो अपरिहार्यतेशी शांतता प्रस्थापित करण्यासाठी लागणारी शक्ती आणि सोडून देण्याच्या कृतीतही टिकून राहणाऱ्या प्रेमाचा शोध घेतो, असे चित्रपटात शेखरची भूमिका करणारे




आणि चित्रपटाचे निर्माते राज वासुदेव सांगतात.

या चित्रपटात शेखरची पत्नी जियाच्या भूमिकेत निहारिका रायजादा, आजारी मातृसत्ताक सुजाता यांच्या भूमिकेत अपर्णा घोषाल, भावनिकदृष्ट्या संघर्षग्रस्त भाऊ विहान यांच्या भूमिकेत कुणाल भान आणि कुटुंबाच्या सर्वात कठीण काळात आध्यात्मिक मार्गदर्शक फादर जोएलच्या भूमिकेत खोली आणि उबदारपणा आणणारे आदिल हुसेन आहेत.

राज वासुदेव आणि अनुराधा सचदेव यांच्या एव्हरक्लियर फिल्म्स बॅनरखाली निर्मित मर्सी त्यांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त लघुपट फॉरबिडनचे अनुसरण करते, ज्याने सन्मान हत्यांना धैर्याने तोंड दिले आणि जगभरातील ३० हून अधिक महोत्सवांमध्ये प्रदर्शित झाला.

मर्सीसह, एव्हरक्लियर त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रपटात पदार्पण करत आहे, जो प्रतिबिंब आणि सहानुभूती जागृत करणाऱ्या धाडसी, भावनिकदृष्ट्या भरलेल्या कथा सांगण्याच्या त्याच्या दृष्टिकोनाशी प्रामाणिक राहतो.

## महाराष्ट्र दिनानिमित्ताने कलाकारांनी दिला समृद्ध वारशाच्या आठवणींना उजाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

१ मे रोजी महाराष्ट्र दिन आहे आणि या महान राज्याचा समृद्ध इतिहास, येथील सांस्कृतिक विविधता आणि कला व चित्रपट सृष्टीला या राज्याने दिलेले योगदान यांचे स्मरण करून आनंद साजरा करण्यासाठी राज्यात तयारी सुरू आहे. सोनी सबचे कलाकार- जयेश मोरे, आदिश वैद्य, सायली साळुंखे, सुमित राघवन आणि आदित्य रेडिज सद्भावना व्यक्त करत आहेत आणि त्यांच्या जीवनात या राज्याचे काय महत्त्व आहे, याविषयी सांगत आहेत.

'वागले की दुनिया'




मालिकेतील सुमित राघवन म्हणतो, महाराष्ट्र राज्य नेहमी आपला सांस्कृतिक वारसा आणि आधुनिकता यांची सुंदर सांगड घालून आपल्याला प्रेरणा देते. मी मुंबईतच जन्माला आलो आणि मोठा झालो. मला इकडचे पुरणपोळी, श्रीखंड पुरी यांसारखे पारंपरिक पदार्थ खूप आवडतात. सकाळच्या न्याहारीत हे पदार्थ खाऊन मी आख्खे-आख्खे दिवस काढले आहेत. आपण महाराष्ट्र दिन साजरा करत आहोत, तर या राज्याच्या बाणेदारपणाला आणि राज्याचा इतिहास घडवण्यात योगदान देणाऱ्यांना मी सलाम करतो.

'वीर हनुमान' मालिकेत



देवी अंजनीची भूमिका करणारी सायली साळुंखे म्हणते, पुण्यातील विशाल किल्ल्यांपासून मुंबईच्या गजबजाटापर्यंत महाराष्ट्र हिंमत आणि महत्त्वाकांक्षेचे प्रतिनिधित्व करतो. या महाराष्ट्र दिनी, मी सर्वांना विनंती करेन की, ज्यामुळे हे राज्य इतके खास बनते, त्या इथल्या लोकांच्या अदम्य उत्साहाचे आपण कौतुक केले पाहिजे.

'तेनाली रामा' मालिकेत राजा



कृष्णदेवरायाची भूमिका करणारा आदित्य रेडिज म्हणतो, ऊर्जावान उत्सवांपासून ते इथल्या लोकांच्या जीवट वृत्तीपर्यंत महाराष्ट्राच्या प्रत्येक पैलूने मला घडवले आहे. या महाराष्ट्र दिनी, मला आजवर भरभरून देणाऱ्या आणि निरंतर प्रेरणा देणाऱ्या हा भूमीला मी वंदन करतो.

'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत



दिलीप पटेलची भूमिका करणारा जयेश मोरे म्हणतो, आपल्या राज्याच्या स्थापना दिनी, आपल्या वैभवशाली इतिहासाचे आणि संस्कृतीचे स्मरण करून राज्याने जो विकास केला आहे त्याचा अभिमान बाळगू या. महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.


'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत



विक्रम सरनची भूमिका करणारा आदिश वैद्य म्हणतो, माझा जन्म मुंबईतला आणि मी इथेच वाढलो. या नगरीचे माझ्यावर खूप ऋण आहे याच नगरीने मला ओळख दिली, प्रेम दिले. आपल्या राज्याच्या वारशाचा आणि राज्याने केलेल्या प्रगतीचा मला खूप अभिमान वाटतो. हा दिवस आपल्याला शांती आणि सामाजिक सद्भावनेचा मार्ग दाखवेल अशी मला आशा वाटते.

## क्रांतिसूर्य महात्मा बसवेश्वर

**महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला तो बाराव्या शतकाचा कालखंड म्हणजे भारतातील मूळ भूमिपुत्रांना परावलंबी बनवून अंकित ठेवण्याचा कालखंड होता. त्यामुळे इथला मूळचा भूमिपुत्रांचा समाज शूद्र किंवा अस्पृश्य बनवला गेला. एका बाजूने मुघलांची राजकीय गुलामगिरी आणि दुसऱ्या बाजूने अंतर्गत उच्चवर्णीय आर्यांची सामाजिक व धार्मिक गुलामगिरी. अशा परिस्थितीत विधायक आणि पुरोगामी विचारांचा वारसा म. बसवेश्वरांकडे आला आणि तो त्यांनी स्वतःच्या हिमतीवर पेलून दाखवला. प्रतिगामी आणि पुरोगामी यांच्यामध्ये बसवेश्वरांच्या नेतृत्वाखाली जो ऐतिहासिक क्रांतिकारी संघर्ष घडून आला, तो भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविला गेला आहे.**



**अनंत दंदणे**
संस्थापक, लिंगायत फाउंडेशन, नाशिकरोड

महात्मा बसवेश्वरांचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी येथे इ.स. ११३१ मध्ये उच्चवर्णीय शैव ब्राह्मण कुटुंबात मादीराज आणि मादलांबिला या आई-वडिलांच्या पोटी झाला. त्यांच्या मोठ्या बहिणीचे नाव अक्कनागंबिका होते. दोघे भावंडे उपजतच बुद्धिमान होती व पुरोगामी विचारांचा वसा घेऊनच जन्माला आली होती. बसवेश्वरांनी जेव्हा आठव्या वर्षात पदार्पण केले तेव्हा परंपरेप्रमाणे वडिलांनी त्यांचे उपनयन किंवा मौजी बंधन करण्याची तयारी सुरू केली. आठ वर्षांच्या बाल बसवेश्वराने वडिलांना प्रश्न केला, मी आठ वर्षांचा झालो म्हणून तुम्ही माझे मौजीबंधन करत आहात. मग माझ्यापेक्षा दोन वर्षांनी मोठी असलेल्या माझ्या बहिणीचे मौजीबंधन का नाही केले? या विचित्र प्रश्नामुळे वडील संतापले. त्यांनी परंपरेप्रमाणे जे चालत आले आहे, त्याप्रमाणे तुलाही वागावे लागेल. मुलींना किंवा स्त्रियांना शिक्षणाचा व मौजीबंधनाचा अधिकार नाही असे खडसावून सांगितले. माझ्याबरोबरच माझ्या बहिणीचेही मौजीबंधन करत असाल तरच मी तयार होईल, अन्यथा मी मौजीबंधन करणार नाही, असे बोलून बसवेश्वरांनी वडिलांनी दिलेली घराबाहेर पडण्याची शिक्षा स्वीकारून ते घराबाहेर पडले. त्यावेळेस मामा बलदेवांनी मध्यम मार्ग काढून आपल्या बहिणीसह भाच्याला आपल्या गावी इंगळेश्वराला घेऊन गेले. तेथे मामा बलदेवाने बाल बसवेश्वरांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. परंतु बसवेश्वर आपल्या मताशी ठाम होते. या उलट आई, बहीण आणि मामांनाच बसवेश्वरांचे विचार पटू लागले होते. त्यामुळे मामाने बसवेश्वरांना बहिणीसह कृष्णा व मलप्रभा नद्यांच्या संगमावर असलेल्या कुडलसंगम येथे शिक्षणासाठी पाठवून दिले. सुदैवाने तेथे त्यावेळेस जातवेदमुनी हे गुरू त्यांना लाभले. जातवेदमुनीदेखील मूर्तिपूजा नाकारून निसर्गातील शक्तीलाच देव मानत होते. त्यामुळे तेथे बसवेश्वरांचा बौद्धिक विकास योग्य दिशेने घडून आला. तसेच पुरोगामी विचारांच्या तरुणांची एक युवक संघटना आपोआपच आकाराला आली. तरुण वयातच बसवेश्वर तेथे एक नामांकित विचारवंत म्हणून गाजू लागले. त्यांची ही हुशारी बघून बिज्जल राजाच्या दरबारात उच्चपदस्थ असलेल्या मामा बलदेवांनी आपली कन्या गंगांबिका हिचा विवाह बसवेश्वरांशी लावून दिला व त्यांना कुडलसंगमहून बिज्जल राजाच्या दरबारात मंगळवेढ्याला बोलावून घेतले.

मंगळवेढ्याला एक अनपेक्षित प्रसंग घडून आला. मंगळवेढ्यात एक प्राचीन शिलालेख सापडला. त्या शिलालेखावरील मजकूर कुणाही विद्वानांना वाचणे शक्य झाले नाही. अखेर बसवेश्वरांनी आपली सर्व बुद्धी आणि कौशल्य पणास लावून इतर शिलालेखांवरील सांकेतिक लिपींचा अभ्यास करून त्या शिलालेखाचे रहस्य उलगडले आणि त्या शिलालेखावरील मजकुराप्रमाणे जिथे खजिना लपवून ठेवलेला आहे तेथे उत्खनन करून प्रचंड मोठ्या खजिन्याचा शोध लावला. या त्यांच्या कार्यामुळे राजा बिज्जलाने त्यांची अर्थखात्याचे उच्चपदस्थ अधिकारी म्हणून नेमणूक केली. राज्यकारभार करताना त्यांच्या लक्षात आले की, कोणत्याही समाजात सर्व व्यक्तींना कार्यप्रवृत्त गेल्याशिवाय आवश्यक दिशा आणि ज्ञान दिल्याशिवाय वस्तूंची उत्पादन प्रक्रिया गतिमान होत नाही. म्हणून त्यांनी आपल्या संघटन कौशल्य आणि बुद्धी पणाला लावून समाजातील प्रत्येकाला आपल्या बुद्धी आणि कृतीप्रमाणे कामाला लावून राज्याच्या संपत्तीमध्ये भर घालण्याची प्रक्रिया सुरू केली. सर्व जनतेला आपल्या या कार्यात सामील करून घेण्यासाठी या विचारांना त्यांनी धार्मिक संकल्पनेची जोड द्यायचे ठरवून 'कायकवे कैलास' हा सिद्धांत मांडला. याचा अर्थ 'कार्य हाच परमेश्वर'. आपल्याला नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे पार पाडणे हीच परमेश्वराची खरी भक्ती होय. परमेश्वराला शोधण्यासाठी दूर कैलास पर्वतावर किंवा कोठेही जाण्याची गरज नाही. ही शिकवण जनतेत रुजून राज्याची भरभराट होऊ लागली. त्यांचे हे कार्य बघून राजा बिज्जलाने त्यांना प्रधानमंत्री पदावर बढती दिली. कायकवे कैलास या मंत्रामुळे मंगळवेढ्यात औद्योगिक क्रांती घडून आली. तसेच आणखी एका क्षेत्रात म. बसवेश्वरांनी एक अभिनव प्रयोग घडवून आणला तो प्रयोग म्हणजे 'अनुभव मंटप'. राज्यकारभारात किंवा सामाजिक, धार्मिक बाबतीत कुठलीही समस्या निर्माण झाली तर त्यावर उपाय शोधण्यासाठी अनुभव मंटपात चर्चा, वादविवाद होऊन त्यावर मार्ग काढला जाऊ लागला. अनुभव मंटपात ७७० सदस्य होते. विशेष म्हणजे त्यात ७० स्त्रिया होत्या. तसेच या अनुभव मंटपाचे सभासद सर्व सामाजिक समूहामधून निवडून आलेले असत. राजा आणि प्रजा यांच्यातील अंतर कमी करून प्रजेला अशाप्रकारे सर्व कारभारात सामील करून घेतले. अशा प्रकारे महात्मा बसवेश्वर हे खऱ्या अर्थाने जगातील लोकशाहीचे आद्य जनक ठरतात.

मंटपाची कीर्ती ऐकून काश्मीरचा राजा भूपाल सिंग आपली पत्नी बोंतादेवीसह बिज्जलाच्या राज्यात येऊन राहिला व तेथील नियमाप्रमाणे तो तेथे बुरुड काम करून आपली उपजीविका करू लागला. हाच भूपाल सिंग पुढे मोळगी मारय्या या नावाने ओळखला जाऊ लागला. या अनुभव मंटपाचा एक सदस्य हा अफगाणिस्तानातील एक तरुण विचारवंत होता. तोच मरुळ शंकर देव होय. प्रसाद कुंडाजवळची सर्व कामे मरुळशंकर देव स्वतः करीत असे. आपल्या मराठी जणांसाठी ही अभिमानाची गोष्ट आहे की जगातील लोकशाहीचा पहिला प्रयोग या मराठी मातीत मंगळवेढ्याला झाला होता. राजा बिज्जलाची राजधानी नंतर मंगळवेढ्याहून बसवकल्याण येथे गेली व तिथे अनुभव मंटपाचा हा प्रयोग तसाच सुरू राहिला. लोकशाहीचे हे बीजारोपण त्या काळात झालेले असल्यामुळे आज १४० कोटी लोकसंख्येच्या भारतात आपण ही लोकशाही यशस्वीरीत्या राबवित आहोत. तसेच म. बसवेश्वरांनी जातिभेद निर्मूलन, सामाजिक विषमता, स्त्री-पुरुष समानता अशा सर्वच बाबतीत क्रांतिकारक कार्य केले आहे. त्यांचे विचार आजही पथदर्शक आहेत.

गांवकरी

# प्रतिमा

नाशिक, बुधवार,
दि. ३० एप्रिल २०२५

# शुकर हैं शुगर (नहीं) हैं।



**होय, जरा काळजावर हाथ ठेवून वाचा. शीर्षक वाचून तुम्हाला वाटले असणार की, मॅडम आता काय मधुमेहाची माहिती देताय की उपाय सांगताय...तर नक्कीच नाही. पण मधुमेहापेक्षाही भयंकर असा आजार समाजात पाय रोवू पाहत आहे. त्याचीच ही खतरेची घंटा समजूयात.**

ज्योत्स्ना डगळे
कौन्सिलर, नाशिक

काही दिवसांपूर्वी मला एक फोन आला होता. समोरून एक पुरुष बोलत होता आणि त्याच्या आवाजावरून तो बराच वयस्कर वाटत होता. समुपदेशनाबद्दल माझ्याकडून माहिती घेतली आणि तो काही थांबेना. आणि तो बोलू लागला. असा की जणू काही त्याच्या भावनांना पूर यावा असा. तो सांगू लागला की, मी एक प्राध्यापक आहे. आणि माझ्याच वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थिनींशी माझे शारीरिक संबंध आले आहेत. आणि आता ती मला सोडायचे नाव घेत नाही.

आणखी खोलात गेल्यावर समजले की, त्या मुलीच्या वडिलांचे नुकतेच निधन झाले होते. एकुलती एक होती ती. घरात आई व ती अशा दोघीच. कुठेतरी तिला या प्राध्यापकसाहेबांमध्ये वडीलधाऱ्या व्यक्तीचा आधार दिसू लागला आणि ती त्यांच्याशी बोलू लागली. जवळ आले. विचारांसोबत स्पर्शाची ही देवाणघेवाण झाली. तिला आर्थिक, मानसिक गरज होतीच. आणि या महाशयांना शारीरिक. कारण घरी पत्नी अर्धांगवायूने त्रस्त होती. अमाप पैसा होता पण मनोरंजन नव्हते. या देवाणघेवाणमध्ये त्यांनी तिच्या आर्थिक व मानसिक गरजा भागविल्या आणि तिने त्यांच्या शारीरिक. ही डील फार काळ टिकू नाही शकली, कारण ती मुलगी आता त्यांच्यात मानसिकरीत्या गुरफटून गेली होती.

आता तिला त्या प्राध्यापक महोदयांशिवाय राहणे कठीण झाले होते. आता कॉलेजला सुट्ट्या लागणार आणि तिला आता त्यांचा विरह सहन होणार नव्हता म्हणून ती त्यांना लग्न कर अशी गळ घालू लागली. आता यांच्या घरी पत्नी, मुलगी इंजिनिअरिंच्या दुसऱ्या वर्षाला. हे शक्य नव्हते. हे सर्व ऐकून मला तो अमिताभ बच्चन आणि जिया खानचा निःशब्द चित्रपट आठवला आणि मीही निःशब्द झाले.

मंडळी हा किस्सा एक प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे. असे अनेक किस्से मेट्रोपोलिटन सिटीमध्ये सुरू आहेत. नव्हे आता ते तुमच्या माझ्या शहरातही घडू राहिले आहेत. एक विचित्र संस्कृती, विचित्र एक फॅशन, एक विचित्र संकल्पना अस्तित्वात येत आहे. आणि तिला खूपच सहजरीत्या समाज स्वीकार करू पाहत आहे.

**शुगर बेबी...शुगर मॉम...**
**आणि शुगर डॅड**

अगदी बरोबर... मुंबई, पुणेसारख्या शहरांत ही संकल्पना अस्तित्वात आली आहे. रुजू होऊ पाहत आहे. यात तरुण मुली /मुल हे शुगर बेबी बनतात. आणि वयस्कर महिला / पुरुष हे त्यांचे शुगर मॉम आणि शुगर डॅडी बनतात.

यात पूर्णतः शारीरिक संबंधांवर आधारित डील असते. एक असा वयोगट समाजात आहे जिथे एका कालांतराने आपला साथीदार जग सोडून जातो अथवा काही व्याधींनी ग्रस्त असतो. मुले बाहेर परदेशात शिकायला असता. अमाप पैसा असतो. पण सर्व सुखे उपभोगण्यासाठी काळ हातातून निसटू पाहत असतो. मग अशावेळी या आंबट शौकिनांना आपल्या गरजा, राहिलेले स्वप्न कसे पूर्ण करणार यासाठी हा एक विशिष्ट गट समाजात अशी गरजू तरुण मुले, मुली शोधत असतात जे यांचे शुगर बेबी बनतात. किंवा हेच शुगर बेबी अशा शुगर डॅडी /शुगर मॉमच्याही शोधात असतात.

मुंबई, पुणे, बेंगलोरसारख्या ठिकाणी तरुण वर्ग शिक्षणासाठी तसेच नोकरीसाठी स्थलांतरित होत असतो. पण त्या मोठमोठ्या शहरांमध्ये आपल्या सुखचैनी कसे भागवणार, हा मोठा प्रश्न असतो. तसेच या तरुणाईला झटपट श्रीमंत व्हायचे असते. मग अशा तरुणाईला हा शुगर मॉम, शुगर डॅडीचा गट आकर्षित करतो.

काही ठिकाणी या दोन्ही पार्टीमध्ये कॉन्ट्रॅक्टही केले जाते. त्यानुसार या शुगर बेबींनी त्या शुगर डॅडी /शुगर मॉमसोबत वेळ घालवायचा. त्यांची काळजी घ्यायची. शारीरिक संबंध, हिंडणे, फिरणे अगदी त्यांची औषधे आणून देणे इथवर सर्व कामे त्या शुगर बेबींनी करायची असतात. याच्या मोबदल्यात त्या शुगर डॅडी /शुगर मॉमने त्या शुगर बेबीच्या सर्वच आर्थिक गरजा भागवायच्या. त्यांच्या शिक्षणाचा खर्च असो वा करिअरसंबंधी कुठलीही मदत.


५०-६० वयाचा पुरुष आणि विशीतली मुलगी. किंवा ५०-६० वयाची महिला आणि विशीतला मुलगा. काय चित्र असेल कल्पनाही नाही करवत. परंतु हे सत्य आहे. आपली मुले, मुली बाहेरगावी शिकायला जातात. तिथे ते नेमके काय करताय... त्यांचे लोकेशन काय आहे. त्यांच्याकडे महागड्या वस्तू असतील तर त्या कोठून आल्या, या सर्वांचा पालकांनी विचार करायला पाहिजे.

मुळात संस्कार पक्के असतील तर कितीही कसा ही प्रसंग येऊ देत...ती व्यक्ती चुकीचे पाऊल उचलत नाही. इथे कोणतीही मजबुरी नाही किंवा अडचण नाही. केवळ अय्याशी, चैन यासाठी हे सर्व केले जाते. परंतु हे डील संपल्यावर पुढे त्या मुला-मुलींचे काय होते... ते मानसिकरीत्या बाहेर निघू शकता का... याचा विचार मात्र तरुणाई करत नाही. फक्त भुलत चालली आहे. हे कुठे तरी थांबावे हाच एक उद्देश ठेवून हा लेख लिहीत आहे. एक गट असा आहे जो आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर आलेला असतो. शिवाय त्या गटाने बरेच मानसिक धक्के पाहिलेले असतात. त्यामुळे त्यांची पूर्ण मानसिकता तयार असते.

शिवाय, ज्या व्यक्ती अशा डील ऑफर करतात, त्यांच्यामध्ये लैंगिक आजारही असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एचआयव्हीसारख्या आजाराची लागणही मोठ्या प्रमाणावर होऊ शकते. समाजाने याबाबत सजग होणे गरजेचे आहे. आपली मुले काय करताय याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या लिखाणामुळे एक जरी जीव या गर्तेत जाण्यापासून वाचला तर लेखणीचे सार्थक झाले असे मला वाटेल. आणि ते पालक ही म्हणतील ...शुकर है ...शुगर नही है! धन्यवाद!

लेख आवडला असेल व उपयुक्त वाटला असेल तर नक्कीच नावासह शेअर करण्यास अनुमती आहे.

# भांड्याला भांडे लागणारच!



स्नेहल चौधरी
नाशिक

सून म्हणजे काय? माहिती आहे का कोणाला? प्रत्येक स्त्री ही सून बनून घरात जातं असते... सून हे पात्र तिला निभवावं लागते. आपली आई पण सून असते. आपली सासू पण कोणाची तरी सून असते.. बहीण, मामी, मावशी, आत्या, प्रत्येक स्त्री ही सून असतेच... सून ही सुसंस्कृत हवी, संस्कारी हवी.. अशी सून तर हवी असतेच, पण एक अर्थ असा पण होतो की सून म्हणजे तिने सुन्न राहून नांदायला हवी.. जे दिसतं ते बघायचं नाही. जे ऐकलं ते ऐकलंच नाही... बोलता तर तिला येतं पण मुके होऊन राहायचं.. असं का? पण ही गोष्ट फक्त आपल्या घरातल्या सुनेबद्दल.. त्याच घरातली मुलगी जी दुसऱ्या घरी नांदते. तिने याविरुद्धच वागायचं, ऐकून नाही घ्यायचं बेटा.. काय झाले की फोन कर. सहन तर अजिबात करायचं नाही... हे असं सांगण्यात येतं.. एक स्त्री ही मुलीला असं सांगते.. सुनेकडून याविरुद्ध अपेक्षा असं का?

सूनदेखील मुलगी आहे कुणाची, तिच्या आईने पण असंच शिकवलं तर चालणार का? मग सुनेची आई नाक खुपसते..लेकीच्या संसारात.. असं होत. सून बोलली की कुठून शिकून आली..बोलायचं.. तुझ्या आई-बापाने हेच शिकवलं का असं बोलून तिला दुखवता येतं.. पण लेकीला जर असं बोलले सासरची मंडळी तर आमची मुलगी सहन नाही करणार.. का करेल परिस्थितीनुसार वागणारच न.. असे उत्तर देतील.. मग हेच सुनेबाबतीत पण होऊच शकतं की नाही? परिस्थितीनुसार ती वागली तर ती का चुकीची.. थोडा मुद्दा पटवून दिला तर तू उलट बोलते असं का म्हटलं जातं.. ज्या तुमच्या मुलाच्या भरवशावर ती तिची नातीगोती..माहेर सोडून नव्या घरात नव्या नात्यांना आपलं करते त्या ठिकाणी जर तिला कोणी बोललं ती दुखावली गेली तिची चूक नसतांना तर ती नवऱ्यालाच सांगणार न.. मग सांगितलं मन मोकळ केल तर ती सून त्याठिकाणी घरात आग लावते.. असं का म्हटले जाते.

लग्न झाले म्हणजे तुमच्या घरातला मुलगा सज्ञान आहे. त्याला चूक, बरोबर हे समजते मग जे सत्य आहे जे बरोबर आहे. ती बाजू घेऊन तो बोलला. त्याच्या मर्जीने तर बायको फूस लावते, असं का बोललं जातं.. तुमचा-तुमच्या मुलाच्या मतावर, विचारांवर स्वतः च्या संस्कारांवर विश्वास नाही का? मग बायको शिकवते तिची बाजू घेतो.. तीच ऐकतो.. बायकोचा बैल हे म्हणायला पण कमी नाही कश्वास नाही.. असं होतं, की तो चूक बरोबर यातला फरक समजू शकत नाही.. असं आहे तर मग लग्न का करून देतात... घरातली लक्ष्मी म्हणायचं पण घरातल्या कुठल्याच निर्णयात तीच मत विचारलं जातं नाही.. गृहीत धरलं जातं असं का?

काही चांगल घडलं तर ठीक वाईट घडलं तर सुनेचा पायगुणामुळे झालं असं का? काही गोष्टी विधिलिखित असतात.. त्यात दोष कुणाचा नसतो पण तरी सुनेलाच जबाबदार का ठरवलं जाते.. का?

सून घरी आणताना वाजत गाजत आणतात. आणण्याआधी पण परीक्षण करूनच आणतात. घरी आणेपर्यंत तिचे सर्व गुणच दिसतात.. पण लग्न झाल्यावर काही दिवसांत तिचे दोष कुठून दिसायला लागतात.. स्वयंपाक येत नाही. आमच्या मुलीला असं आई-वडील सांगतात.. तेव्हा कौतुकाने म्हणतात की, असू द्या ओ मी शिकवेल माझ्या सुनेला.... पण लग्नानंतर काय तुझ्या आईने स्वयंपाक पण शिकवला नाही.. असं होतं पण यात... शब्दाला कोण फिरलं.. समोरून तर खरं सांगण्यात आलं होतं. तुम्हाला मान्य पण होतं पण नंतर त्याच गोष्टीवरून बोलून टोमणे मारून सुनेला बोल लावणं हे कितपत योग्य..काही मर्यादिपर्यंत ऐकते ती पण, पण जरा घरातल्यांचा तोल जास्त सुटायला लागला आणि उलट उत्तर दिलं तर मग ती उलट बोलते.. असं का? बरं एखाद्या सुनेला स्वयंपाक येतो छान. ती करायला लागली की मग मध्ये मध्ये करायचे मीठ इतकंच टाक.. तिखट बस... बस बस.. असं करणं मग तिचा अंदाज चुकवणे या गोष्टी पण घडतातच की. अरे करू द्या तिला तिच्या पद्धतीने.. जर तुम्हाला तुमची पद्धत चालवायची तर स्वतः करा सुनेवर का लादतात. तिला करू द्या तिच्या पद्धतीने.. पद्धत कुठली असो.. काम होणार.. चांगलंच करणार.. विश्वास ठेवायला हवा.. सासू म्हणेल मी म्हणेल तसे वागायला हवं तर भांड्याला भांडे हे लागणारच वाद होणारच... कारण सुनेचेही स्वप्नं वेगळी असतात.. आपल्या घरी गेल्यावर मी असे करेल तसे करेल.. असं सजवेल घर तसं सजवेल, तिची स्वप्नं तर ती क्षणोक्षणी तिला तुटताना दिसतात. कारण सासूला तिच्यानुसार सगळं जसं होतं तसं हवं असतं. ठेवायचं असतं.. अशावेळी सुनेची अवस्था काय होत असेल थोडा विचार करावा. लग्न करून आणतात तर बदल होणार, अशी मनाची तयारी का ठेवत नाही ?

माझ्या सासूने माझा छळ केला तर माझ्या सुनेशी पण मी तशीच वागेल असं का? उलट मला जो त्रास झाला तो माझ्या सुनेला मी देणार नाही असा विचार का नाही करत?

सून ही नवी पिढी असते. परिवर्तन ही काळाची गरज असते.. तेच घडत असतं. त्यात तुम्ही म्हणाल आमच्या वेळी असं होतं तसंच राहिले पाहिजे पण तसं झालं असतं तर...आज परिस्थिती ही तशीच राहिली असती.. नव्या गोष्टी कोणी शिकलं नसतं.. उलट सासूने सुनेच्या मागे खंबीरपणे उभं राहावं. तिच्या साथीने ती जे क्षण.. जबाबदारी कर्तव्य पार पाडत असताना जगू शकली नाही, ते क्षण आता जगावे.. आयुष्याचा आनंद घ्यावा. प्रत्येक सासू-सासऱ्याने आपल्या सुनेला मुलगी मानावे.. मग वाद नाही होणार, घराचा स्वर्गच होणार..

# सोंगाड्या



पुष्पा गोटखिंडीकर
नाशिक

अनिता चल लवकर आपल्याला वृद्धाश्रमात फळ वाटप करायला जायचे आहे ना. आवर लवकर. हो हो आलेच हं, जाऊया चला. गेले दहा-बारा दिवस अविनाशचे असे काही विविध उपक्रम चालू आहेत. हे सर्व तो कशासाठी करत आहे?....

अविनाश हा त्याच्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा. बालपणापासूनच अतिशय हुशार बोलका. लाघवी स्वभावाचा. खेळकर आणि तितकाच खोडकर. परंतु तो लहान असतानाच म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षी त्याचे पितृछत्र हरपले. ॲक्सिडेंटमध्ये त्याच्या वडिलांचे निधन झाले. तेव्हापासून त्याच्या आईनेच त्याचा सांभाळ केला. खूप कष्ट घेऊन तिने त्याला शिकवले. त्याला काहीही कमी पडू नये यासाठी तिने आटोकाट प्रयत्न केले. बी.ई. सिव्हिल होऊन तो आता बिल्डर म्हणून काम करू लागला आणि लवकरच तो त्या बिझनेसमध्ये स्थिरस्थावर झाला आणि यथावकाश अनिता नावाच्या मुलीशी तो विवाहबद्ध झाला.

अविनाशची आई खूप खुश होती. सासवासुनांचं चांगलं जमलं होतं. दोघी एकमेकींशी चांगलं अड्जस्ट करत होत्या. पण पण ...दैवाला हे सुख पहावलं नाही. अविनाशच्या आईला एक दिवस पॅरालिसिसचा अटॅक आला आणि त्या पूर्णपणे परावलंबी बनल्या. अनिता त्यांची खूप काळजी घेत होती. त्यांची मनापासून सेवा करत होती. एक दिवस अनिताची आई आपल्या विहीणबाईंची तब्येत पाहण्यासाठी आल्या आणि अनिताला खूप काम पडत आहे हे बघून त्या व्यथित झाल्या . त्यांनी लेकीचे कान भरायला सुरुवात केली. वारंवार फोन करून त्या अनिताला सुचवू लागल्या, तू लवकरात लवकर सासूबाईंना वृद्धाश्रमात ठेव. तुला तुझा संसार , हौसमौज काही आहे का नाही. किती दिवस ह्या पांगळीचे काम करत बसणार? त्यातून जावईबापूंना महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उभे राहायचे आहे. त्यामुळे तुझ्याकडे आला गेलाही जास्त असणार. मोठमोठी लोक तुमच्याकडे येणार, त्यांची सरबराई करशील का या म्हातारीची काळजी घेत बसशील. बघ बाई मला तुझी काळजी वाटते म्हणून मी सुचवले. (अनिताच्या आईने अनिताच्या चांगल्या चाललेल्या संसारात विष कालवायला सुरुवात केली होती.)

आता हळूहळू अनितालाही आईचे म्हणणे पटू लागले आणि आता तिने ते अविनाशच्या गळी उतरवायला सुरुवात केली. प्रथम अविनाशने अनिताने सुचवलेल्या प्रस्तावाला विरोध केला. पण रोज वादविवाद वाढायला लागले. आणि अखेर अविनाशने आपल्या आईला मातोश्री या वृद्धाश्रमात ठेवण्याचा निर्णय घेतला.

अविनाशची आई पार खचून गेली. मुलगा सून असे आपल्याला वृद्धाश्रमात टाकतील याची तिला पुसटशीही कल्पना नव्हती. जेमतेम दीड-दोन महिने त्या तिथे रडत कुढत राहिल्या आणि दहा दिवसांपूर्वी त्यांचे दुःखद निधन झाले.

आता महानगरपालिकेच्या निवडणुका अगदी तोंडावरती आल्या होत्या. अविनाशला आपल्या नावावर काही सामाजिक काम केल्याचे चित्र समाजापुढे उभे करायचे होते. आणि म्हणूनच गेली दहा-बारा दिवस तो विविध उपक्रम राबवत होता. कधी गंगेवरच्या भिकाऱ्यांना चादरी वाटप असेल तर कधी अनाथाश्रमामधील मुलांना खाऊ देणे असेल तर कधी वृद्धाश्रमात फळ वाटप असेल. या न त्या रूपाने त्याला काही ना काही समाजोपयोगी काम त्याच्या नावावर दाखवायचे होते. आता उद्या आईचा तेरावा होता म्हणून त्यांनी मोठे कार्यालय घेतले होते आणि जवळपास चार-पाचशे लोकांना जेवणाचे आमंत्रण दिले होते. किती नाटक ना! मनुष्य जिवंत असताना त्याची सेवा करण्याचे टाळून त्याच्या मृत्यूनंतर गाव जेवण घालून मी किती आईचे करत होतो हा शो करण्यात काय अर्थ आहे? दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिये! हेच खरं.

## उन्हाळ्यातील खाद्यपदार्थ जास्त काळ टिकविणे

किचन टिप्स



✻ थंड आणि कोरड्या ठिकाणी साठवणूक करा.

उष्णतेमुळे अन्न लवकर खराब होते, त्यामुळे मसाले, धान्ये, आणि सुकामेवा थंड, कोरड्या आणि अंधाऱ्या जागी ठेवा.

✻ एअरटाइट डब्यांचा वापर करा

अन्नातील आर्द्रता कमी करण्यासाठी आणि कीटकांपासून संरक्षणासाठी सीलबंद डबे किंवा काचच्या बाटल्यांचा वापर करा.

✻फळे आणि भाज्या योग्य पद्धतीने साठवा.

काही भाज्या (जसे की कांदे, बटाटे) फ्रीजमध्ये ठेवू नयेत. तर काही (टोमॅटो, ब्रोकोली) फ्रीजमध्ये ठेवले तर जास्त काळ टिकतात. योग्य साठवण महत्त्वाची आहे.

✻ पाककृतीनंतर लगेच थंड करून फ्रीजमध्ये ठेवा

शिजवलेले अन्न खोलीच्या तापमानावर जास्त वेळ ठेवू नका. ते लवकरात लवकर थंड करून फ्रीजमध्ये ठेवा.

✻ सेंद्रिय उपाय वापरा कीटकांपासून बचावासाठी

मसाल्याच्या डब्यांमध्ये बेडके, लवंग किंवा कडुलिंबाची पाने ठेवल्यास कीटक दूर राहतात.

# हेअर कलर परमनंट असतो का?

नेहा खरे
कॉस्मेटोलॉजिस्ट

ब्यूटी टिप्स

**कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात हेअर कलर करण्यापूर्वी व नंतर?**

**१. हेअर कलर परमनंट असतो का?**

हो, काही हेअर कलर्स परमनंट असतात. हे केसांच्या आतल्या भागात जाऊन रंग बदलतात.

सेमी-परमनंट आणि टेम्परारी कलर्स हे वरच्या थरावर राहतात आणि काही वेळात निघून जातात.

हेअर कलर करण्यापूर्वी घ्यावयाची काळजी:

१. स्किन टेस्ट एलर्जी रिएक्शन होतो का हे तपासण्यासाठी २४-४८ तास आधी टेस्ट करावी.

२. केस स्वच्छ पण ऑईलिंग असलेले ठेवावेत :

नैसर्गिक तेलांची एक पातळ थर केसांचं संरक्षण करते.

३. सुलभ आणि नुकसान कमी असणारा कलर निवडावा :

अमोनिया-मुक्त आणि हर्बल कलर्सचा विचार करा.

४. ब्लिचिंग करावी लागली तर ती अनुभवी प्रोफेशनलनेच करून घ्यावी.

५. प्री-कलर ट्रिटमेंट :

प्रोटीन मास्क किंवा डीप कंडिशनिंग करून केस मजबूत करावेत.

हेअर कलर केल्यानंतर घ्यावयाची काळजी

१. कलर प्रोटेक्ट शॅम्पू व कंडिशनर वापरा :

केसांमधून कलर लवकर निघू नये म्हणून खास फॉर्म्युलेशन वापरणं गरजेचं आहे.

२. तपमान कमी ठेवून केस धुणे:

गरम पाण्यामुळे रंग लवकर निघतो.

३. डीप कंडिशनिंग दर आठवड्याला करा :

कलरमुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी.

४. हीट स्टायलिंग टाळा :

ब्लो ड्रायर, स्ट्रेटनर यांचा वापर कमीत कमी करा.

५. सन प्रोटेक्शन :

सूर्यप्रकाशात बाहेर पडताना केस झाकणे किंवा यू वी प्रोटेक्शन स्प्रे वापरणे.

जर केस आधीच ड्राय, डॅमेज्ड किंवा केमिकल ट्रीट केलेले असतील, तर कलरपूर्वी केसांच नीट अभ्यास करून मग कलर अवश्य करावा.



# उन्हाळ्यात हे ड्रेस आरामदायक आणि स्टायलिश लुक देतील



**कॉटन कुर्ती विथ प्लाझो/ चुडीदार**

✻ शुद्ध सूती कपड्यामुळे उन्हात घाम येत नाही आणि आरामदायकही असते.

✻ हलके रंग जसे की पेस्टल, फिकट गुलाबी, पिवळा, निळा वापरावेत.

**लाइटवेट लिनेन शर्ट विथ ट्राऊझर्स**

✻ लिनेन हा श्वास घेणारा फॅब्रिक आहे, त्यामुळे उन्हात बऱ्यापैकी फ्रेश राहता येते.

✻ सॉलिड किंवा हलके प्रिंट्स असलेले शर्ट्स ऑफिससाठी योग्य आहेत.

**ए-लाइन मिडी ड्रेस**

✻ फ्लोवी आणि घाम शोषणारे फॅब्रिक असलेले मिडी ड्रेस ऑफिससाठी परफेक्ट असतात.

✻ स्लीव्हज् असलेले डिझाइन्स अधिक प्रोफेशनल दिसतात.

**सिंपल स्लीव्हलेस किंवा हाफ-स्लीव्हस टॉप विथ स्कर्ट / सिगारेट पँट्स**

✻ टॉप्स कॉटन किंवा रेयॉन मटेरियलचे असावेत.

✻ स्कर्ट्स किंवा पॅन्ट्स थोडे रिलॅक्स फिट असावेत जेणेकरून ते अधिक आरामदायक वाटतात.

**कॉटन साडी विथ स्लीव्हड ब्लाऊज**

✻ ऑफिससाठी सुती साडी ही परंपरा आणि व्यावसायिकतेचा सुंदर मिलाफ असतो.

✻ हलकी प्रिंट्स किंवा पट्टा डिझाइन असलेली साडी निवडा.

✻ ऑफिसच्या ड्रेस कोडनुसार हे ड्रेस थोडे ॲडजस्ट करता येतात.